
साप्ताहिक
# माणूस
२४ मे ८६ / २ रुपये

## सार्वजनिक क्षेत्रातले 'पांढरे हत्ती' आणि
# खाजगीकरण



साप्ताहिक

# माणूस

□

**वर्ष : पंचविसावे**

**अंक : बावन्नावा**

□

**२४ मे १९८६**

**किंमत : दोन रुपये**

□

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

□

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

**मेधा राजहंस**

□

वार्षिक वर्गणी

**साठ रुपये**

□

**प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही**

□

**राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.**

□

**: पत्ता :**


**साप्ताहिक माणूस**

**१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०**

**दूरध्वनी : ४४३४५९**

□

**मुखपृष्ठ—श्याम देशपांडे**



# मुंबापुरी

## □ हुसेन—नवी राजवस्त्रे

राज्यसभेच्या जागांसाठी मुंबापुरीतून बऱ्याच लोकांची नावे घेतली जात होती. त्यात ब्लिट्झचे संपादक रूसी करंजिया ह्यांचा बराच वरचा नंबर होता. खरे पाहता करंजिया ह्यांनी त्यांच्या पन्नास—पंचावन्न वर्षांच्या पत्रकारितेत भरीव अशी कोणतीच कामगिरी केली नाही. मात्र इंग्रजी पत्रकारितेत स्वतःची खास अशी शैली निर्माण केली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामुळे ह्या व्यवसायाबद्दल लोकांमध्ये जबरदस्त आकर्षण निर्माण झाले. एरवी वातकुक्कुट पत्रकारितेत करंजिया वाकबगार आहेत. जनता राजवटीत त्यांनी नव्या राज्यकर्त्यांशी जसे जुळवून घेतले तितक्याच सुबकतेने पुन्हा इंदिरा गांधींच्या पाठीशी ते उभे राहिले. नेहरू घराण्याच्या तीन पिढ्यांशी त्यांचा पत्रकार म्हणून संबंध. शिवाय ते स्वतः पारशी. त्यामुळे राज्यसभेची माळ त्यांच्याच गळ्यात पडणार अशी आमची अटकळ होती. परंतु चित्रकार हुसेन ह्यांची ह्या पदासाठी निवड झाली.

हुसेन ह्यांचा गेल्या काही महिन्यातला प्रवास पाहता पुढच्या निवडणुकीत ते कॉंग्रेस आयच्या तिकिटावर महापालिका, विधानसभा, लोकसभा निवडणूक लढवतील अशी आम्हाला शंका यायला लागली होती. आणीबाणीच्या काळात त्यांनी इंदिरा गांधींचे दुर्गेच्या स्वरूपातले चित्र काढले होते. ह्या चित्राचा बराच बोलबाला झाला. इंदिरा गांधींची हत्या झाल्यावर त्यांनी 'हिंसा' ही मध्यवर्ती कल्पना घेऊन इंदिरा गांधींचे चित्र काढले. मुंबापुरीत कॉंग्रेसचे शताब्दी अधिवेशन झाले तेव्हा हुसेन ह्यांच्या इंदिरा गांधींवरील चित्रांचे प्रदर्शन मुरली देवरा यांच्या प्रयत्नामुळे भरले होते. इंदिरा गांधींच्या खुनानंतर दिल्लीमध्ये प्रचंड हत्याकांड घडले. त्यानंतर जातीय दंगेही देशात वेळोवेळी उसळले. ह्या सर्वातली 'हिंसा' काही हुसेन ह्यांना जाणवलेली दिसत नाही.

चंदनवाडा स्मशानाच्या भिंतीवर जाहिराती रंगविण्याचे काम एकेकाळी हुसेन ह्यांनी केले. आज जगातल्या मोजक्या श्रेष्ठ चित्रकारांत त्यांचे नाव घेतले जाते. बहुधा आपले वेगळेपण जपण्यासाठी ते आजही कोठे जाताना पायात चपला घालत नाहीत. आता अंगावर राज्यसभेची वस्त्रे चढविल्यावर हा वेगळेपणा ते किती टिकवतात हे पाहायचे !

## □ शबाना—शिवाजीराव—नलावडे

शबाना आझमी ह्यांनी चार दिवसांचे उपोषण संपुष्टात आणल्याने आम्हाला फार हायसे वाटले. नरिमन पॉइंट येथील संजय गांधी नगरातील झोपडपट्टीवासियांना न्याय मिळावा म्हणून त्यांनी हे आमरण उपोषण सुरू केले होते. ह्या सामाजिक नाट्याची पटकथा अर्थातच विजय तेंडुलकर ह्यांची होती. चित्रीकरण गोविंद निहलानी यांचे. खलनायकाची भूमिका वठवली शंकरराव चव्हाण ह्यांनी. वेळीअवेळी नायिकेच्या मदतीस धावून जाणाऱ्या काकाजींचे काम केले डॉक्टर सुब्रमण्यम् ह्यांनी.

वृत्तपत्रांतल्या बातम्या वाचता वाचता एक वेळ अशी आली की, नेमक्या कोणत्या मागण्यांसाठी हे उपोषण चालले आहे, ह्याचा आम्हाला पत्ताच लागत नव्हता. कधी शबाना आझमी हसतानाचा फोटो, कधी त्या चर्चा करीत असताना तर कधी चिंताग्रस्त असल्याचे छायाचित्र. मंडपाबाहेर कायम लोकांची ही गर्दी जमलेली असायची.

हा एकूणच वास्तववादी चित्रपट असल्यानं खलनायकाने शेवटपर्यंत अन्यायाविरुद्ध लढणारांना दाद दिली नाही. परंतु समाजवादाची अगदीच मुस्कटदाबी झाली असेही म्हणता येणार नाही. नायिकेचे वजन तीन किलोंनो

खाली आले तेव्हा कैफी, शौकत आझमी आणि जावेद अख्तर ह्यानीही धावपळ सुरू केली. सजयनगरवाल्याना अखेर न्याय मिळाला की नाही हे समजणे कठीण. परंतु ह्या नाटयाचा शेवट मात्र गोड झाला ह्याचे आम्हाला समाधान वाटले. नाही म्हटले तरी देमार चित्रपट पाहायची सवय असल्याने वास्तववादी चित्रपटांचे शेवट आम्हाला नेहमीच बुचकळयात टाकतात.

बाकी मुबापुरीतल्या सागण्यासारख्या ठळक घटना म्हणजे शिवाजीराव पाटलानी पत्रकार परिषद घेऊन साखर भवनाचे रहस्य अधिकच गूढ बनविले. त्याचा मूळ उद्देश साखर भवनासबधी ज्या उलट सुलट बातम्या येत होत्या त्या सबधात सर्व खुलासा पत्रकारासमोर ठेवण्याचा होता परंतु ह्या खटाटोपात त्यांनी बरेच नवे प्रश्न उपस्थित केले. मुख्यमंत्र्यानी केवळ साखर सघाच्या सभागृहाच्या उद्घाटनास येण्याचे मान्य केले. आधी ते सपूर्ण इमारतीचे उद्घाटन करणार होते. पत्रकारानी अगदी पहिल्या प्रश्नापासूनच भाडणाचा पवित्रा घेतला. सुरुवातीला जे छापील निवेदन वाटण्यात आले ते इग्रजीत होते. त्यावरूनही एका पत्रकाराने 'शिवाजी राव, इग्रजी प्रेस रीलीजला प्रायरिटी का ?' असा प्रश्न केला. असो. नरिमन पॉइंटवरील ह्या इमारतीच्या उद्घाटनाला शकरराव आणि दादा ह्या दोघानीही उपस्थित राहावे अशी साखर सघाची इच्छा असल्याने ह्या समारभावर उभ्या महाराष्ट्राचे भवितव्य अवलबून आहे असे आमचे ठाम मत बनले आहे.

नवे महापौर दत्ता नलावडे लोकसंख्या वाढीच्या प्रश्नावर विचार करण्यासाठी भरविल्या गेलेल्या एका जागतिक परिषदेसाठी स्पेनमधील बोर्सलोना येथे गेले आहेत. परिषद चारच दिवसांची आहे. परंतु चार–पाच देश पाहून महापौर दोन जूनला परत येणार आहेत. एकदा आपण पुण्याला भेट दिली की सागली, सातारा, कोल्हापूर ही ठिकाणेही आपण पाहून घेतोच की नाही, असा मुद्दा माडून नलवडयानी आपल्या इतर देशांच्या भेटीचे समर्थन केले. महापौराच्या जगप्रवासाचे आम्हाला दुःख नाही. परंतु त्याचे समर्थन त्यांनी अगदीच किरकोळ मुद्दे मांडून करण्याची आवश्यकता नाही. 'केल्याने देशाटन पंडित मैत्री...' असे म्हटलेले आहेच. त्यातला पहिला भाग तरी त्याना आटोपता येईल.

—विष्णु जयदेव

# पुणे वार्ता

## ☐ अर्थव्यवस्था चालली कुठे ?

राजीव गाधी सत्तेवर आल्यापासून नव्या आर्थिक नीतीची भाषा बोलली जाऊ लागली आहे. दीर्घ मुदतीच्या नव्या अर्थयोजनेची घोषणा केल्यापासून व्ही. पी. सिंगानी मोठे 'ग्लॅमर' मिळवले आहे. आर्थिक शिथिलीकरण, करकपाती, बिझनेस हाऊसेसवर धाडी वगैरे घडामोडीमुळे आर्थिक क्षेत्रात खळबळ निर्माण झाली आहे.

या नव्या अर्थनीतीची चर्चाही जोरात चालू आहे. मुबई–दिल्लीहून प्रसिद्ध होणाऱ्या 'आर्गल' नियतकालिकानी या चर्चेला उचलून धरले आहे. या नव्या अर्थनीतीचे अर्थतज्ज्ञाकडून मूल्यमापन होण्याची हीच वेळ आहे तिच्या दीर्घकालीन परिणामाची चर्चा होणे आवश्यक आहे. याच पार्श्वभूमीवर वसत व्याख्यानमालेत एक व्याख्यान आयोजित करण्यात आले होते-शनिवारी १० मे-रोजी विषय होता 'भारताची अर्थव्यवस्था चालली कुठे ?' आणि वक्ते होते प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ श्री. ह. कृ. पराजपे.

श्री. ह कृ पराजपे याच्यासारख्या प्रगल्भ अर्थतज्ञाला या नव्या नीतीमुळे सामोरे येणारे धोके स्पष्ट दिसतात. आपल्या वक्तव्यातून ते या धोक्याची मिमासा स्पष्टपणे करतात आणि म्हणूनच ह्या नव्या अर्थनीतीचा मार्ग देशाला आणखी 'भिक्षादेही'च्या स्वरूपाला नेऊन ठेवणार की काय ही त्यांची भीती रास्त वाटते वाढत्या आयातीमुळे निर्यातीतून मिळणारे परकीय चलन परकीय कर्जे आणि व्याजावरच खर्च होईल. चलनटंचाईच्या समस्येमुळे परकीय दबाव वाढून रुपयाचे पुन्हा अवमूल्यन करण्याची वेळ येईल ही भीती त्याना वाटते.

नव्या आर्थिक धोरणात उपभोग्य वस्तूना प्राधान्य दिल्याने उपभोगिता वाढेल आणि आर्थिक विषमता आणखी दाट होईल. विशेषत: असघटित क्षेत्रावर त्याचा मोठा परिणाम होईल असे त्याना वाटते. त्याचबरोबर बेकारीचे संकटही आणखी मोठे होईल व एकूणच समस्याचा बोजा हलका होण्याऐवजी आणखी भारी होईल असे मत ते व्यक्त करतात.

हे धोरण भ्रष्टाचार कितपत रोखू शकेल याची त्याना शका वाटते आर्थिक समस्या अधिक बिकट झाल्यास देशातील लोकशाही टिकवणे अवघड होईल असे ते म्हणतात.

ह. कृ. परांजपे अर्थशास्त्रीय तत्त्वाच्या आधारावरच वरील मते माडतात. या नव्या नीतीच्या परिणामांची दीर्घ आणि स्पष्ट चर्चा होणेच आवश्यक आहे ग्लॅमर मिळवणारी निव्वळ 'भाकिते' करणे योग्य नव्हे. म्हणूनच पराजप्याचे विचार महत्त्वाचे वाटतात.

## ☐ 'गर्द' प्रकाशन

अनिल अवचट हे मराठीतील वेगळया ढंगाचे लेखक आहेत. वेगळ्या ढगाचे अशा अर्थाने की, त्याचे लेखन साहित्याच्या कोणत्याही चौकटीत ठामपणे बसवता येत नाही. त्यानी त्याच्या खास शैलीने एक नवाच लेखनप्रकार सुरू केला आहे असे म्हणायला हरकत नाही. समाजातील अधश्रद्धा, चालीरीती, शोषित माणसे यावद्दल त्यानी खूप लिहिले आहे त्यावर सशोधन केले आहे आणि अनुभवसिद्ध असे लेखन केले आहे.

अशा वेगळया ढगाच्या लेखकाचे लक्ष गर्द सारख्या कठीण समस्येकडे न जावे तर नवल गर्द, हेरॉइन किंवा ब्राऊन शुगरसारख्या व्यसनाने ग्रासलेल्या समाजजीवनाबद्दल त्यानी नवे पुस्तक लिहिले आहे. पुस्तकाचा प्रकाशन समारभ १६ मे रोजी पार पडला. त्याच्या पुस्तकात काय असेल याची झलक मात्र त्याधीच म्हणजे १३ मेला वसत व्याख्यानमालेत ऐकायला मिळाली. अनिल अवचट 'गर्द' या विषयावर त्या दिवशी बोलले.

गर्दसारखे व्यसन केवळ श्रीमतापुरतेच मर्यादित राहिलेले नसून ते गरिबामध्येही पसरले आहे असे सागून त्यानी या व्यसनाची लागण कशी होते व त्याचे दुष्परिणाम काय आहेत याचा आढावा घेतला. गर्द किंवा ब्राऊन शुगरचे एखाद्या व्यक्तीला असलेले व्यसन म्हणजे सपूर्ण समाजाला लागलेला रोग आहे, म्हणूनच सामाजिक सघटनानी याबाबत जागरूक रहावयास हवे, असे ते म्हणतात. आई–वडील, आजूबाजूचा समाज, आर्थिक–सामाजिक परिस्थिती हीच या व्यसनास जबाबदार आहे व त्यातूनच या व्यस-

नाचे प्रमाण वाढते आहे. विशेषतः तरुणामध्ये हे प्रमाण अधिक असल्याने ही बाब चिंतनीय आहे असे अवचट म्हणतात.

अवचटानी गर्दवर लिहून मोलाची कामगिरी केली आहे. इतर ठिकाणी यावर आधीच बरीच चर्चा झाली आहे. खूपसे लिहूनही झाले आहे. मराठीतसुद्धा दैनिकातून किंवा नियतकालिकातून लिहिणे झाले आहे. पुस्तकरूपाने मात्र ही समस्या प्रथमच अवचटानी मांडली आहे गर्दसारख्या व्यसनाचे प्रमाण नुसतेच कमी होणे नव्हे तर पूर्ण नष्ट होणे हेच या पुस्तकाचे खरे मूल्यमापन ठरावे !

### ☐ किर्लोस्कर निर्दोष

गेल्या काही महिन्यापूर्वी किर्लोस्करांवर पडलेल्या छाप्यानी मोठी खळबळ उडाली होती. त्याबद्दल तीव्र नापसतीचे सूर साऱ्या महाराष्ट्रातून उमटले होते प्रकरण न्यायप्रविष्ट असताना त्याला दिल्या गेलेल्या प्रसिद्धीमुळे ही नापसती व्यक्त होत होती. आता त्याच्यावर भरण्यात आलेल्या एका खटल्याचा निकाल लागला आहे व न्यायालयाने किर्लोस्कराना निर्दोष जाहीर केले आहे.

'फेरा'च्या गुतागुतीतून निर्माण झालेल्या लढाईत एक बाजी तर किर्लोस्करानी मारली आहे बुधवारी हा निकाल ऐकण्याकरता न्यायालयात बरीच गर्दी झाली होती. निकालास बराच उशीर लागला पण निकाल कळताच सर्वच क्षेत्रातून उत्स्फूर्तपणे आनद व समाधान व्यक्त करण्यात आली. न्यायदडाधिकारी श्री. जगताप यानी आपल्या निकाल पत्रातील मुख्य भाग वाचून दाखवला.

या निकालाची चाहूल व्ही. पी. सिंगाना आधीच लागली असावी कारण गेल्याच आठवड्यात त्यानी 'फेरा' च्या कायद्यात पुनर्संशोधनाची गरज असल्याचे मत व्यक्त केले होते. एकूणच या निकालाने 'दिल्ली' नाराज झाली असणार !

—मनोहर सोनवणे

---

अमेरिकेतून

## वैवाहिक संबंध— दोन दृष्टिकोन

**मा**नसशास्त्रातील काही सशोधक म्हणतात की प्रत्येक विवाह म्हणजे खरे पाहता दोन विवाह असतात— एक स्त्रीचा आणि एक पुरुषाचा. एकमेकाचे वैवाहिक सबध कितीही सुखाचे असले तरी पती आणि पत्नी या दोन व्यक्तीच्यातील असलेली वैचारिक तफावत त्यात नेहमी डोकावत असते. इथल्या टेक्सास विद्यापीठातल्या डॉ. हस्टन या मानसशास्त्रज्ञानी १३० अमेरिकन दापत्याच्या सखोल अभ्यासावर आधारित केलेल्या नवीन सशोधनानुसार अशी वैचारिक तफावत नेहमी परस्पर विरोधीच असते असे नाही, उलट अशी तफावत वैवाहिक सबध सुदृढ होण्याचे काही वेळा साधन पण होऊ शकते; पण त्याकरता मानसशास्त्रज्ञाच्या मते पतीपत्नीनी ही मतभिन्नता मोकळेपणाने एकमेकाजवळ मान्य करायला हवी. जर ही मतभिन्नता कशी अदृश्य पण तरीसुद्धा किती प्रबळ असू शकते यासबंधी जागरूक राहिले तर पतीपत्नी आपल्या वैवाहिक सबधाच्या आड ही मतभिन्नता येऊ न देण्यात यशस्वी होतात. या विषयावर न्यूयॉर्क टाईम्समध्ये आलेल्या एका लेखाचा गोषवारा असा—

पतीपत्नीच्या वैवाहिक संबंधात सर्वात जास्त फरक असणारी गोष्ट म्हणजे एकमेकासबधी वाटणाऱ्या भावनिक सलोख्याची ( emotional intimacy ) तीव्रता आणि त्याचे वैवाहिक सबधातील महत्त्व. बऱ्याच पतीना नुसते पत्नीबरोबर वागेत काम करणे किंवा तिच्याबरोबर चित्रपट पहायला जाणे यात तिच्याबरोबर भावनात्मक जवळीक साधल्याचे समाधान मिळते. पण त्याच्या पत्नीना एवढयाने समाधान होत नाही आणि मुळातच भावनात्मक जवळकीची पतीपेक्षा जास्त आवश्यकता भासत असल्याने पत्नीच्या मते ही जवळीक त्यासबंधी एकमेकाशी नीट बोलून व चर्चा करूनच साधते. पती बरेच वेळा तक्रार करतो की मला माझ्या पत्नीबरोबर वेगवेगळ्या गोष्टी करायला आवडतात पण तिला हवे असते ते सारखे सभाषण ! बऱ्याच पतीच्या मते 'मी माझी घरातली कामे केली की एकमेकाच्या सबधातले माझे कर्तव्य संपले. आता मला जास्त त्रास देऊ नको !' अर्थात विवाहाआधी प्रियाराधन चालू असताना पुरुष भावनिक सलोखा साधण्यासाठी त्याच्या प्रियेशी तासन्तास बोलत बसायला राजी असतो. भावनिक सलोखा ही गोष्ट पुरुषाच्या बाबतीत थोडी अनैसर्गिकच म्हणावी लागेल. प्रियाराधनेच्या वेळी पुरुष त्याचा उपयोग स्त्रीला आकर्षित करण्याकरता करतात. पण एकदा विवाह झाल्यानतर जसजसा जास्त काळ लोटतो तसतसे पुरुष पत्नीबरोबरच्या अशा प्रकारच्या सभाषणात कमीकमी वेळ घालवू लागतात आणि जास्ती करून आपल्या व्यवसायात आणि मित्रमडळीत जास्त लक्ष देतात. अशा प्रकारची पतीमडळीची वर्तणूक ज्याचे वैवाहिक संबध परंपरागत पद्धतीचे असतात, त्याच्यात जास्त दिसते. गेल्या वीस वर्षात अशा परपरावर खूप टीका झालेली असूनसुद्धा अशा प्रकारच्या परपरागत पद्धतीचे वैवाहिक आयुष्य बरीच दापत्ये जगत असतात.

विवाहानतर पुरुषाच्या वागण्यात प्रियाराधनेच्या वेळीच्या त्याच्या वागणुकीशी तुलना करता फरक पडतो आणि त्यामुळे वैवाहिक संबधात निराशा, वादग, मागण्या आणि तणाव वाढण्याचा व त्यामुळे वैवाहिक जीवनाला धोका पोचण्याचा सभव असतो. यशस्वी वैवाहिक जीवनात पती पत्नी एकमेकाला आवडणाऱ्या गोष्टी करतात आणि नेहमी एकमेकाशी मन सपूर्ण मोकळे करून संभाषण करतात. अर्थात अशा प्रकारची जवळीक आणि मोकळेपणा कुणावर दडपण आणून साधता येत नाही. या गोष्टी आपोआपच व्हाव्या लागतात.

हार्वर्ड विद्यापीठातील मानसशास्त्रज्ञ डॉ. गिलिगन याच्या मते पती आणि पत्नी यांच्यातली एकमेकाशी जवळीक साधण्याच्या बाबतीतली मतभिन्नता म्हणजे स्त्री आणि पुरुष याच्यातल्या आणखी खोल नैसर्गिक फरकाची निदर्शक असू शकेल. उदा. तरुण

पृष्ठ २९ वर

# समाजाच्या पापांचं प्रायश्चित्त घेणारा कर्मयोगी - दाजीसाहेब

' गेल्या सुमारे पस्तीस वर्षातल्या या कामाकडे वळून पाहताना काहीवेळा माझं मलाच आश्चर्य वाटत. आधी काम सुरू करा, पैसा आपोआप येईल या तत्त्वानुसार मी या ठिकाणी श्री जगदंबा कुष्ठ निवास उभारला आणि नंतर मागे पाहिलच नाही. सुरवातीला काही जणानी कुचेष्टा केली. पण अंधःकार पडणारच आहे, कंदिलाच्या प्रकाशात दिसेल तशी पावल टाक, अस सतत स्वतःला बजावत मी पुढे चालत राहिलो.

' या वाटचालीत भेटलेली माणसं आणि आलेल्या अनुभवांमधून मानवी जीवनातल्या वेदनेची खोली मला जाणवली. विविध दुःखाच्या रूपान मला वेदनेच दर्शन घडलं. विविध आपत्तीमधून ज्ञानाचा साक्षात्कार झाला. जीवनात दुःख आणि वेदना हेच सत्य, हे ओळखून संवेदना, सहवेदना आणि शेवटी समाधीप्रत पोचता येतं '

अंगाला राख फासून वर्षानुवर्षे एका जागी बसून ब्रह्मज्ञान झाल्याचा आव आणणाऱ्या एखाद्या वैराग्याचे हे उद्गार नाहीत, तर कुष्ठरोग्यांची सेवा हे राष्ट्रकार्य मानून त्यामध्ये आपलं जीवन सर्वस्व उधळून दिलेल्या अमरावतीच्या ' तपोवन ' या संस्थेचे संस्थापक डॉ. शिवाजीराव उर्फ दाजीसाहेब पटवर्धन यानी आपल्या घरासमोरच्या बाकावर संध्याकाळच्यावेळी सहज गप्पा मारताना केलेलं मुक्त चिंतन आहे.

सुमारे चार वर्षांपूर्वी १९८२ च्या जून–जुलैमध्ये दाजीसाहेबानी आपल्या कुष्ठरोग्यासह शासनाविरुद्ध लढा पुकारला होता. त्यामध्ये त्यांना अंशतः यश आलं, पण शासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे कुष्ठरोग निवारणाचं कार्य करणाऱ्या संस्थेला दाजीसाहेबांच्या अपेक्षेइतकं आर्थिक बळ शासनाकडून मिळू शकलं नाही. त्यामुळे १९८४ मध्ये त्यानी ' तपोवन ' सोडलं.

दाजीसाहेबांच्या या लढ्यामागची भूमिका समजावून घेण्यासाठी १९८२ च्या जुलैत मला ' सकाळ ' तर्फे त्यांच्याकडे पाठवण्यात आलं होतं. अमरावतीला पोचलो, लॉजवर सामान टाकलं आणि काही स्थानिक पत्रकाराची भेट घेतली तेव्हा त्यांनी मला वेगळाच धक्का दिला. ' तू दाजीसाहेबाना भेटण्यासाठी एवढं पुण्याहून आलास खरा, पण ते भेट देतील की नाही कोणास ठाऊक !' एकाने शंका उपस्थित केली ' हो, कारण ते आमच्याशीसुद्धा धड बोलत नाहीत. मला प्रसिद्धीची गरज नाही, अस सागून साफ उडवून लावतात.' दुसऱ्या पत्रकाराची पुष्टी. ' त्यापेक्षा तू असं कर, दाजीसाहेबांच्या कन्या अनुताई भागवत याच आता तपोवनाचं बरचसं काम पहातात. तू त्यांना भेटून सगळी माहिती घे दाजीसाहेबाना भेटण्याच्या फंदात पडूच नकोस.' तिसऱ्याने तोडगा सुचवला.

मी फारच खट्टू झालो. डॉ शिवाजीराव पटवर्धन हे नाव मी त्यापूर्वी तीनचार वेळा ऐकलं होतं. सांगणारा मोठ्या आदराने बोलायचा पण शिवाजीरावाचं कार्य नेमकं कसं चालू आहे हे त्यालाही माहीत नसायच. नुसतेच शब्दाचे बुडबुडे. त्यात प्रसिद्धी–माध्यमं पुरेपूर वापरून घेण्याची कला शिवाजीरावाकडे नसल्याने आणखी पचाईत. अर्थात त्यामुळेच त्यांना भेटण्याची, त्यांची संस्था पाहण्याची तीव्र इच्छा, उत्कंठा मनात होती. आता दाजीसाहेब भेटणं जवळजवळ अशक्यच आहे, असं स्थानिक पत्रकारांनी छातीठोकपणे सांगितल्याने काय करावं, असा प्रश्न निर्माण झाला. पण शेवटी ठरवलं, जाऊन तर बघू. तपोवन संस्था पहाता येईलच. दाजीसाहेबाना भेटण्याचा प्रयत्न करू. मला तुम्हाला भेटण्याची इच्छा नाही, वेळ नाही, अस सांगून त्यांनी उडवून लावल तर परत निघून येऊ त्यानिमित्ताने त्यांचं दर्शन तर घडेल. कुष्ठरोग निवारण्याच्या कार्यातला एवढा दादामाणूस केवळ प्रसिद्धीपराङ्मुखतेमुळे या क्षेत्रातल्या अन्य काहीजणांपेक्षा मागे, अंधारात राहिलेला. त्याने आपल्याला ' तुम्ही पेपरवाली मंडळी काही कामाची नाही. नुसतं खळबळजनक, भडक असेल तेवढंच छापता. तुम्हाला सामाजिक दृष्टिकोन नाही ' असं काही तरी म्हणून झापल तरी फारसं बिघडल कुठे ? तसं झालं तरी आपल्याला अपमानित का वाटावं ? बोलणाऱ्या माणसाचा तेवढा अधिकार असेल तर आपण ते स्वीकारलंच पाहिजे.

## तपोवनात...

माझा निर्णय झाला. दुसऱ्या दिवशी सकाळी उठलो. तडक तपोवन गाठलं. अमरावती शहरापासून जेमतेम सहा किलोमीटर अंतरावर. आदल्या दिवशी स्थानिक पत्रकारानी बरेच डोस पाजले असल्यामुळे सरळ दाजीसाहेबांकडे गेलोच नाही. तपोवनच्या कार्यालयाकडे वळलो तिथे श्री. रवींद्र नेवे हे तरुण कार्यकर्ते बसले होते. ' तपोवन 'च्या कार्यालयीन कामकाजाचा भार ते साभाळत. त्यांना भेटून माझी ओळख दिली आणि दाजीसाहेबाना भेटण्याआधी मला ही संस्था पाहायची आहे, असं सांगितल. श्री. नेवे यानी आस्थेवाईकपणाने माझ्याबरोबर फिरून संपूर्ण संस्था दाखवली. आम्ही बोलत बोलत पुन्हा कार्यालयापाशी आलो तर लांबून एक गृहस्थ येताना दिसले. अंगात कोपरी, गुडघ्यांपर्यंत धोतर. डोक्यावर पंचा टाकलेला. चाल ताठ. ' ते पहा दाजीसाहेब आलेच !' नेवे म्हणाले, आणि मला त्यांच्याकडे घेऊन गेले. त्यांच्याशी ओळख करून दिली. आपल्या चष्म्याआडून दाजीसाहेबानी माझ्याकडे पाहिलं. ' चला ' म्हणाले आणि झपझप चालत आपल्या निवासापाशी आले. मी त्यांच्यापाठोपाठ चालत होतो. मनात अनेक शंका. थोडीशी उगीचच धाकधूक.

घराच्या बाहेरच्या बाजूला व्हरांड्यासारखी जागा. तिथे आम्ही बसलो. घरातून थंडगार पेय आलं दाजीसाहेबांनी विचारपूस सुरू केली. हळूहळू माझी भीड चेपायला लागली. सकाळी 'तपोवना'त फिरताना मला

जाणवलेल्या काही गोष्टीबाबत दाजीसाहेबाकडे आणखी चौकशी करू लागलो. भट्टी जमत होती. माझी भूमिका मुख्यत्वे श्रोत्याचीच होती. बोलता बोलता दाजीसाहेब एकदम थाबले, 'उतरलाय कुठं?' त्यानी विचारलं. लॉजवर! मी सागितल तिथ कशाला? इथेच दोन दिवस राहा. सस्थेमध्ये कुठेही फिरा–काय हवी ती माहिती घ्या आणि तुम्हाला त्यातून जे जाणवले ते लिहा. तुम्ही असं करा. त्या लॉजचा पत्ता आमच्या मेटॅडोरच्या ड्रायव्हरला द्या. त्याच्या जवळ लॉजच्या मॅनेजरला चिठ्ठी द्या. *आमचा ड्रायव्हर सामान घेऊन येईल.*

माझ्या आनदाला पारावार राहिला नाही. एका तपोभूमीत, त्या तपोभूमीच नदनवन फुलवणाऱ्या तपस्व्याच्या सान्निध्यात दोन दिवस!

'तपोवना'तल्या दाजीसाहेबांच्या निवासाशेजारीच पाहुण्यासाठी दोन खास खोल्या बाधलेल्या होत्या. त्यापैकी एक मला देण्यात आली. मी तिथे सामान टाकल. दुपारी जेवण झाल्यावर पुन्हा तपोवनात भटकायला बाहेर पडलो.

सुमारे चारशे-साडेचारशे एकराचा परिसर, प्रवेशद्वारापाशीच उजव्या हाताला *प्राथमिक आणि माध्यमिक शाळा.* कुष्ठरोग झालेली सुमारे साडेचारशे बालक तिथ शिक्षण घेत होती. कुष्ठरोग झालेल्या सुमारे दीडशे जोडप्याचे ससार या परिसरात फुलले होते. त्याच्या अपत्यापैकी सुमारे सत्तर ते ऐंशी टक्के अपत्य पूर्ण निरोगी होती. त्याच्या सगोपनाची स्वतत्र व्यवस्था 'तपोवना'त करण्यात आली होती.

कुष्ठरोग बरा होणाऱ्यांच प्रमाण सुमारे चाळीस टक्के असतं अशा रोगमुक्ताचे सुमारे दोनशे विवाह आतापर्यंत 'तपोवना'मध्ये लावण्यात आले होते. इथे रोगमुक्त झालेले सातजण तर लष्करात भरती झाले.

थोडं पुढे गेल की रुग्णालय. सर्व प्रकारच्या सुविधा आणि मुख्य म्हणजे लक्षणीय स्वच्छता.

कुष्ठरोग्याला स्वावलबी जीवन प्रतिष्ठेने जगता आलं पाहिजे, हा दाजीसाहेबाचा पहिल्यापासून आग्रह. त्यातूनच 'तपोवन'च्या परिसरात हातमाग, यत्रमाग, वह्या तयार करणे, मुद्रणालय, सुतारकाम, लोहारकाम कुक्कुटपालन इत्यादी विविध छोटचा छोटचा उद्योगाच्या शेडस्. तपोवनाची धान्य-भाजीपाल्याची गरज भागवण्यासाठी स्वतंत्र शेती आणि दूध–दुभत्यासाठी सुमारे तीनशे गाई म्हशी.

'तपोवना'च वार्षिक अदाजपत्रकच सुमारे ८४ लाख रुपायाच त्यापैकी शासकीय अनुदानापोटी जेमतेम दहा–बारा लाख बाकी सर्व पैसा या उद्योगधद्यामध्ये तयार होणाऱ्या वस्तुच्या विक्रीतून आणि छोटचा स्वरूपाच्या देणग्याद्वारे उभारला जात होता. लाखालाखाच्या मोठचा देणग्या आणि परदेशी *मदत सरळ नाकारली जात असे.* कारण या व्यक्ती किंवा सस्थाच्या हेतूबद्दल दाजीसाहेब साशक असत.

## पणतीचं काम

सस्थेला आर्थिक सहाय्य करण्याची फारच इच्छा कोणी व्यक्त केली तर ते त्याच्या हातात एक मातीचा चबू देत आणि आमच्या संस्थेच्या नावाने या चबूत रोज एक पैसा टाक आणि वर्षाच्या अखेरीला ३६५ पैसे असलेला हा चबू आम्हाला आणून दे' असं सांगत.

समोरचा दाता चक्रावून जात असे. देणगी देतो, *म्हटल्यावर हातात कटोरे घेऊन रांग* लावणाऱ्याचीच त्याला सवय. इथे एकदम उलटं चित्र. या योजनेमागचं दाजीसाहेबाचं स्पष्टीकरण मोठ मार्मिक होत. ते म्हणायचे 'तू दोन तास काढून इथे आलास, सस्था पाहिल्यासारख केलस आणि भल्या मोठ्या देणगीचा चेक फाडलास, हे मला नकोय. आमच्या सस्थेला तुझ्याकडून फार पैसे मिळाले नाहीत तरी चालेल, पण तुला इथल्या कुष्ठरोग्याच, त्याच्या वेदनेच, समस्याच दररोज स्मरण झाल पाहिजे. म्हणून तू आमच्या सस्थेच्या नावाने रोज एकच पैसा या चबूत टाकत जा!'

'तपोवना'तल्या विविध उद्योगामध्ये सुमारे एक हजार स्त्री–पुरुष कुष्ठरोगी काम करत होते. या कामाचा योग्य मोबदलाही त्याना दिला जात असे सस्थेच्या कार्यकारी समितीवरही त्याच्यापैकी काही जण असत. त्यामुळे कोणी तरी एक व्यक्ती आदेश देत आहे आणि त्याबरहुकुम सस्था चालते अस चित्र इथं नव्हतं. सस्थेच्या निर्णय–प्रक्रियेत कुष्ठरोगी सहभागी झाले होते. किंबहुना या सस्थेचं भवितव्य दाजीसाहेबानी मोठ्या निर्धास्तपणे त्याच्या हाती सोपवलं होतं.

सस्थेत काम करणाऱ्या कुष्ठरोग्यांना त्या कामाबद्दल मोबदला देण्यामागची भूमिका स्पष्ट करताना दाजीसाहेब म्हणाले होते, अलिकडील काळात मला पैसा आणि परमेश्वर एकच वाटू लागले आहेत. माणसाने पैशाच्या मागे अधाशीपणाने धावू नये, हे खरं असलं तरी प्रत्येकाने किमान उपजीविकेपुरता पैसा कमावण्याचा प्रयत्न केलाच पाहिजे. मी काही कमावू शकत नाही, ही *भावना रोग्याला जास्त खच्ची करून टाकते.* म्हणून स्वावलबी, स्वाभिमानी जीवन जगण्याचा आत्मविश्वास कुष्ठरोग्यामध्ये निर्माण करणे आवश्यक आहे. आमच्या सस्थेतल्या विविध उद्योगधद्यामागे तोच हेतू आहे. आम्ही पैशासाठी हात पसरत नाही. एक वर्षी वादळामुळे आमच सुमारे साडेतीन लाख रुपयाच नुकसान झालं. आमच्या कुष्ठरोग्यांनी ते स्वबळावर भरून काढल.

तपोवनातल्या या मुक्कामात एक दिवस आषाढी एकादशीचा होता 'तपोवन'चा तो बत्तिसावा वर्धापनदिन दाजीसाहेबाना आदरणीय असणाऱ्या आचार्य विनोबा भावे यानी १९४६ साली इथे भूमीपूजन केलं आणि १९५० साली सस्थेची वास्तू उभी राहिली.

वर्धापनदिनानिमित्त संस्थेतील उद्योगधद्यांना सुट्टी होती. पण बाकी कोणताही गाजावाजा, सारं गाव गोळा करून समारभाचा बडेजाव नव्हता. संध्याकाळी सामुहिक प्रार्थना झाली. दाजीसाहेबांनी मला यावेळी स्वत जवळ बसवून घेतल. ते स्वतः थोडा वेळ बोलले त्याची शैली उपदेशात्मक भाषणाची नव्हती. सहज सभाषणाची होती. स्वावलबनाचा महत्त्वाचा पुनरुच्चार करून त्यांनी अतिशय आटोपशीर पद्धतीने हे संभाषण सपवलं आणि उपस्थित आश्रमवासी कुष्ठरोग्याना माझा परिचय करून देऊन 'आता हे तुमच्यापुढे बोलतील' अस सागितलं. तो एक प्रचड अनपेक्षित धक्का होता दाजीसाहेबासारख्या तपस्व्याने आपल्यासारख्या जीवनात फारस काहीच कर्तृत्व नसलेल्या माणसाला त्यांच्या सस्थेच्या वर्धापनदिनी ही संधी द्यावी, हे गौरवास्पद निश्चितच वाटल

पण त्यापाठोपाठ एक प्रकारची शरमिंदेपणाचीही भावना मनात उत्पन्न झाली. स्वत:च्या वेदना गाडून नियतीशी दोन हात करणाऱ्या त्या कुष्ठरोग्यापुढे मी काय बोलू शकणार होतो ? आणि तेही दाजीसाहेबांच्या उपस्थितीत ? यामध्ये त्या तपोवृद्धाच्या मनाचा मोठेपणा मला जाणवत होता आणि त्याचबरोबर स्वत:च्या क्षुद्रत्वाचीही जाणीव मनाला बोचत होती. पण आता पर्याय नव्हता. महाविद्यालयीन पातळीवरील वक्तृत्व स्पर्धांची सवय असल्याने मी वेळ मारून नेली खरी. पण ह्या बोलण्याची पातळीही त्यापेक्षा फारशी वरची नव्हती असं मला आजही वाटत. स्वत: विषयी गौरव आणि शरमिंदेपणा या दोन्ही भावना मनात एकाच वेळी कशा निर्माण होऊ शकतात, याचा विचित्र अनुभव या प्रसंगातून आला.

सूर्य अस्तंगत झाला म्हणून काय झाल, पणतीने आपलं काम केलंच पाहिजे, या भावनेतून दाजीसाहेबांनी कुष्ठरोग निवारणाचे हे खडतर व्रत स्वीकारलं होतं. त्यामागचे त्याचे अनुभवही दाहक होते.

## तपोवनाची सुरुवात

तो १९४२ चा काळ होता. अमरावतीच्या परिसरात हिंडताना एका रस्त्याच्या कडेला दाजीसाहेबांना एक रोगी दररोज दिसायचा. पण एक दिवस तो दिसला नाही. दाजीसाहेबांनी चौकशी केली तेव्हा कळल की, त्याने कुष्ठरोगाला कटाळून शेजारच्या विहिरीत जीवन संपवलं होत.

आणखी काही दिवस गेले. दाजीसाहेब अमरावतीहून वरूडला चालले होते. वाटेत एके ठिकाणी लोकांचा बराच गलका ऐकू आला. दाजीसाहेब त्या दिशेने गेले. तिथे एक मृतदेह पडलेला होता आणि काही कुत्री त्याचे लचके तोडत होती. भोवताली जमलेले लोक त्या कुत्र्यांना दूर हाकलण्याचा प्रयत्न करत होते. पण त्या मृतदेहाला हात लावायला कोणी तयार नव्हतं कारण तो एका कुष्ठरोग्याचा मृतदेह होता.

या घटनेनंतर मात्र दाजीसाहेब अतिशय अस्वस्थ झाले. त्या अस्वस्थतेला विधायक आकार मिळाला. श्री जगदंबा कुष्ठनिवासाची स्थापना झाली.

मुक्कामात जेवण दाजीसाहेबांबरोबरच व्हायचं. त्यांच्या पत्नी कै. सौ. पार्वतीबाई, अलिकडील काळात 'तपोवन'ची बरीचशी जबाबदारी समर्थपणे अंगावर घेतलेल्या कन्या अनुताई आणि माहेरपणाला आलेल्या नात सौ. अंजली वझे याही काही वेळा तिथे असायच्या. जेवताना गप्पा भरपूर व्हायच्या. बोलता बोलता कळल की, दाजीसाहेबांचा प्रेमविवाह होता. या प्रखर तत्वनिष्ठांबरोबर आयुष्य बांधून घेणं काही सोपं नव्हतं. पण कै. सौ पार्वतीबाईंनी बोलण्याच्या ओघात सहज सांगून टाकल, 'यांच्याशी लग्न केलं ते झोपडीत राहण्याची तयारी ठेवूनच !'

जन्मठेपेची शिक्षा झालेल्या कुष्ठरोग्यांना 'तपोवना'त आणून त्यांच्यावर उपचार करण्याचा देशातील अभूतपूर्व प्रयोग दाजीसाहेब करत होते. आत्तापर्यंत असे सुमारे अडीचशे कुष्ठरोगी या ठिकाणी उपचारासाठी येऊन गेले होते. सध्या तिथे पंधराजण उपचार घेत होते. त्यांच्यात एक महिलाही होती. त्यांना भेटण्याची इच्छा मी व्यक्त केली. दाजीसाहेबांनी त्यांच्यापैकी काहीजणांना बोलावून घेतल आणि मग मी त्यांच्याशी गाठ घालून देऊन ते तिथून निघून गेले. हळूहळू मंडळी बोलू लागली. 'न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा देऊन आमच्यावर 'खुनी माणूस' म्हणून शिक्कामोर्तब केल त्यामुळे कोणी फारस बोलायला तयार नसायच. त्यातून तुरुंगात असताना कुष्ठरोग जडल्याने जवळची माणसही लांब पळू लागली. अशा तऱ्हेने समाजाने आमच्यावर दुहेरी बहिष्कार टाकला.'

'पण दाजीसाहेबांनी आम्हाला इथे आणलं आणि आमचं जीवनच बदलून गेल. जेलपेक्षा इथे जास्त स्वातंत्र्य तर आहेच, शिवाय तिथे क्वचितच लाभणारा माणुसकीचा ओलावाही आहे. इथे काम करून मिळणाऱ्या पैशांपैकी थोडे पैसे आम्ही घरच्या माणसांना पाठवतो. त्यामुळे त्यांच्याशीही संबंध राहतो. शिक्षेची मुदत संपल्यावर घरी जाता आल तर नव्यानं जीवन सुरू करता येईल अशी उभारी आणि आत्मविश्वास दाजीसाहेबांनी आम्हाला इथे अजून दिला आहे.'

अर्थात हे त्या मंडळींच्या बोलण्याचं सार आहे. पण दाजीसाहेबांच्या अनोख्या प्रयोगाच्या यशाची पावती त्यातून मिळत होती.

या प्रयोगामागची भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले होते, 'कुष्ठरोग हा केवळ शारीरिक आजार नाही. तो मुख्यत्वे सामाजिक आणि मानसिक आजार आहे. आपल्याला समाजाने बहिष्कृत केल आहे, या जाणीवेमुळे रोगी जास्त खचतो. वैद्यकीय उपचाराबरोबरच हे मानसिक खच्चीकरण थांबवण्याचे प्रयत्न आम्ही इथे करत आहोत.'

मानसिक ताणामुळे कुष्ठरोग बळावतो, असं लक्षात आल्याने सरकारची खास परवानगी काढून जन्मठेपेची शिक्षा झालेले कुष्ठरोगी आम्ही इथे आणायला सुरुवात केली. त्यांच्या भोवतालच्या वातावरणात बदल झाला आणि त्याचा अनुकूल परिणाम त्यांच्या प्रकृतीवर दिसू लागला.

## शासनाविरुद्ध संघर्ष

१९८२ च्या जुलै महिन्यातच दाजीसाहेबांनी कुष्ठरोग्यांसह 'जेल भरो आंदोलन' पुकारण्याचा इशारा दिला होता. अर्थात हे आंदोलन त्यांच्या संस्थेच्या मागण्यांसाठी नव्हत, तर कुष्ठरोगाच्या गंभीर समस्येकडे समाजाचं लक्ष वेधण्यासाठी आणि देशातील कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने शासनाने कायमस्वरुपी योजना आखावी या मागणीसाठी होत. दाजीसाहेब म्हणाले होते, 'जगातील एकूण कुष्ठरोग्यांपैकी सुमारे एकतृतियांश कुष्ठरोगी एकट्या भारतात आहेत. म्हणून हा जागतिक प्रश्न समजून सोडवण्यात यावा असं जागतिक आरोग्य संघटनेने आपल्याला १९७९ साली कळवल. त्यानंतर राष्ट्रीय नियोजन समितीचे माजी सदस्य डॉ. स्वामीनाथन यांच्या अध्यक्षतेखाली या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी एक उच्चाधिकार समिती नेमण्यात आली. या समितीने सादर केलेल्या अहवालामध्येही, कुष्ठरोग निवारणासाठी राज्य पातळीवर कालबद्ध योजनेची आवश्यकता असल्याचं प्रतिपादन करण्यात आलं होतं. प्रत्येक राज्याचे मुख्यमंत्री या योजनेच्या अध्यक्षपदी असावेत आणि आरोग्यमंत्र्यांनी सचिव म्हणून काम पहावं, असंही समितीने सुचवलं होत. पण त्यानंतर फारसं काहीच घडल नाही.

महाराष्ट्र शासनाच्याही दप्तरी अशाच



साधं-सौम्य व्यक्तिमत्त्व

स्वरुपाचा एक अहवाल गेली सुमारे वीस वर्षं धूळ खात पडला असल्याचा आरोप करुन दाजीसाहेब पुढे म्हणाले होते, 'राज्यात सध्या सुमारे सोळा हजार स्त्री–पुरुष आणि बत्तीस हजारापेक्षा जास्त बालकं कुष्ठरोगग्रस्त आहेत. पण त्याबाबत उपाययोजनेचं काम, राज्याच्या आरोग्य खात्याच्या अखत्यारीत येतं की, समाजकल्याण खात्याच्या, या वादामध्ये कुष्ठरोग निर्मूलन योजनेचं गाडं रुतून बसलं आहे.

'जेलमधल्या कैद्यांवर शासन भरपूर पैसा खर्च करतं; पण कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी मात्र काहीही केलं जात नाही. श्रमजीवी माणसाला केवळ कुष्ठरोगामुळे समाजात प्रतिष्ठेने जगता येत नसेल तर तुरूंग हेच त्याचं एकमेव आश्रयस्थान राहातं. तिथे तरी काम करून तो स्वतःचं पोट भरू शकेल.'

नव्वदीतले दाजीसाहेब तरुणाच्या उसळतेपणाने बोलत होते; पण त्यांना हे 'जेल भरो आंदोलन' फारसं रेटावं लागलं नाही. कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी ठोस पावलं उचलण्याची हमी शासनाने दिली. मात्र दुर्दैवाने तेही आणखी एक पोकळ आश्वासन ठरलं. कुष्ठरोग निवारणातील या भीष्माचार्यांचा संघर्ष चालूच राहिला.

कुष्ठरोग्याची सेवा म्हणजे समाजाने केलेल्या पापाचं प्रायश्चित घेणं आहे, असं महात्मा गांधींचे कट्टर अनुयायी असलेले दाजीसाहेब मानत असत. त्या संदर्भात बोलताना ते म्हणाले होते. 'समाजाच्या राहणीमानावर कुष्ठरोगाचं प्रमाण आणि स्वरूप अवलंबून असतं. गलिच्छ राहणी, अपुरा आहार, वाढत्या झोपडपट्ट्या आणि या साऱ्याचा उगम असणारे भयानक दारिद्र्य यातून कुष्ठरोगाचा प्रसार होतो.

रशिया, चीन किंवा जपानप्रमाणे आपल्या देशात या रोगाचं उच्चाटन होऊ शकलेलं नाही, याला इथल्या समाजाच्या विविध क्षेत्रांमधील नेतृत्व जबाबदार आहे. समाजात कुष्ठरोगी जितके जास्त तितकी त्या समाजातली मानवता नष्ट झाली आहे, असं समजावं. या मानवतेच्या मूल्यालाच कुष्ठरोगी आव्हान देत असतो. आवाहनही करत असतो; पण समाज मात्र त्याच्याकडे बहुतेक वेळा पाठच फिरवतो. त्यामुळे समाजाच्या या पापाचं प्रायश्चित कोणी तरी घेतलंच पाहिजे.'

## सुखदुःखे समेकृत्वा

दोन–तीन दिवसांच्या त्या मुक्कामात इतरही अनेक विषयांवर दाजीसाहेब बोलत असायचे. स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेस पक्षांमध्ये काम करताना त्यांनी पाहिलेल्या राजकारणाच्या तुलनेत देशातल्या सध्याच्या राजकारणाची, राजकीय नेतृत्वाची पातळी फारच घसरली आहे, असं त्यांचं मत होतं. याला अपवाद–इंदिराजी! त्यांच्या खंबीर नेतृत्वाबद्दल दाजीसाहेब आदराने बोलत. 'अरे ती बाई आहे म्हणून आज आपण इतपत तरी आहोत' असे स्पष्टपणे कबूलकरत. पं.जवाहरलाल नेहरूंचं साहित्यिक मन आणि एम. एन. रॉय यांचा नवमानवतावाद हे दाजीसाहेबांचे आणखी दोन वीक पॉइंट. नेहरू हे त्यांना राजकारणी म्हणून फारसे कधी भावलेच नाहीत 'त्या माणसाचा खरा पिंड साहित्यिकाचाच,' असं त्यांचं ठाम मत होतं. रॉयचा नवमानवतावाद ही आधुनिक जगाला मिळालेली मोठी वैचारिक देणगी आहे, असं दाजीसाहेब म्हणत. अर्थात, समाजातली माणुसकी जितक्या प्रमाणात नष्ट झाली असेल तितकं त्या समाजामध्ये कुष्ठरोगाचं प्रमाण जास्त, असं मानणाऱ्या दाजीसाहेबांना रॉयचं तत्वज्ञान अपील होणं स्वाभाविकच होतं.

वृत्तपत्रांची घसरलेली विश्वासार्हता भडकपणाकडे वाढलेली ओढ आणि समाजातली उदासीन वृत्ती या दोन मुद्द्यांवर दाजीसाहेब कळवळून बोलत. 'तुमच्या पिढीनं यात बदल घडवून आणला पाहिजे', असं बजावत या संदर्भात लोकमान्यांच्या लेखणीचे आणि वाणीचे दाखले देताना दाजीसाहेबांच्या अंगात एक निराळाचा जोष संचारत असे.

एक दिवस संध्याकाळी असेच आम्ही दाजीसाहेबांच्या घराबाहेर बसलो असताना मानवी जीवनातले स्त्री–पुरुष संबंध हा विषय निघाला आणि दाजीसाहेबांनी पुरुषाचा चंचलपणा, उथळपणा व स्त्रीची निर्मितीची अंतःस्फूर्ती यावर अतिशय स्पष्ट शब्दात निरुपण सुरू केले. त्यांच्याजवळ उदाहरणादाखल अनुभवांचा तुटवडा तर नव्हताच. त्यामुळे विषय रंगतच गेला. तिकडे तुमच्या वेद–पुराणात काहीही असो, पण पुरुष आणि स्त्री या दोन अतिशय भिन्न प्रकृती जवळ येतात त्यावेळी पुरुषाचे हेतू अतिशय संकुचित, उथळ असतात, तर स्त्रीला नवनिर्मितीची स्वप्नं पडत असतात, अशी अतिशय प्रभावी मांडणी दाजीसाहेबांनी केली याच संदर्भात स्त्रीमधली शक्तीस्थाने आणि काही वेळा अगम्य वाटणाऱ्या प्रतिक्रियांचीही उदाहरणं त्यांनी दिली व आपण पुरुषमंडळी हे सारे जाणून घेण्यात फार थिटे पडतो, अशी पुस्तीही जोडली.

कुष्ठरोगाचा विषय निघाला की मात्र त्यांचा चेहरा एकदम बदलत असे. 'कुष्ठरोग्यांचं हे जगच निराळं आहे. इथली मूल्यं निराळी. इथली दुःख–वेदना निराळी आणि आनंदही निराळाच!' दाजीसाहेब एकदम गप्प होत. नजर कुठेतरी शून्यात लागलेली असे. टपोऱ्या गारांचा पाऊस पडून आकाशाने पुन्हा नितळ व्हावे तसे होऊन जायचे.

दाजीसाहेबांचे व्यक्तिमत्त्व अतिशय साधं, सौम्य. समोरच्या व्यक्तीला मोहीत करावं, स्वतःकडे खचून घ्यावं, आपल्या वक्तव्याने प्रभावित करून सोडावं असा हेतू कुठेच नाही. तसा आवेश किंवा प्रयत्नही नाही. तुमच्या बोलण्यावरच्या प्रतिक्रियाही तशाच. काही वेळा तर काही प्रतिक्रियाच नाहीत. 'सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ, जयाजयौ'

किंवा 'तुल्य निंदा स्तुतिमौनी' अशी काही तरी स्थितप्रज्ञाची वर्णन गीतेमध्ये केली आहेत. दाजीसाहेबांच्या सहवासात मला त्या ओळी उगीचच पुन्हा पुन्हा आठवत होत्या. खडकावर आदळणाऱ्या धबधब्यापेक्षा भोवताली हिरवळ फुलवत जाणारा झरा जास्त आनंद देतो दाजीसाहेबांचं व्यक्तिमत्त्व त्या झऱ्यासारखं होतं.

—सतिश कामत

---

इस्लामी कुटुंब कायदा विधेयक

# मलेशियात शरीयत कायद्यात सुधारणा

शहाबानो प्रकरण गेले वर्षभर गाजतेच आहे. राजकीय दृष्टया सर्वांनी त्याचे केलेले भांडवल आणि त्यानंतर सत्ताधारी पक्षाने स्वीकारलेली माघार याचे इतर परिणाम काहीही असले तरी भारतातील मुस्लिम स्त्रीवर जो भयानक अन्याय होत आहे, घटस्फोटाची तलवार सतत डोक्यावर टांगती राहून तिचं जिणं किती असह्य होत आहे त्याबाबत काहीच पावले उचलली जात नाहीत. त्यासंबंधी काहीही करणे म्हणजे शरीयतचे वर्चस्व धोक्यात आणणे आहे, अशीच मुस्लिम समाजाची समजूत आहे. ती तशीच राहू दिली जाते. तलाक मुक्ती मोर्चावर दगडफेक केली जाते. या साऱ्या विचाराचे पडसाद कानात घुमत असतानाच इथे मलेशियात जिथे देशातील ५५% जनता मुस्लिम आहे आणि राष्ट्राचा धर्मच इस्लाम आहे अशा ठिकाणी इस्लामी कुटुंब कायद्यामध्ये काही सुधारणा जाहीर झाल्याचं वाचनात आलं. शरीयतमध्ये बदल? आणि तोही या देशात? साहजिकच त्यासंबंधी अधिक माहिती मिळविण्याची उत्सुकता वाढली. इथल्या Association of Women Lawyers च्या अध्यक्ष श्रीमती नूर फरीदा अरीफीन यांनी त्यासंबंधी नुकताच एक प्रबंध सादर केला. त्यावरून व युनिव्हर्सिटीतील कायदेशास्त्राच्या प्राध्यापिका श्रीमती मेहरून यांच्याकडून बरंच काही हाताशी आलं.

हे इस्लामी कुटुंब कायदा विधेयक नोव्हेंबर १९८४ मध्येच संमत करण्यात आलंय. या विधेयकातील विवाह, घटस्फोट, पोटगी आणि संपत्ती विभाजन याविषयीची कलमे इथल्या मलायी (मुस्लिम) स्त्रीला खासच आशेचे किरण दाखविणारी आहेत.

(१) सर्वप्रथम आजपर्यंत इथे विवाहासाठी कमीतकमी वयाचे बंधन नव्हते. नवीन विधेयकाप्रमाणे स्त्रीसाठी कमीत कमी १६ वर्षे व पुरुषासाठी १८ वर्षे ही वयोमर्यादा ठरवण्यात आली आहे.

(२) नवीन विधेयकाने विवाहाची नोंदणी सक्तीची करण्यात आली आहे. विशेषत. पुरुष जेव्हा दुसरे, तिसरे लग्न करणार असेल त्याबाबत तर ही नोंदणी विशेष महत्त्वाची याआधी ही दुसऱ्या, तिसऱ्या विवाहाची नोंदणी सक्तीची नव्हती. पण नवीन विधेयकाप्रमाणे दुसरा विवाह करण्यासाठी शरीयतची परवानगी घेऊनच नोंदणी करायची. शरियतच्या परवानगीसाठी एक अर्ज दाखल करावा लागतो त्यामध्ये नवीन विवाहाचे कारण, नवीन विवाहाची गरज का आहे त्याचे स्पष्टीकरण, स्वतःची सांपत्तिक स्थिती, स्वतःवर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती, नवीन विवाहामुळे त्यात पडणारी भर वगैरे गोष्टींचे तपशील द्यावे लागतात.

(३) सर्वात महत्त्वाची गोष्ट— नवीन विवाहासाठी पहिल्या पत्नीची संमती घेतलीच पाहिजे. आजपर्यंत ही सक्ती नव्हती. नवीन विवाहाचा अर्ज दाखल करायचा तो सुद्धा पहिल्या पत्नीच्या उपस्थितीतच केला पाहिजे या सर्व गोष्टी विचारात घेऊन शरीयत परवानगी देईल तरच विवाह करता येईल.

शरीयतचा निर्णय मान्य नसेल तर अर्जदार किंवा त्याची पत्नी पुन्हा अपील करू शकतात. आजपर्यंत हे सुद्धा शक्य नव्हते.

(४) शरीयतच्या परवानगीशिवाय दुसरा विवाह केला तर ते या नवीन कायद्याचे उल्लंघन समजून त्यासाठी दंड आणि/किंवा तुरुंगवास अशी शिक्षा ठरवण्यात आली आहे.

परवानगी देण्यापूर्वी दुसरा विवाह न्याय्य आहे का यासंबंधी शरीयत पूर्ण खात्री करून घेईल.

(५) घटस्फोटासंबंधीचे अतिशय महत्त्वाचे पाऊल या विधेयकाने उचलले आहे. आजपर्यंतचा जबानी तलाक अमान्य करण्यात आला आहे. घटस्फोटासाठी शरीयतकडे अर्ज केलाच पाहिजे अशी सक्ती करण्यात आली आहे न्यायालयाच्या बाहेर किंवा परवानगीशिवाय घटस्फोट घेतल्यास त्याला दंड वा तुरुंगवासाची शिक्षा फर्मावण्यात येईल.

न्यायालयाकडे अर्ज दाखल करायचा तो सुद्धा पत्नीच्या उपस्थितीतच कारण पत्नीची परवानगी आहे की नाही हे न्यायालयाला निश्चित कळले पाहिजे. संमती नसेल किंवा न्यायालयाला त्याचे विवाहसंबंध टिकण्याची शक्यता वाटत असेल तर न्यायालय तीन व्यक्तींचे कौन्सिल नेमेल आणि पुनर्मिळवणीसाठी प्रयत्न करेल. तो अयशस्वी झाला तरच घटस्फोटाला परवानगी मिळेल.

### कायदेशीर फिर्याद

याहीपुढचा आणखी महत्त्वाचा बदल म्हणजे आजपर्यंत मलायी स्त्रीला तलाक मागायचा हक्क नव्हता. स्त्रीला विवाहबंधन तोडण्याची इच्छा असली तरी जोपर्यंत नवरा घटस्फोटाला तयार नाही किंवा तो घटस्फोट मागत नाही तोपर्यंत पत्नी किंवा काजी काहीही करू शकत नव्हते. पण नवीन विधेयकाने स्त्रीला तलाक मागण्याचा हक्क मिळाला आहे त्यामुळे आता तिची कुचंबणा बरीच कमी होईल

एक वर्षपर्यंत नवरा गायब असेल तर, तीन महिने नवऱ्याने आर्थिक मदत दिली नसेल तर, नवरा तीन किंवा त्याहून अधिक वर्षे तुरुंगात असेल तर, काहीही कारण नसता पतीने विवाहबंधन पाळले नसेल तर, पती क्रूर वागणूक देत असेल, शारीरिक छळणूक करत असेल तर किंवा वेडा, सांसर्गिक रोगाने पछाडला असेल तर, सक्तीने विवाह लावून दिला असेल तर अशा न्याय्य कारणांसाठी स्त्री आता घटस्फोटाची दाद न्यायालयाकडे मागू शकते.

(७) पोटगीबाबत : घटस्फोटानंतर तीन महिनेपर्यंतच्या पोटगीशिवाय घटस्फोट अन्याय्य करणासाठी असेल, तर पत्नी पतीकडून एकरकमी मोठी रक्कम नुकसान भरपाई म्हणून मिळावी यासाठी अर्ज करू शकते आणि न्यायालयही पतीला ही वाजवी रक्कम देण्यास भाग पाडते.

याच तत्त्वावर न्यायालय पत्नीला सुद्धा नुकसान भरपाई द्यायला सागू शकते पत्नीने घटस्फोट मागितला आणि पती शारीरिक मानसिक दृष्टया पैसे मिळवण्यास असमर्थ असेल तर पत्नीने (ऐपत असल्यास) नुकसान भरपाई द्यायला हवी.

(८) मुलाच्या संगोपनाची आर्थिक जबाबदारी पूर्णपणे वडिलावरच आहे. आजपर्यंत मूल १५ वर्षाचे होईपर्यंतच ही जबाबदारी होती. पण नवीन कायद्याप्रमाणे ही वयोमर्यादा १८ वर्षेपर्यंत वाढवली आहे. त्याशिवाय जर यापुढेही मूल उच्च शिक्षण घेऊ इच्छित असेल तर शिक्षणक्रम पूर्ण होईपर्यंत वडिलांनी ही जबाबदारी उचलली पाहिजे.

(९) घटस्फोटानंतर स्त्रीला रहात्या घरात रहाण्याचा हक्क या विधेयकाने मिळाला आहे. मुले मोठी झाली आणि त्याच्या पोषणाची जबाबदारी कमी झाली किंवा स्त्रीने पुनर्विवाह केला तर तिचा त्या घरात रहाण्याचा हक्क नाहीसा होतो.

(१०) घटस्फोटाचा अर्ज दाखल केलेल्या काळात किंवा घटस्फोटानंतर पती जर पत्नीला मारहाण करत असेल तर पत्नी न्यायालयाकडे कायदेशीर फिर्याद करू शकते व न्यायालयही पतीला छळवणूक थाबवण्याची आज्ञा कायदेशीर रीतीने करू शकते. आजपर्यंत या दोन्ही गोष्टी शक्य नव्हत्या. या बदलाने नवीन विधेयकाने स्त्रीच्या सुरक्षिततेची काळजी घेतली आहे

## परंपरावाद्यांची भीती

अशा रीतीने हे नवीन विधेयक मलायी मुस्लिम स्त्रीला काही नवीन हक्क मिळवून देणारे व तिच्या वरील आजपर्यंतचा अन्याय कमी करणारे आहे याबद्दल वादच नाही. खरं तर इस्लाम धर्माचा पुरस्कार करणाऱ्या राष्ट्रामधील स्त्री जीवनाचा विचार केला तर मलेशियातील मुस्लिम स्त्री खूपच नशीबवान म्हटली पाहिजे. बुरखा तर इकडे कुठे दिसतच नाही. मुलामुलीच्या संमिश्र विद्यापीठामधून मुली शिक्षण घेऊ शकतात. नोकरी, व्यवसाय यामध्ये जिकडे तिकडे मुली-स्त्रिया सहज दिसतात. वकील, डॉक्टर्स प्राध्यापक यापैकी कुठल्या व्यवसायात त्याना मज्जाव नाही सरकारच्या न्याय आणि कायदा खात्यामध्ये जवळ जवळ ३०% स्त्री कर्मचारी आहेत व्यवस्थापन किंवा दूतावास यामधील १०% कर्मचारी स्त्रिया आहेत. इतकच काय युगोस्लाव्हियामधील मलेशियन राजदूत एक महिला आहे कॅबिनेटमध्ये चार मुस्लिम स्त्रिया आणि एक चिनी स्त्री आहे. पैकी चार स्त्रिया उपमंत्री आणि एक स्त्री मंत्री आहे. सध्याचे सरकार त्या दृष्टीने उदारमतवादीच म्हटले पाहिजे,

काही मुस्लिम राष्ट्रामध्ये स्त्रियाना संमिश्र विद्यापीठातून शिक्षण घेणें, नोकरी करणें किंवा मोटार चालविणे या गोष्टीसुद्धा शक्य नाहीत. त्यामानाने मलेशिया खूपच सुधारलेला आहे. मलायी स्त्री पूर्वीपासूनच कुटुंबाचा आर्थिक भार उचलते आहे. शेतीप्रधान खेड्यामध्ये शेतीच्या कामात मदत करणे किंवा दुकान चालविणे, भाजीबाजारात भाजी विक्रीचे काम करणें, वेतकाम करून विकणे या सर्व गोष्टी पूर्वापार चालू आहेत देशात औद्योगिकरणानंतर कारखान्यात काम मिळू लागले, तेव्हा ती कारखान्यात काम करू लागली. डॉ नोरायनी अब्दुल्ला— (विद्यापीठातील राज्यशास्त्राच्या प्राध्यापक)—त्याच्या 'मलायी स्त्रीचे सामाजिक जीवन' या प्रबधात म्हणतात की, 'मलेशियात स्त्री—पुरुष समानता आहे पण ती मर्यादित स्वरुपात आहे. राजकारणात, सामाजिक क्षेत्रात वगैरे मात्र स्त्रीचा सहभाग बरोबरीचा न मानता पूरक किंवा मदतनीस म्हणून समजला जातो. मलायी स्त्रीसुद्धा पुरुषी वर्चस्वाचा समतोल कौशल्याने साभाळतच आपला विकास साधत आली आहे.'

आजकाल मात्र येथे इतर सर्व देशाप्रमाणेच इस्लामी परंपरावाद्याचा प्रभाव दिवसेंदिवस वाढतो आहे. आणि या प्रभावामुळें स्त्रीच्या विकासाला खीळ बसण्याचा धोका निर्माण झाला आहे. कारण स्त्रीला कमी लेखणें, तिला पुरेसे अधिकार न देणे याला ही मंडळी धर्मनियमाचा आधार देतात. पण वर उल्लेखिलेले नवीन विधेयक हे स्त्रियांनी हर प्रयत्नाने त्यावर मिळवलेला विजयच आहे.

१९६० साली केलेल्या एका सामाजिक पाहणीत असे आढळून आले होते की मलेशियात घटस्फोटाचे प्रमाण फारच वाढले आहे. इतके की सर्व मुस्लिम राष्ट्रात ते सर्वाधिक आहे. त्यावर मग काही विचारवंत स्त्रियानी कृती करण्याचे ठरवले आणि मग कायद्यामध्येच सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न सुरू झाले UMNO (United Malayan National Organisation) या इथल्या प्रमुख राजकीय पक्षाच्या महिला शाखेचे प्रयत्न, नॅशनल कौन्सिल ऑफ वुमेन्स ऑर्गनायझेशन (१५० महिला संस्था याच्या सदस्य आहेत ) या सस्थेनें लावलेला हातभार आणि Association ot women Lawyers विशेषत. त्याच्या अध्यक्ष श्रीमती नूर फरीदा या प्रागतिक विचारसरणीच्या सस्थेने धरलेला जोर या सर्वांचे फलीत म्हणजेच हे 'इस्लामी कुटुब कायदा विधेयक १९८४' होय. या विधेयकामुळे बहुविवाह व घटस्फोट याना बराच आळा बसेल हे त्यातील सुधारणा पाहिल्यावर सहज लक्षात येईल. आपल्या देशातील गेल्या वर्षभरातल्या घटनाच्या पार्श्वभूमीवर त्याचे महत्व विशेष वाटते. शरीयतच्या कक्षेत राहूनसुद्धा बदलत्या काळाच्या गरजाप्रमाणे स्त्रीला न्याय्य हक्क मिळवून देणे शक्य आहे, हेच त्यामुळे सिद्ध होते. स्त्रीच्या वाजवी हक्कासाठी काम करणाऱ्या तळमळीच्या कार्यकर्त्या आणि त्याचे महत्व जाणणारे उदार मतवादी सरकार त्यामुळेंच मलेशियासारखा छोटा देश असे मोठे पाऊल उचलू शकतो.

— सुजाता तांबे
मलेशिया

□

# अनावृत्त पत्र

श्रीयुत राजीव गांधी
माननीय पंतप्रधान
भारत सरकार
नवी दिल्ली

सादर सप्रेम नमस्कार

आपण पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारल्याला आता एकवीस महिने झाले भारत अत्यंत कठीण परिस्थितीत असता आपण पंतप्रधानपदाची अवघड अशी जबाबदारी स्वीकारलीत. आपणाला राजकारणाचा प्रदीर्घ अनुभव नव्हता व प्रशासनाचा तर मुळीच नव्हता. आपण राजकारणात प्रवेश केल्यापासून अवघ्या चार वर्षांत पक्षाचे व देशाचे नेतृत्व करण्याची पाळी आपल्यावर आली. भले भले अशा वेळी भांबावून जातात, परंतु आपण अत्यंत शांत वृत्तीने आणि धैर्याने या प्रसंगाला सामोरे गेलात. चार वर्षांच्या आपल्या राजकीय जीवनात आपण आपली 'श्रीयुत स्वच्छ' अशी प्रतिमा तयार केली होतीत. त्यामुळे आपण पंतप्रधान झाल्यावर व पक्षाचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर राजकारणातील सर्व घाण धुवून काढली जाईल व स्वच्छ राजकीय जीवनाचे दर्शन घडेल अशी आशा वाटत होती. आपल्याला अनुभव नव्हता तरी आपण तरुण व स्वच्छ मनाचे व चारित्र्याचे होतात म्हणूनच भारताचे राजकीय व सामाजिक चित्र पालटेल असे वाटत होते.

आपण सत्तासूत्रे स्वीकारल्यानंतरचे दोन महिने निवडणुकीच्या धामधुमीतच गेले. मतदारांनी प्रचंड मताधिक्याने आपल्याला निवडून दिले यावरून आपल्या ठायी लोकांची किती दृढ आशा होती हेच सिद्ध होते. आपणही निवडणुकीनंतर आश्वासनपूर्तीचे राजकारण सुरू केलेत. निवडणुकीनंतरच्या पहिल्याच लोकसभा अधिवेशनात पक्षांतरविरोधी कायदा आणून लोकांचा प्रचंड विश्वास संपादन केलात. त्यानंतर पंजाब व आसामचे प्रश्न समझोत्याने सोडविलेत. उभय राज्यात निवडणुका घेऊन लोकप्रिय सरकारांची राजवट आणलीत. आपल्या पक्षाचा दोन्ही राज्यात पराभव झाला तरीही आपण त्या राज्यातील प्रादेशिक पक्षाच्या सरकारांना राजवट स्थिर करण्यास सहकार्य दिलेत यात आपल्या उदार दृष्टिकोनाचा प्रत्यय आला. आपले परदेश दौरेही यशस्वी झाले परदेशात आपली व त्याबरोबर भारताची प्रतिमाही वृद्धिंगत झाली.

काँग्रेस शताब्दी समारंभात आपण जे भाषण केलेत व सत्तेच्या दलालांची हजेरी घेतलीत ते वाचून तर खात्रीच पटली की काँग्रेस पक्षाचे शुद्धीकरण होणार. काँग्रेस पक्षांतर्गत निवडणुकाही आपण जाहीर केल्यात. काळा पैसा व आर्थिक गैरव्यवहार, करचुकवेपणा शोधून काढण्यासाठी मोठ्या उद्योगपतींच्या कचेऱ्या व घरे यावर आयकर अधिकाऱ्यांनी धाडी घालण्याचे सत्र सुरू केले. प्रशासन सुधारणे, लाचलुचपत धुऊन काढणे आदी दृष्टीने केलेल्या या सर्व उपाययोजना लोकांना पसंत होत्या. कारण लोकांना या सर्वांतून चांगल्याचे किरण दिसत होते.

परंतु या सर्व गोष्टींचा उलटा प्रवाह सुरू झाला आहे अशी धास्ती वाटते. पंजाबचा प्रश्न सोडविण्यासाठी आपण संत लोंगोवाल यांच्याशी घडवून आणलेला तो समझोता म्हणजे कागदावर टाईप केलेले अर्थहीन शब्द झाले आहेत. कारण आज पंजाबमधील स्थिती दोन वर्षांपूर्वी जशी होती तशीच झाली आहे. दोन वर्षांत चार राज्यपाल झाले, निवडणुका होऊन अकालींचे राज्य आले, परंतु पंजाब शांत झालेला नाही. पुन्हा अतिरेक्यांच्या खूनखराब्याचे सत्र सुरू झाले आहे. सुवर्णमंदिराच्या आवारात पुन्हा एकदा सशस्त्र पोलीस घुसवावे लागले. करारात नमूद केल्याप्रमाणे २६ जानेवारी १९८६ रोजी चंदिगडचे हस्तांतर पंजाबकडे झाले नाही याचा फायदा अतिरेकी व त्यांचे साथीदार उठवीत आहेत. पंजाबमधील कोणता हिंदी भाषिक भाग हरयाणात समाविष्ट करावयाचा याचा निकाल लागत नाही तोपर्यंत चंदिगडचे हस्तांतर अशक्य आहे आणि तोपर्यंत पंजाबात शांतताही अशक्य आहे. पंजाबमध्ये शांतता प्रस्थापित करणे आणि अतिरेक्यांचा बिमोड करणे ही जबाबदारी राज्य सरकारची असली तरी केंद्र सरकार स्वस्थ बसू शकत नाही. आपण याबाबत पुढचे पाऊल कोणते टाकता याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

सत्तेच्या दलालांना जाहीर इशारा देऊनही हे दलाल सत्तेच्या आवारात बिनधोकपणे फिरत आहेत असे दृश्य दिसते काँग्रेस पक्षांतर्गत निवडणुका पुन्हा एकदा स्थगित झाल्या आहेत पक्षांतर्गत निवडणुका ही चीजच कार्यकर्ते विसरून गेले आहेत. नव्या पिढीच्या कार्यकर्त्यांना तर पक्षांतर्गत निवडणुका असतात हे माहीतच नाही कारण त्यांच्या आठवणीत अशा निवडणुका झालेल्याच नाहीत. पक्षविरोधी कारवाया केल्याबद्दल प्रणव मुकर्जी, श्रीपत मिश्रा आदींची पक्षातून हकालपट्टी करण्यात आली त्यांपैकी कोणाच्याहीबाबत लोकांच्या मनात आदराची वा प्रेमाची भावना नव्हती, त्यामुळे या कृतीचा कोणाला राग येण्याचा प्रश्नच नव्हता. त्यांच्या जाण्याने पक्षाचेही फारसे नुकसान होणार नाही, पण त्याचबरोबर पक्षाची प्रतिमा डागाळणाऱ्यांचीही हकालपट्टी होणे आवश्यक होते ते अद्याप झालेले नाही याचे मात्र निश्चित वाईट वाटते. आपल्या अवतीभोवती वावरणाऱ्यांत कोणी करचुकवा नाही ना ? कोणाचे चारित्र्य संशयास्पद नाही ना याची काळजी आपण घेणे आवश्यक आहे. कारण अशा मंडळींमुळेही आपली प्रतिमा मलीन होते.

आपण सत्तेवर आल्याबरोबर एकविसाव्या शतकाच्या स्वागताची तयारी करण्याचेही आवाहन केलेत त्यामुळे विज्ञान व तंत्रक्षेत्रात नवे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. भारताला प्रगत देशांबरोबर नेण्याची आपली जिद्द निश्चितच स्वागतार्ह होती. परंतु केवळ तंत्रक्षेत्रातच प्रगती करून भागणार नाही तर जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत पुरोगामी धोरणाची आवश्यकता आहे. आपण त्यादृष्टीने शैक्षणिक धोरणात बदल घडवून आणण्याची आखलेली योजना उत्तम आहे. विज्ञान व तंत्रज्ञानावर भर देणारा शिक्षणक्रम तयार करण्याचे चाललेले प्रयत्न भावी पिढीच्या विकासाच्या दृष्टीने आवश्यकच होते. नव्या शैक्षणिक धोरणाचा मसुदा चर्चेसाठी जनतेपुढे ठेऊन आपण लोकमताचा जो आदर करीत आहात त्याबद्दल आपल्याला धन्यवाद दिले पाहिजेत कारण यामुळे लोकांना काय पाहिजे याचा अंदाज येऊ शकेल. लोकशाहीत सर्व गोष्टी बहुमताने करावयाच्या असतात. पण हे बहुमत

मारून मुटकून वा जबरदस्तीने आणता कामा नये. शैक्षणिक धोरणाबाबत आपल्या पक्षातील लोकाना आपण जे मतस्वातंत्र्य दिलेत व मसुद्यावर टीका करणारे विचारही ऐकून घेतलेत यावरून लोकशाही मूल्याना आपण किती महत्त्व देता याचाच प्रत्यय आला. त्यामुळेही आपल्या प्रतिमेची प्रभा अधिक तेजोमय झाली. अशा प्रकारे आपले वलय उजळ होत असता एका प्रश्नाने या सर्वांना ग्रहण लागले असे म्हणावे लागते.

शहाबानो प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाचा निकाल जाहीर होताच सर्व मुस्लिम समाज ढवळून निघाला त्या समाजातील प्रतिगामी शक्तींनी तर इस्लाम धर्माची इतिश्रीच होऊ घातली आहे अशा तऱ्हेने आरडाओरड सुरू केला शरियत आणि व्यक्तिगत कायदा याबाबत एक मोठे विचारमंथन या देशात या निमित्ताने झाले. धर्मांध मुस्लिम नेत्यानी सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या निषेधार्थ मोर्चे काढले वास्तविक हे मोर्चे म्हणजे सर्वोच्च न्यायालयाचा एक प्रकारे अवमानच होता. मोर्चाच्या नेत्यावर न्यायालयाची बेअदबी केल्याबद्दल खटलाच भरावयास पाहिजे होता. न्यायालयाच्या इतर कोणत्याही निकालाबद्दल कोणी अशा प्रकारे निषेध केला असता वा न्यायालयावर टीका केली असती तर त्याच्यावर बेअदबीचा खटला झाला असता की नाही? मग या प्रकरणीच दुर्लक्ष का करण्यात आले?

तलाकपीडित महिलांच्या शिष्टमंडळाने आपले गाऱ्हाणे आपल्यापुढे मांडले होते. त्यावेळी सदर शिष्टमंडळातील महिलांना आपण दिलासाही दिला होता. त्यामुळे आपण प्रतिगाम्याच्या आरडाओरडीला बळी पडणार नाही असे वाटत होते. आपल्याच मंत्रिमंडळातील तरुण मुस्लिम मंत्री अरिफ मोहमद खान याचे लोकसभेत जे पोटतिडीकीने भाषण झाले, त्याचा आपल्यावर प्रभाव पडला असावा असा भासही निर्माण झाला होता. परंतु त्या पोटतिडीकीवर झेड् आर् अन्सारी यांच्या कागावखोरीने मात केली ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे या प्रश्नावर आपण स्वीकारलेला दृष्टिकोण या देशातील बहुसंख्य लोकाना (त्यात मुस्लिम धर्मीयही आहेत) मान्य होणारा नाही. मुस्लिम महिला (घटस्फोटिताचे हक्क संरक्षण) विधेयक जनमतासाठी लोकापुढे ठेवले असते तर याचा प्रत्यय आला असता. सदर विधेयकाबाबत लोकमत जाणून घेण्यात आले नाही इतकेच नाही तर चाबकाचा आवाज काढून मंजूर करून घेण्यात आले हे अधिक दुर्दैवी.

प्रतोद वापरण्याचा आपला अधिकार मान्य करूनही असे म्हणावेसे वाटते की या प्रश्नावर आपण आपल्या पक्षातील खासदाराना मतस्वातंत्र्य द्यावयास पाहिजे होते. निदान संसदीय पक्षात या प्रश्नावर खुली चर्चा करून नंतर प्रतोद काढण्याचा निर्णय घ्यावयास पाहिजे होता. अरिफ मोहमद यानी पक्षशिस्त पाळण्यासाठी आपले मन व मत मारून विधेयकाच्या बाजूने मत दिले ही त्याची एकप्रकारे मुस्कटदाबीच झाली आहे. घटनेने दिलेल्या मतस्वातंत्र्यावरही आक्रमण झाले आहे. असे अनेकाच्याबाबत झाले आहे. पक्षशिस्तीसाठी स्वातंत्र्याचा त्याग करावा लागतो हे खरे पण निदान पक्षांतर्गत तरी हे स्वातंत्र्य का नाकारण्यात आले? अरिफ मोहमद यानी मंत्रीपदाचाही त्याग केला आणि मतस्वातंत्र्यही गमावले. त्याच्या त्यागाची व मताची कशाचीच कदर झाली नाही.

सदर विधेयक घटनाविरोधी आहे असा इशारा विरोधी पक्षानी दिला. त्यावर कायदामंत्री म्हणाले की ते ठरविण्याचे काम सर्वोच्च न्यायालयाचे आहे. हे त्याचे म्हणणे बरोबर आहे. परंतु जे विधेयक उघडपणे घटनाविरोधी आहे हे दिसते आहे ते मंजूर करून घेण्याचा आग्रह कशासाठी? सर्वोच्च न्यायालयाने ते उद्या घटनाविरोधी ठरविले तर त्यात संसदेचा गौरव आहे काय? कायदेमंत्री असेही म्हणाले की एका मोठ्या अल्पसंख्य गटाच्या भावनाची कदर केली पाहिजे. इथे कायदेमंत्री गृहित धरून चालले आहेत की त्या संपूर्ण अल्पसंख्य गटाला हे विधेयक पाहिजे आहे त्या अल्पसंख्य गटातील एक मोठा गट म्हणजे स्त्रिया व पुरोगामी विचाराचे पुरुष या विधेयकाच्या विरुद्ध आहेत या गोष्टीकडे कायदेमंत्र्यानी सोयीस्करपणे दुर्लक्ष केलेले दिसते नजमा हेपतुल्ला याच्यासारख्या बुरसट विचाराच्या काही महिला विधेयकाला पाठिंबा देत असल्या तरी बहुसंख्य मुस्लिम भगिनीना त्याच्यावर अन्याय करणारे हे विधेयक मान्य होणार नाही. त्यासाठी मुस्लिम महिलावरील दडपण दूर करून त्याना खुल्या मनाने मत प्रकट करू दिले पाहिजे परंतु तशी संधी त्याना देण्यात आली नाही. कारण विधेयक लोकमतासाठी प्रसरित करण्यात आलेच नाही.

अल्पसंख्याकाचे हक्क संरक्षण या सबबीखाली या अल्पसंख्याकाचे फारच लाड या देशात होत आहेत. इतके की त्यासाठी घटनेतील तरतुदीकडेही दुर्लक्ष करण्यात येत आहे वास्तविक लोकशाहीत जे बहुसंख्याना मान्य तसे करावे असा नियम आहे. इथे तोही नियम धाब्यावर बसविण्यात आला. अल्पसंख्याकाना चिरडून टाकावे असे नाही. त्याच्या मनाला योग्य तो मान द्यावा हे खरे परंतु त्याची मागणी जर अयोग्य असेल, दुसऱ्या कोणावर अन्याय करणारी असेल तर ती मागणी मान्य करणे अयोग्यच अल्पसंख्याकामधील तमाम स्त्री जातीवर अन्याय करणारी ही मागणी आहे. अशी मागणी स्वीकारणे सबंध स्त्री जातीवर अन्याय करणे आहे. घटनेने सर्वांना सारखा हक्क दिला आहे लिंगभेद, जातीभेद घटनेला अमान्य आहे. असे असता एका जातीतील वा धर्मातील स्त्रियाना घटस्फोटानंतर पोटगी मिळते व दुसऱ्या धर्मातील स्त्रियाना मिळत नाही. यात घटनेने दिलेली समानता कुठे आहे?

सामाजिक सुधारणेसाठी कायदे करण्याची प्रथा या देशात फार जुनी आहे. हिंदू धर्मात सतीची चाल होती ती कायद्याने बंद करण्यात आली बालविवाहासही बंदी करणारा कायदा करण्यात आला आहे. हिंदू कोड बिलाने अनेक सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आपल्या हिंदूमधील गैरप्रथा बंद करण्यासाठी कायदे करण्यात आले आणि याबद्दल ब्रिटिश सरकारला धन्यवादच दिले पाहिजेत. परकी राजवटीत या गोष्टी झाल्या आणि स्वातंत्र्यानंतर आता सामाजिक सुधारणेचे पाऊल टाकले जात आहे. या वैज्ञानिक जगात समाजाची क्रांती करण्याऐवजी त्याला प्रतिगामी करण्यात येत आहे ही अत्यंत दुर्दैवाची गोष्ट आहे जेव्हा सतीबंदी व बालविवाह बंदी करणारे कायदे झाले त्यावेळी काही प्रतिगामी हिंदूना आपल्या धर्मात ब्रिटिश सरकार ढवळाढवळ करीत आहेत असेच वाटले परंतु ब्रिटिश सरकारने त्याकडे दुर्लक्ष केले आणि हिंदू समाजातील काही सुधारणवादी विचारवंतानी सदर कायद्याचे स्वागत केले हिंदू समाजात आजही काही अयोग्य प्रथा आहेत. त्या बदलण्याचा व त्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्याला चागला प्रतिसाद मिळतो आहे. मुस्लिम समाजातही सुधारणावाद्याची संख्या हळूहळू वाढते आहे सरकारने अशा पुरोगामी शक्तीना साथ दिली तर मुस्लिम समाजातही सामाजिक व धार्मिक सुधारणा घडून येऊन हा समाज प्रगती

करील परंतु दुर्दैवाने संस्कार प्रतिगामी शक्तींशी हातमिळवणी करून समाजाला कुधारणेकडे नेत आहे. राजीवजी आपल्या-सारख्या पुरोगामी नेतृत्वाने प्रतिगामी पाऊल टाकावे याचे वाईट वाटते.

'स्त्रियांचे समान हक्क' ही पश्चात्य कल्पना आहे असे आपण म्हणाल्याचे प्रसिद्ध झाले आहे. महात्मा गांधी हे सुरुवातीपासून स्त्रियांना समान हक्क देण्याचा पुरस्कार करीत असत. त्यामुळेच हजारो स्त्रियांनी स्वातंत्र्य लढ्यात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून भाग घेतला, तुरुंगवास भोगला. ज्या स्त्रीवर्गाने स्वातंत्र्यासाठी आपली जबाबदारी उचलली. त्या स्त्री वर्गाला पाश्चात्य कल्पना म्हणून समान हक्क नाकारणे न्यायाचे ठरणार नाही. या देशात स्त्रियांना समान हक्क दिले नाहीत तर महात्माजींच्या आत्म्याला काय वाटेल याचा विचार केला पाहिजे

आज या देशातील स्त्रिया विविध क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करीत आहेत. अशा वेळी त्यांना कोणताही हक्क नाकारणे हा त्यांच्या कर्तृत्वाचा अपमान आहे. या देशाला एकविसाव्या शतकात नेण्याचे जे आपण आवाहन केले आहे ते स्त्रियांच्या सहकाराशिवाय पुरे होणार नाही. अशा वेळी त्यांना पुरुषांइतकेच हक्क दिले पाहिजेत. त्याऐवजी आमचे सरकार इतर सर्वत्र केलेला स्त्रियांचा हक्क त्यांना नाकारीत आहे याचे आश्चर्य वाटते. आपण एकविसाव्या शतकाकडे जात आहोत की अठराव्या याचाच संभ्रम पडू लागला आहे.

राजीवजी, मुस्लिम महिला ( घटस्फोटितांचे हक्क संरक्षण ) असे जरी या विधेयकाचे नामकरण केले असले तरी त्या विधेयकातून घटस्फोटित मुस्लिम महिलांचे हक्क संरक्षण होत नाही हे अनेक विचारवंतांनी दाखवून दिले आहे. मुस्लिम समाजातील स्वार्थी व धर्मांध लोकांच्या समाधानासाठी या अशा विधेयकाचा आपण पाठपुरावा करावा यात आपली प्रतिमा डागाळते आहे. म्हणून कृपया विनंती अशी की या विधेयकाबाबत आपण फेरविचार करावा व आपली पुरोगामी प्रतिमा कायम राखावी.

आपला नम्र भारतीय नागरिक

**—तुकाराम कोकजे**

## वेशीबाहेरचे एक पान

**वे**शीबाहेरच्या मांडवात जाहीर सत्कार होत होता. पुढारी आपली तोंडं ओळीनं उघडत होती. समदा म्हारवाडा खुळ्यासारखा वर वर तोंड करून ऐकत होता. जिल्ह्यातलं, तालुक्याचं पुढारी हजर होते. भाषणाच्या रानात तेच तेच बी पेरत होतं. खेड्यातल्या रानात काय बी पेरलं तर चालतंय.

स्टेजवर नवरा-बायकू अवघडून वसल्याली होती. त्यांच्या प्रपंच्याची भांडी स्टेजवर चमकत होती. आंतरजातीय विवाह म्हणजे काय हे म्हारवाड्याला समजलं होतं की नाही कोणास ठाऊक? पर एवढं कळालं होतं की आपली जात सोडून दुसऱ्या जातीतल्या पोरीबरोबर लगीन झालं की भांडीकुंडी आणि पैसं देत्यात. म्हारवाड्यातली तरणी पोरं याच इचारात रमली होती आणि बायका भांड्यांकडं बघत बघत घराकडलं विसरल्या होत्या.

गावचं सरपंच उठलं. सांगून ठेवलेल्या लोकांनी टाळ्या वाजवल्या टाळ्यांचा आवाज ऐकून बाकीच्यानीबी तेच केलं. सरपंच बोलाय लागले, 'आज आपल्या गावाला जिल्हापरिषदेच्या अध्यक्षाचं पाय लागलं अध्यक्ष साहेब, माझा गाव तालुक्यातला पयला गाव हाय ज्या गावातल्या पोरानं अशा प्रकारचं लगीन केलंय गावकऱ्यांनो आता जात-पात बघायचं कारण नाही. इथनं-तिथनं मारी माणूस जात. दोन जाती एक बाई आणि दुसरी माणूस. माझ्या पांढरीतल्या पोरानं तमाला आजच सांगून ठेवतोय, जुन्या जातीला मुळासकट नांगरून टाका आणि गावात असं कोण बी दुसऱ्या जातीबरोबर लगीन करून घेईल तर त्याचा सत्कार जिल्हापरिषद आणि ग्रामपंचायत जरूर करल.'

'आज नारू म्हाराच्या पोरानं दुसऱ्या जातीची पोरगी करून समाजवाद आणलाय. आपल्याला याच रस्त्यानं एकविसाव्या शतकाकडं धावायचं हाय.' सरपंच बराच वेळ बोलत होते. म्हारवाड्यातल्या म्हाताऱ्या कोताऱ्यासनी हे पटत नव्हतं. ती सभेतनं मधनच उठून जात होती. तरणी पोरं कान देऊन ऐकत होती. बसल्याजागीच आपल्याला हे जमेल का म्हणून इचार करीत होती.

मग नव्या जोडप्याला भांडी दिली. पैशाचा चेक दिला त्या जोडप्यानं स्टेजवरल्या समद्यासनी नमस्कार केला. समद्यानी त्या जोडप्याला आशीर्वाद दिला. नवरा पुन: जि. प. च्या अध्यक्षाजवळ गेला, त्यानं त्यांच्या कानात कायतरी सांगितलं. पुन: अध्यक्ष माईककडं आले व म्हणाले, 'या जोडप्याला राह्यला घर नाही. मी सरपंचाना अशी विनंती करतो की त्यानी बेघर वसाहतीतलं एक घर त्याना द्यावं म्हणजे खऱ्या अर्थानं गावानं त्यांचा सत्कार केल्यासारखे होईल.'

सरपंच गडबडीने उठले आणि म्हणाले 'त्यांना एक घर जरूर देऊ.'

आभार, हार-तुरं, ग्रामपंचायतीत चहापान सारं झालं. गावातला रस्ता कसा आहे हे दाखवत मोटारी निघून गेल्या.

आठवडाभरातच नारूचं पोर आणि त्याची बायकू नव्या बेघर वसाहतीत राह्यला गेली.

चार-पाच महिनं झालं आणि नारूच्या पोराला भतानं झपाटलं. त्यो बायकूला वंगाळ-वंगाळ बोलाय लागला मारायला लागला. भांडाय लागला. सरपंच वेळोवेळी भांडण मिटवाय लागला. राती-अपराती नारूची सून सरपंचाला निरोप धाडाय लागली. सरपंच राती-अपराती यायला लागला. भांडण मिटवायला लागला. असं वरचं दिवस चाललं.

गावात सरपंचानं नवी योजना आणली. 'मोफत आरोग्य तपासणी शिबीर' 'आरोग्य चांगलं तर होईल देशाचं भलं.' जागोजाग बोर्ड लोंबकळाय लागलं. शिबीर सुरू झालं. नारूच्या पोराचं नाव आलं. सरपंचानं अधिक माहिती डॉक्टराला दिली. 'ह्याचा मेंटल स्क्रू ढिला हाय.' नारूच्या पोराला डॉक्टर तपासू लागले 'मला कोणताच रोग नाही, तर काय तपासताय?' ते तक्रार करू लागलं, वाद वाढला. पोर डॉक्टरला मारायला उठलं. दंगा कराय लागलं. मग डॉक्टर म्हणाले 'हाताबाहेरची केस आहे... ताबडतोब ॲडमिट करा.' सरपंचानं त्याच दिसी त्याला ठाण्याकडं रवाना केलं.

सरपंच राती-अपरातीला त्या बेघर वसाहतीतल्या घराला आपलंच घर म्हणून ध्यान देत्यात. राती-अपरातीला मदतीला जातात.

**बापू जाधव**
**किर्लोस्करवाडी**

# सार्वजनिक क्षेत्रातील 'पांढरे हत्ती' आणि खाजगीकरण

● राजगुरु द. आगरकर ●

२६ जुलै १९८५ रोजी केंद्रीय राज्य अर्थमंत्री श्री. जनार्दन पुजारी यांनी लोकसभेत आणि सार्वजनिक उद्योग सचिव श्री. हरबन्स सग यांनी राज्यसभेत सरकारचा सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग खाजगी क्षेत्रात नेण्यासंबंधी काही निर्णय झालेला नाही असे जाहीर केले. पब्लिक एंटरप्राईज ब्युरोने मे १९८५ मध्ये आयोजित केलेल्या परिषदेत असे मत मांडण्यात आले होते की, नुकसानीत येणाऱ्या सार्वजनिक उद्योगांचा लिलाव करून टाकावा. गेल्या काही महिन्यात देशातील काही प्रमुख अर्थविषयक प्रकाशनांतून सरकार या उद्योगांचे खाजगीकरण करण्याच्या विचारात आहे असे जाहीर केले होते. इंजिनिअरिंग प्रॉजेक्टस् (इंडिया) लि., हिंदुस्थान स्टील वर्क्स कन्स्ट्रक्शन लि. आणि सायकल कार्पोरेशन ऑफ इंडिया या तीन कंपन्या खाजगी क्षेत्रात आणल्या जाणार आहेत अशी हवा होती. अर्थात सरकारी उद्योग आणि त्याचे नुकसान हा नवीन विषय नाही. गेली तीस पसतीस वर्षे यासंबंधी वेळोवेळी चर्चा होते. तज्ञ आपली मतं व्यक्त करतात, अभ्यासमंडळ; कमिट्या नेमल्या जातात, त्यांचे अहवाल—सूचना येतात. आणि आपल्या नेहमीच्या प्रथेप्रमाणे आपण तज्ञांची मते आणि कमिटयांचे अहवाल बासनात गुंडाळून ठेवतो. वेळ जातो, लोक विसरतात आणि कारभार तसाच पुढे चालू रहातो.

या खेपेला सुरू झालेली चर्चा दीर्घ काळ चालू आहे. तसेच पंतप्रधान राजीव गांधी यांनीपण या विषयात लक्ष घातले आहे. मे १९८५ मधे झालेल्या परिसंवादाचे उद्घाटन करताना त्यांनी अशी सूचना केली की, सार्वजनिक क्षेत्र हे आजारी उद्योगांचे इस्पितळ होता कामा नये. या उद्योगांची उत्पादनक्षमता, नफाक्षमता वाढली पाहिजे. हे उद्योग थंड पडलेले असताना या उद्योगांना आर्थिक मदत आणि सवलती देऊन किती दिवस या उद्योगात धुगधुगी ठेवायची? का ठेवायची? हे पांढरे हत्ती किती दिवस पोसायचे? या पांढऱ्या हत्तींची संख्या दरवर्षी वाढतच आहे.

## सार्वजनिक उद्योगांचा इतिहास

औद्योगिक क्रांतीनंतर उत्पादनात यंत्रसामुग्रीचा वापर वाढला आणि उत्पादन पद्धतीच बदलली. उत्पादन पद्धतीमधील बदलामुळे उत्पादन साधनसामुग्रीच्या मालकीत विषमता निर्माण होऊन अर्थसत्तेचे केंद्रीकरण होऊ लागले. समाजात भांडवलदार आणि श्रमिक असे दोन वर्ग निर्माण झाले. अर्थसत्तेच्या जोरावर भांडवलदारांकडून श्रमिकांचे शोषण केले जाऊ लागले. नफ्यावर जगणारे आणि वेतनावर जगणाऱ्यांच्यामधील आर्थिक दरी वाढत होती. साम्यवादी विचारवंतांनी ही आर्थिक दरी कमी करण्यासाठी साधनसामुग्रीची मालकी समाजाकडे दिली जावी असे सुचवले. सामाजिक आणि नैतिक जाणिवेतून राष्ट्रीयीकरणाचा पुरस्कार केला गेला. पन्नास वर्षांपूर्वी राष्ट्रीयीकरणाचा पुरस्कर्ता सच्चा साम्यवादी मानला जायचा. जिथे जिथे साम्यवादी सरकारे सत्तेवर आली तिथे तिथे साधनसामुग्रीचे राष्ट्रीयीकरण केले गेलेच; पण इंग्लंड जपान या सारख्या देशांनीपण सरकारी क्षेत्रात उद्योग सुरू केले. दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेल्या भारत, पाकिस्तान, बांगलादेश इ. देशांनी पण सार्वजनिक क्षेत्रात विविध उद्योग सुरू केले. कल्याणकारी सरकारची कल्पना दृढ होत गेली, तशी विकासासाठी, संरक्षणासाठी, सामाजिक कल्याणासाठी, जनतेचे शोषण होऊ नये म्हणून इ. अनेक उद्देशातून विविध प्रकारचे उद्योग सरकारने सार्वजनिक क्षेत्रात सुरू केले.

साम्यवादी सरकारे सत्तेवर आली आणि सार्वजनिक क्षेत्रातले दोष लक्षात आले. रशियात क्रांतीच्या सुरवातीस उद्योगांची मालकी व्यवस्थापन व मजुरांच्याकडे सोपवण्यात आले. आणि लक्षात आले, मजुरसुद्धा व्यवस्थापन ताब्यात आलं की समाजाचं हित लक्षात न घेता स्वतःच्या हिताकडेच जास्त लक्ष देतात. जगात सर्वत्रच सार्वजनिक क्षेत्राबद्दलचा अनुभव म्हणावा तितका चांगला नाही. आज सच्चा साम्यवादी सुद्धा उद्योगांच्या राष्ट्रीयीकरणाचा आग्रह धरत नाही. लोकांच्यामुद्धा लक्षात आले आहे की, सार्वजनिक उद्योग हे कुणाचेच नसतात. या उद्योगांवर खऱ्या अर्थाने समाजाची मालकी असते. म्हणूनच इंग्लंडमधे मजूर पक्षाने उद्योगांच्या राष्ट्रीयीकरणाचा प्रश्न घेऊन निवडणुकांद्वारे सत्ता काबीज करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा तो पक्ष अयशस्वी झाला. आज भारतात पण सार्वजनिक उद्योगांची परिस्थिती वेगळी नाही.

## सार्वजनिक क्षेत्राचा विकास

भारतीय नेते रशियाच्या प्रगतीने प्रभावित झाले होते. त्यांनी नियोजनाच्या मार्गाचा अवलंब करून विकास साधायचे निश्चित

केले आणि स्वाभाविकच साधनांची सार्वजनिक मालकी हे नियोजनाचे वैशिष्ट्यपण नियोजनाबरोबर भारतीय अर्थव्यवस्थेत आले. स्वातंत्र्यानंतरच्या काळात हे धोरणपण बरोबर होते. कारण आपल्या देशातले सार्वजनिक क्षेत्र विकसित झालेले नव्हते. नवीन तंत्र उत्पादन पद्धती स्वीकारण्याची कुवत नव्हती, मोठ्या गुतवणुकांबद्दल शकाच होती, अशा परिस्थितीत सरकारने पुढाकार घेऊन विकासासाठी महत्त्वाचे, सरक्षणदृष्ट्या महत्त्वाचे, सार्वजनिक कल्याणाचे उद्योग सुरू करणे योग्यच होते. १९४८ सालच्या औद्योगिक धोरणात सरकार औद्योगिक विकासासाठी सक्रीय प्रयत्न करेल असे म्हटले होते, हे सार्वजनिक क्षेत्राचे सुतोवाचे होते. पुढे हेच १९५० च्या धोरणातपण होते· या धोरणानुसार समाजवादी समाज रचनेचे उद्दिष्ट मान्य केल्यानतर नियोजनबद्ध जलद आर्थिक विकासासाठी सर्व मूलभूत आणि महत्त्वाचे उद्योग सार्वजनिक क्षेत्रात आणणे आवश्यक होते. १९५६ च्या ठरावात यापुढे एक पाऊल जाऊन सरकारी कारखाने म्हणजे औद्योगिक विकास हे सूत्र माडले गेले आणि या नंतरच्या प्रत्येक धोरणात सार्वजनिक क्षेत्राला झुकते माप दिले गेले. याचा परिणाम एकच झाला. औद्योगिक गुतवणकापैकी ७५ टक्के गुतवणुका सार्वजनिक क्षेत्रात झाल्या. सघटित कामगारापैकी ६८ टक्के कामगार या क्षेत्रात आले. पत्रक १ या क्षेत्राच्या वाढीची कल्पना देते.

पत्रक १

### भारतातील सार्वजनिक क्षेत्राचा विकास

(गुतवणुका कोटी रुपयात)

| वर्ष | उद्योग सस्था | भांडवली गुतवणूक |
|---|---|---|
| १९५०–५१ | ५ | २९ |
| १९५५–५६ | २१ | ८१ |
| १९६०–६१ | ४८ | ९५३ |
| १९६५–६६ | ७४ | २,४१५ |
| १९७०–७१ | ९७ | ४,६८२ |
| १९७५–७६ | १२९ | ८,९७३ |
| १९८०–८१ | १८५ | २१,१०२ |
| १९८२–८३ | २०९ | ३०,०३९ |

१९८२–८३ मध्ये एकूण उद्योग २२३ होते; पण फक्त २०९ उद्योगांची आकडेवारी उपलब्ध होती.

आधार : स्टॅटिस्टिकल ऑडिट लाईन ऑफ इंडिया.

१९५०–५१ ते १९८२–८३ या कालखडाचा विचार केल्यास उद्योगाची सख्या सुमारे ३०१ टक्क्यानी वाढली, तर भाडवली गुतवणूक १०३५ पटीने वाढली. सुरुवातीच्या पधरा वर्षापेक्षा नतरच्या काळात गुतवणुकात कारखान्याची सख्या अधिक वाढली. या काळात वहातूक, लोखंड, पोलाद, खते, इ. मोठे उद्योग तर या क्षेत्रात उघडले गेलेच; पण किरकोळ यंत्रे आणि उपभोग्य वस्तूची निर्मितीपण या क्षेत्रात सुरू झाली.

आज सार्वजनिक क्षेत्राचा जो विस्तार झाला आहे, तो प्रामुख्याने योजनाकाळात साधनसामुग्रीच्या वाटपासंबंधी जे निर्णय घेण्यात आले त्यामुळे झाला आहे. योजनाकाळात जास्तीत जास्त साधनसामुग्री सार्वजनिक क्षेत्राकडे देण्यात आली. अगदी सातव्या योजनेतसुद्धा सार्वजनिक क्षेत्रात १,८०,००० कोटी रुपये गुतवले जाणार आहेत, तर खाजगी क्षेत्रात १,४०,००० कोटी रुपये गुतवले जाणार आहेत.

## नफा–तोटा

भारतातील सार्वजनिक उद्योग त्याच्या स्थापनेपासूनच पुरेसा नफा मिळवत नाहीत असे दिसून येते. सार्वजनिक उद्योगाच्या सुरवातीच्या काळात या उद्योगाचा नफा कमी असणे स्वाभाविक होते, कारण कारखाने नव्याने उभारले जात होते, त्याचा प्रत्यक्ष उत्पादनकाळही जास्त असतो पण गेल्या १५ वर्षांतील सरकारी उद्योगांचा नफा–तोटा पाहिला तर १९७०–७१ ते १९७६–७७ या काळात पहाणी करण्यात आलेल्या सस्थापैकी ३५ टक्के संस्था नुकसानीत होत्या, तर नतरच्या सात वर्षांच्या काळात ४३.५ टक्के सस्था नुकसानीत होत्या. पहिल्या सात वर्षांत (१९७०–७१ ते १९७६–७७) प्रत्येक सस्थेचे नुकसान सरासरी चार कोटी रुपयापेक्षा कमी होते; पण नतरच्या सात वर्षांत ते पाच कोटीपेक्षा जास्त होते. १९८३–८४ मध्ये तर ते सरासरी १६.८४ कोटी रुपये होते. पहिल्या सात वर्षांत एकूण नुकसान ७९८ कोटी रुपये, तर नतरच्या सात वर्षांत ५,५२१ कोटी रुपये होते. या काळातील पहिल्या सात वर्षात १४११ कोटी रुपये नफा मिळाला होता, म्हणजे निव्वळ नफा ६१३ कोटी रुपये होता. तर नंतरच्या सात वर्षात मिळवलेला नफा ६५०१ कोटी रुपये होता. नफा तोटयाची वजाबाकी करून सार्वजनिक उद्योगाना मिळालेला नफा ९८० कोटी रुपये होता. या काळातील भाडवल गुतवणूक तिपटीपेक्षा अधिक वाढली असली, तरी नफा मात्र ५० टक्क्यानीच वाढला होता. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते, आपण गुतवणुका वाढवण्याकडे जितके लक्ष दिले, तितके लक्ष या गुतवणुका फायदेशीर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले नाहीत पत्रक दोन १९७०–७१ ते १९८४–८५ या काळातील नफा-तोटा दाखवते (पृष्ठ १५ वर पहा)

१९८३–८४ मध्ये १०९ संस्थानी १७७९ कोटी रुपये नफा कमावला पण प्रमुख सहा सरकारी उद्योगसस्थांनी या नफ्यापैकी ५६ टक्के नफा कमवला. एकट्या ऑईल अँड नॅचरल गॅस कमिशनचा नफा ८०६ कोटी रुपयाचा होता. या सहा कपन्या वगळता उरलेल्या १०३ कंपन्याचा सरासरी नफा सुमारे ७.५ कोटी रुपये होता. हीच प्रवृत्ती नुकसानीच्या बाबतीत दिसून येते. सहा कंपन्याचा तोट्यातील हिस्सा सुमारे ५१ ५३ टक्के होता. यापैकी स्टील अथॉरिटी ऑफ इंडिया व भारत कोकिंग कोल या दोन सस्थाचे एकूण नुकसान ९१ कंपन्यांच्या नुकसानापैकी २५ टक्क्यापेक्षा जास्त होते. नुकसानीत येणाऱ्या ९१ सस्थापैकी पहिल्या दहा संस्थांचे नुकसान १००१ कोटी रुपये होते.


## सार्वजनिक उद्योगाकडून अपेक्षा

नियोजनाच्या सुरवातीच्या काळात सार्वजनिक उद्योगांचे कौतुक करण्यात आले. या उद्योगांच्याकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले गेले. पडित जवाहरलाल नेहरूनी या प्रकल्पाना आधुनिक तीर्थक्षेत्रे म्हटले

होते. १९६० पूर्वीच हे लक्षात आले होते की, हे उद्योग कार्यक्षमतेने कार्य करत नाहीत, भाडवलाचा अपव्यय होत होता, सुटे भाग वेळेवर उपलब्ध न होणे, यंत्रे वारवार नादुरुस्त होणे इ. कारणामुळे हे उद्योग समाधानकारकपणे नफा मिळवत नव्हते.

एप्रिल १९६७ मध्ये त्या वेळचे उपपतप्रधान मुरारजीभाई देसाई यानी लोकउद्योगाला दिलेल्या मुलाखतीत या उद्योगाना सूचना दिली होती. ते म्हणाले होते, 'सरकारी उद्योगाचे नुकसान भरून काढण्यासाठी वर्षानुवर्षे भारतीयानी या उद्योगाना सवलत देण्याची अपेक्षा धरणे चूक आहे. लोकांना या उद्योगाकडून निर्माण केलेल्या वस्तू आयात वस्तूपेक्षा अधिक दराने घ्याव्या लागत आहेत.' यापूर्वी या उद्योगांचे अनेक वेळा टीकात्मक परिक्षण झाले आहे, पण या उद्योगामध्ये सुधारणा झालेली नाही. या उद्योगामध्ये औद्योगिक क्षेत्रात गुतलेल्या भाडवलापैकी तीन चतुर्थांश भाडवल गुतले आहे; पण उत्पादन मात्र एकूण औद्योगिक उत्पादनाच्या अवघे पचवीस टक्के आहे. सार्वजनिक उद्योगानी मोठ्या प्रमाणात विकासाला मदत केली पाहिजे ही अपेक्षा केली जाते; पण प्रत्यक्षात मात्र आजपर्यंत ही अपेक्षा पूर्ण झालेली नाही.

भारतातील सार्वजनिक उद्योगाचे व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून चार गट पाडता येतील. १) खात्यामार्फत चालवले जाणारे उद्योग, २) स्वतंत्र मडळामार्फत चालवले जाणारे उद्योग, ३) सार्वजनिक महामंडळाद्वारे चालवले जाणारे उद्योग आणि ४) कंपन्या स्थापन करून चालवले जाणारे उद्योग या उद्योगानी विकासकार्यात हातभार




लावावा ही अपेक्षा होती. १९५१ ते १९८५ या सहा पचवार्षिक व तीन वार्षिक योजना काळात सार्वजनिक उद्योगानी नियोजनास लावलेला हातभार पत्रक ३ मध्ये दाखवला आहे. या काळात या उद्योगानी १३,७३० कोटी रुपयांची मदत करावी ही अपेक्षा होती; पण प्रत्यक्षात ११,४८९ कोटी रुपयाचीच (८३.६८ टक्के) मदत झाली. ही मदत योजनेतील खर्चाच्या साधारण ६.३० टक्के होती. सातव्या योजना काळात सार्वजनिक क्षेत्रात गुतवल्या जाणाऱ्या १,८०,००० कोटी रुपयांपैकी ३५,४८५ कोटी रुपये या उद्योगातून यावेत ही अपेक्षा आहे. आजपर्यंतच्या या उद्योगाच्या कार्याकडे पहाता ही फार मोठी अपेक्षा आहे असे वाटते. सातव्या योजना काळात या उद्योगाना दरवर्षी ७,०९७ कोटी रुपये नफा कमवला पाहिजे. १९८४–८५ मधे या उद्योगाचा नफा ९५६ कोटी रुपये होता या उद्योगानी १९७०–७१ ते १९८३–८४ या काळात जो नफा कमवला तेवढा नफा या

पत्रक २

## सार्वजनिक क्षेत्राचा १९७०–७१ ते १९८४–८५ मधील नफा

( कोटी रुपये )

| वर्ष | सस्था | | | एकूण | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण | नफा मिळवणाऱ्या | नुकसानीत येणाऱ्या | नफा | तोटा | निव्वळ नफा |
| १९७०–७१ | ८७ | ५२ | ३५ | ७५ | ७८ | –३ |
| १९७१–७२ | ९३ | ५८ | ३५ | १०० | ११९ | –१९ |
| १९७२–७३ | १०१ | ६७ | ३४ | १०४ | ८६ | १८ |
| १९७३–७४ | ११४ | ७२ | ४२ | १६१ | ९७ | ६४ |
| १९७४–७५ | १२० | ८१ | ३९ | ३२२ | १३८ | १८४ |
| १९७५–७६ | १२१ | ८७ | ३४ | २५५ | १२६ | १२९ |
| १९७६–७७ | १४९ | ९३ | ५६ | ३९४ | १५४ | २४० |
| १९७७–७८ | १५५ | ८२ | ७३ | ३८५ | ३९९ | –१४ |
| १९७८–७९ | १५९ | ९० | ६९ | ४२५ | ४६५ | –४० |
| १९७९–८० | १६९ | १०३ | ६६ | ४६३ | ५३७ | –७४ |
| १९८०–८१ | १६८ | ९२ | ७६ | ५६२ | ७६४ | –२०२ |
| १९८१–८२ | १८८ | १०५ | ८३ | १२९३ | ८४७ | ४४६ |
| १९८२–८३ | १९१ | १०९ | ८२ | १५९४ | ९७६ | ६१८ |
| ११८३–८४ | २०० | १०९ | ९१ | १७७९ | १५३३ | २४६ |
| १९८४–८५ | – | – | – | २२६१ | १३०५ | ९५६ |

आधार : कॉमर्स ४ जानेवारी १९८६

१९८३–८४ मध्ये या उद्योगाना मिळालेला नफा अवघा ० ८२ टक्के होता. याविरुद्ध खाजगी क्षेत्रातला नफा सरासरी १२ टक्के होता.

उद्योगाना एका वर्षात कमवला पाहिजे. आजपर्यंतच्या या क्षेत्रातील उद्योगाच्या वाटचालीकडे पाहिल्यावर ११५६ साली त्या वेळचे जागतिक बँकेचे अध्यक्ष श्री. युजिन ब्लॅक यानी दिलेला इशारा योग्यच होता. १९५७ च्या औद्योगिक धोरणावर टीका करताना ते म्हणाले होते, 'सरकारी कारखाने म्हणजे औद्योगिक विकास या सूत्राचे काटेकोरपणे पालन झाले, तर आधीच ताणल्या गेलेल्या सरकारच्या सापत्तिक व व्यवस्थापन शक्तीवर अधिक ताण पडणार आहे. याचा परिणाम महत्त्वाच्या क्षेत्राचा विकास–वेग मदावण्यात होणार आहे'

पत्रक ३

### सार्वजनिक उद्योगाकडून सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणुकांसाठी झालेली मदत

(कोटी रुपये)

| योजना | मदत | |
|---|---|---|
| | अपेक्षा | प्रत्यक्ष |
| पहिली योजना (१९५१–५६) | १७०(अ) | ११५ (अ) |
| दुसरी योजना (१९५६–६१) | १५०(अ) | १६७ (अ) |
| तिसरी योजना (१९६१–६६) | ५५० | ४३५ (५.१) |
| वार्षिक योजना (१९६६–६९) | ५८७ | ४०९ (६.२) |
| चौथी योजना (१९६९–७४) | २,०२९ | १,१३५ (७.०) |
| पाचवी योजना (१९७४–७९) | ८४९(ब) | २,५८३ (६ ६) |
| सहावी योजना (१९८०–८५) | ९,३९५(क) | ६,६४५ (६.८) |
| सातवी योजना (१९८५–९०) | ३५,४८५(ड) | –(इ) (१९ ७) |

खुलासा : सार्वजनिक उद्योगात रेल्वे, पोस्ट आणि तार, केंद्रीय विद्युतनिर्मिती केंद्रे, रिझर्व्ह बँक वगळून अन्य पतपुरवठा करणाऱ्या अर्थसस्था इ. चा समावेश आहे.

(अ) फक्त रेल्वेची आकडेवारी, अन्य उद्योगाची आकडेवारी उपलब्ध नाही.
(ब) पाचव्या योजनेपासूनच्या आकडेवारीची तुलना अगोदरच्या योजनाशी करता येत नाही. १९७४–७५ मधील आकडे चालू किमतीस अन्य वर्षाचे १९७५–७६ च्या किमतीप्रमाणे.
(क) १९७९–८० च्या किमतीप्रमाणे.
(ड) १९८४–८५ च्या किमतीप्रमाणे.
(ई) सातव्या योजनेतील अपेक्षित लक्ष.

आधार – कॉमर्स ४ जानेवारी १९८५.

या क्षेत्रातली गुतवणूक–वाढ पाहिल्यावर लक्षात येते की सरकारची भाडवलशाही अस्तित्वात आली आहे. मक्तेदारी मग ती खाजगी असली अथवा सरकारची असली तरी वाईटच असते. खाजगी मक्तेदारीपेक्षा सरकारची मक्तेदारी अधिक दोषपूर्ण असते. खाजगी मक्तेदारीवर सरकार कायदे करून नियंत्रण ठेवू शकते. भारतात मक्तेदारी विरोधी कायदा, विविध प्रकारच्या अटी, किमत, धोरण इ मार्गांनी खाजगी उत्पादकावर बधने लादून मक्तेदारी रोखण्याचा प्रयत्न झाला आहे. यामधूनच काळा पैसा व भ्रष्टाचार वाढायला मदत झाली आहे, अशी टीकापण केली जाते. सरकारची मक्तेदारी अधिक घातक ठरते. सरकारी मक्तेदारीत शोषण होते, पण या शोषणाचा प्रमुख बळी उपभोक्ताच असतो मजुराचे शोषण त्याच्या संघटनामुळे होत नाही. उपभोक्त्याचे शोषण मात्र अनेक मार्गांने होते. उदा अकार्यक्षम टेलिफोन सेवेसाठी अधिक किमत द्यावी लागते, खाजगी क्षेत्रात तयार करण्यात आलेल्या वस्तूसाठी आयात वस्तूपेक्षा अथवा खाजगी क्षेत्रातील वस्तूपेक्षा जास्त किमत द्यावी लागते. या उद्योगात येणारे नुकसान भरून काढण्यासाठी या गुतवणुकावरचे व्याज देण्यासाठी, नवीन गुतवणुका करण्यासाठी लागणारा पैसा सर्वसामान्य जनतेकडूनच गोळा केला जातो. ग्राहकाचे शोषण खाजगी मक्तेदाराकडून होऊ नये म्हणून सार्वजनिक उद्योग सुरू झाले; पण ग्राहकाचे शोषण थाबलेले नाही. १९७०–७१ ते १९८१–८२ या काळात या उद्योगातील वेतन १९६ टक्क्यानी वाढले. पण राहणीमान निर्देशाक १४२ टक्क्यानी वाढला होता. निर्देशाकातील वाढीपेक्षा जे वाढीव वेतन दिले गेले ते सर्वसामान्य जनतेकडून कर वसूल करूनच हे उद्योग सार्वजनिक क्षेत्रात उघडताना या उद्योगांचा नफा लोकाच्या मालकीचा असेल असे सागण्यात आले होते; पण सार्वजनिक उद्योग कुणाचेच उद्योग नसतात परिणामतः त्याना नफा होत नाही झाला तर फारच कमी असतो हा सर्वत्र येणारा अनुभव आपण लक्षातच घेतला नाही.

सार्वजनिक उद्योग हे खरोखर सार्वजनिक आहेत का? या उद्योगाचे ताळेबद कधीच वेळेवर सादर केले जात नाहीत. १९८३–८४ मधे केंद्रीय उद्योगापैकी ४७ उद्योगानी वार्षिक सर्वसाधारण सभाच घेतली नाही. कायद्यानी ठरवून दिलेल्या तरतुदीची पूर्तताच केली नव्हती. प्रत्येक उद्योगाची हिशोब ठेवण्याची पद्धत एक नाही. इतकेच नाही तर हे उद्योग आपल्या हिशोबाची पद्धत वारंवार बदलतात. लोकाना या उद्योगाची हिशोबपत्रके पहाता येत नाहीत, प्रश्न विचारता येत नाहीत. मग या उद्योगांना सार्वजनिक उद्योग का म्हणायच?

## अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम

आज हे उद्योग तीर्थक्षेत्रे राहिलेली नाहीत. हे उद्योग अकार्यक्षमता राजकारण, वशिलेबाजी याची केंद्रे बनली आहेत. गेल्या तीस पस्तीस वर्षांत या उद्योगानी जनतेच्या अपेक्षा पूर्ण केल्या तर नाहीच; पण प्रश्न मात्र निर्माण केले आहेत.

सार्वजनिक क्षेत्रात एकूण औद्योगिक गुतवणुकापैकी सुमारे ७५ टक्के गुतवणुका आहेत; पण उत्पादन मात्र एकूण उत्पादनापैकी २५ टक्के होते. परिणामतः विकासासाठी आवश्यक असलेली साधनसामुग्री या क्षेत्रातून पुरेशा प्रमाणात मिळत नाही आपल्या गरजेंएवढी निर्मिती होत नाही, वाधिणीचा तुटवडा नेहमीच भासतो. परिणामतः कोळशाचे उत्पादन, वाटप योग्य होत नाही आणि याचा परिणाम विकासावर होतो


या व्यवसायामध्ये ३०,००० कोटी रुपयांपेक्षा अधिक भांडवल गुतले आहे. या गुतवणुकीवर मिळणारा निव्वळ नफा १९८४–८५

मधे एक टक्क्यापेक्षा कमी होता. सरकार कर्जावर साधारणपणे ७ ते ८ टक्के व्याज देते. म्हणजेच सरकारला या गुंतवणुकांसाठी २४०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च होतो. हे उद्योग विकासाला मदत करतच नाहीत, उलट विकासासाठी गोळा केलेला पैसा आपले अस्तित्व टिकवण्यासाठी फस्त करतात. हे उद्योग ना नफा ना तोटा तत्त्वावर चालवले जात असतील, तर किमान भांडवल, घसारा, बदलता खर्च तरी वसूल होतील हे पाहिले पाहिजे. पण हे उद्योग अनेकदा भांडवल फस्त करून जगत असतात. या क्षेत्राकडून नियोजनास ज्या मदतीची अपेक्षा केली जाते ती कधीच पूर्ण होत नाही.

भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणुकामुळे खाजगी क्षेत्रांचा विकास मर्यादित झाला आहे. खाजगी क्षेत्रे ज्या अनेक उद्योगांत यशस्वी होऊ शकतात अशी क्षेत्रे सार्वजनिक उद्योगांकडे असल्याने खाजगी क्षेत्रे मर्यादित झाली आहेत. उदा. रस्त्यावरील वहातूक, लोखंड, पोलाद, खते इ. सार्वजनिक उद्योगासाठी सरकार कर्जाद्वारे वा अन्य मार्गाने भांडवल उभे करते. याचा परिणामही खाजगी क्षेत्रावर झालेला दिसून येतो. आता सातव्या योजनेत इंडियन टेलिफोन इंडस्ट्रीज आणि नॅशन थर्माल पॉवर कार्पोरेशन या दोन संस्थांना पुरेशा प्रमाणावर भांडवल उपलब्ध करून देता येत नाही म्हणून प्रत्येकी १०० कोटी रुपयांच्या कर्जरोखे विक्रीची परवानगी दिली आहे या कर्ज उभारणीसाठी कर्जरोखे धारकांना विविध सवलती दिल्या आहेत. उदा. या कर्जरोख्यावरची स्टॅंपड्यूटी माफ केली आहे. रोख्यांचे हस्तांतर सुलभ केले आहे, व्याजाची हमी देण्यासाठी आगावू व्याजपत्रे देण्यात आली आहेत, व्याज ७,००० रुपयांपर्यंत करमुक्त आहे इ. या कर्जरोख्यांची परवानगी इतक्या सवलतीसह सध्या दोनच कंपन्यांना दिली असली तरी इतर कंपन्यांना दिली जाणार नाही याची खात्री देता येत नाही. याचा परिणाम खाजगी क्षेत्रातील संस्थांच्या अ–हस्तांतरणीय कर्जरोख्यांच्या विक्रीवर आताच झाला आहे. सातव्या योजनेत खाजगी उद्योगातील ५४,००० कोटी रुपयांपैकी १७,००० कोटी रुपये भांडवली बाजारातून कर्जरूपाने उभे करावे लागणार आहेत. ही कर्जे उभी करताना आता निश्चितच अडचण येणार आहे आणि याचा परिणाम खाजगी क्षेत्राच्या विकासावर होणार आहे.

भारतीय सार्वजनिक उद्योगात संयोजन हे प्रामुख्याने प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून केले जाते. हे अधिकारी कुशल प्रशासक आहेत, संयोजक नाहीत. या प्रशासकांनी ह्या उद्योगांची प्रशासकीय कार्यालये केली आहेत. इथे पण सरकारी कार्यालयातील अकार्यक्षमता, चालढकल, लाचलुचपत, भ्रष्टाचार इ. गुण (?) आले आहेत. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी सेवानिवृत्तीपूर्वी दोन–चार वर्षे एखाद्या सार्वजनिक उद्योगाचा संचालक होण्याचा प्रयत्न करतो. अनुभवी कुशल प्रशासक सार्वजनिक उद्योगात गुंतल्यामुळे याचा परिणाम विकासावर झाला आहे.

आज देशात होत असलेल्या भाववाढीला सार्वजनिक क्षेत्रे कारणीभूत ठरत आहेत असे विधान केल्यास ते चूक ठरू नये. सार्वजनिक क्षेत्रात वाहतूक, कोळसा, वीज, लोखंड, पोलाद, खते इ. विकासासाठी व उत्पादनवाढीसाठी आवश्यक असलेल्या वस्तू आणि सेवांचा समावेश आहे. या वस्तूंचे आणि सेवांचे उत्पादन क्षमतेच्यापेक्षा




अपुरे असते. उदा. १९८२–८३ मध्ये देशातील वीजनिर्मितीची गरज १,२९,२४५ GWH होती. यापैकी अवघी ८९ टक्के वीज उपलब्ध केली गेली. १९८२ मधे रेल्वे वॅगन निर्मितीच्या ( ३०,६०० वॅगन ) अवघी ४९ टक्के क्षमता वापरली गेली. अन्य उत्पादनात पण वेगळी परिस्थिती नव्हती. पत्रक ४ मधे १९८३–८४ या काळातील क्षमतेचा वापर दाखवला आहे. ( पृष्ठ १८ वर )

याचा परिणाम वस्तूंच्या ( उपभोग्य ) उत्पादनावर होतो. वस्तूंच्या तुटवड्यामुळे किंमती वाढतात. शिवाय या उद्योगांचा तोटा भरून काढण्यासाठी कर लादून पैसा उभा करावा लागतो. या करांचा परिणाम किंमतीवर होऊन किंमती वाढतात

### सरकारने आखलेले उपाय

आपली नैसर्गिक साधन सामुग्री, भांडवल, कुशल मनुष्यबळ इ. मर्यादित आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासाचा वेग जर आपणास वाढवायचा असेल तर या साधनाचा पुरेपूर वापर करून घेणे आवश्यक आहे. आपण आपली साधनसामुग्री पूर्णपणे वापरत नाही याचा परिणाम विकासाच्या दरावर झाला आहे.

या क्षेत्रातले दोष राजकर्त्यांसमोर नव्याने प्रगट झाले आहेत असे नाही. हे दोष सुमारे दोन दशकांपूर्वीच प्रगट झाले होते. यासाठी मंडळे नेमली गेली, चर्चा घडवून आणल्या गेल्या. आपल्या परंपरेप्रमाणे आपण तज्ज्ञांचे अहवाल–सूचना बासनात गुंडाळून ठेवण्यात आले. आज विकास साधायचा असेल तर करवाढ करणे आवश्यक ठरले आहे, ' विकास नको कर आवर ' असे म्हणायची वेळ आली आहे. लोकसभेचे अधिवेशन जवळ आलेले असताना सुद्धा लोकक्षोभापासून वाचवण्यासाठी दरवाढ लोकसभेपूर्वी जाहीर केली जाते. अंदाजपत्रक सादर करण्यापूर्वी किंमतवाढ हे नित्याचे झाले आहे. आजच्या या परिस्थितीत सार्वजनिक उद्योग अधिक कार्यक्षम करणे आणि यासाठी काही उपाय योजना करणे आवश्यक आहे. पण आजची राजकीय परिस्थिती पहाता ही चराऊ कुरणे नियंत्रित केली जाणे अशक्यच आहे. पण सरकार असं काही तरी करत असल्याचा आभास निर्माण करत आहे.

पत्रक ४

## १९८३–८४ मधील सार्वजनिक उद्योगामधील उत्पादन क्षमतेचा वापर

| क्षमता पातळी | आर्थिक दृष्ट्या दुर्बल उद्योग | सर्व उद्योग |
|---|---|---|
| ७५% पेक्षा जास्त | १४ ( २४.२ ) | ८८ ( ५१.२ ) |
| ५०% ते ७५% | २६ ( ४४.८ ) | ४९ ( २८.५ ) |
| २५% ते ५०% | १२ ( २०.७ ) | ३५ ( २०.३ ) |
| २५% पेक्षा कमी | | |
| एकूण | ५८ ( १००.०० ) | १७२ ( १०० ) |

खुलासा : कंसातील आकडे टक्केवारी दाखवतात.

आधार : कॉमर्स ४ जानेवारी १९८६

या क्षेत्रातील उद्योगाच्या कार्यपद्धतीची चर्चा करण्यासाठी दि. ११ फेब्रुवारी १९८६ रोजी SCOPE ( Standing Committee On Public Enterprices ) ची बैठक घेतली गेली. या बैठकीत सार्वजनिक उद्योगाची स्वायत्तता चर्चिली जाणार होती. फ्रान्समधे ज्या पद्धतीने हे उद्योग चालवले जातात, त्या पद्धतीने भारतात हे उद्योग चालवता येतील का याचा विचार केला जाणार होता. फ्रान्सच्या धर्तीवर या उद्योगाच्या उद्दिष्टाची योजना संबंधित मंत्रालय अथवा खाते तयार करेल. ही योजना तीन वर्षांसाठी असेल. या उद्दिष्टांच्या निकषावर तीन वर्षानंतर या उद्योगाचे आणि संयोजकाचे मूल्यमापन केले जाईल. मध्यंतरीच्या काळात सरकार राष्ट्रीय महत्त्वाचे प्रश्न, वेतननिश्चितीसंबंधीचे प्रश्न इ. प्रश्न निर्माण झाले तरच व्यवस्थापनात हस्तक्षेप करेल. अन्यतः नाही. संयोजक मंडळातील प्रतिनिधींचे कार्य काय असावे याबद्दलचेही निश्चित धोरण ठरवले जाणार आहे.

१९८३ मध्ये अशाच प्रकारच्या सूचना त्या वेळच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी केल्या होत्या. उद्दिष्टे ठरवून देऊन तोटा कमी करता येतो हे खाण मंत्रालयाने दाखवून दिले आहे. या प्रश्नाची उत्तरे सरकारला माहीत आहेत; पण सरकारला उपाय योजना करण्याचे धाडस नाही. सत्ताधारी पक्ष मताचा विचार करतात. महाराष्ट्रातल्या १३ कापडगिरण्या सरकारने ताब्यात घेतल्या. या गिरण्यांपैकी दहा गिरण्या नफ्यात चालण्यासारख्या नव्हत्या. या गिरण्या ताब्यात घेतल्यापासूनच नुकसानीत होत्या. या गिरण्यांचे नुकसान वाढतच होते. शेवटी १९८५ च्या अखेरीला केंद्र सरकारने या गिरण्या बंद करायचा निर्णय घेतला आणि राज्य सरकारने या निर्णयाची कल्पना देऊन अनुमती मागितली; पण मजूर बेकार होतील या कारणासाठी राज्य सरकार गप्प आहे. वास्तवतः या कामगारांना अन्यत्र काम देणे शक्य आहे का ? किंवा या गिरण्यांची मालमत्ता विकून त्या अन्यत्र हलवल्यास फायदेशीर होतील का ? याचा विचार करून या गिरण्या बंद करणे आवश्यक होते. या क्षेत्रासंबंधी आता प्रश्न येवढाच आहे की, या उद्योगासंबंधीचे काही ठोस निर्णय घेऊन त्याची कठोर अमलबजावणी केली जाईल का ? सरकारला आता ही वेळ आली आहे असे खरोखर वाटत आहे का ?

आजपर्यंत या उद्योगाच्या सुधारणेसाठी वेगवेगळ्या समित्यांनी आणि तज्ज्ञांनी उपाय सुचवले आहेत. या उपायांची अमलबजावणी परिणामकारक झालेली नाही. या उद्योगाची सुधारणा करायची असेल तर व्यवस्थापकीय सुधारणा, उत्पादनक्षमतेचा पूर्ण वापर आणि निश्चित असे किंमत धोरण या गोष्टींची नितांत आवश्यकता आहे आणि या सुधारणा लवकर होणे आवश्यक आहे.

### व्यवस्थापकीय सुधारणा

कोणत्याही कारखान्याच्या यशात व्यवस्थापन हे महत्त्वाचे असते. ऑगस्ट १९८५ मध्ये ३८ सार्वजनिक उद्योगामध्ये प्रमुख कार्यकारी अधिकाऱ्यांच्या नेमणुकाच झालेल्या नव्हत्या. तर ४६ कारखान्यात वेगवेगळ्या व्यवस्थापकाच्या जागा रिकाम्या होत्या. सरकारी उद्योगात असलेल्या ३१३ प्रमुख कार्यकारी अधिकाऱ्यांपैकी (Chief Executive officer) २३३ किंवा ७४ टक्के अधिकारी ५० वर्षांपेक्षा जास्त वयाचे होते. ६१ अधिकारी ( १९.५ टक्के ) ४५ ते ५० वयोगटातले होते. १८ अधिकारी ४० ते ४५ वयोगटातले आणि अवघा एक अधिकारी तरुण अथवा ४० वर्षापेक्षा कमी वयाचा होता. हे अधिकारी नेमताना व्यावसायिक दृष्टिकोन नसतो, फक्त सोय पाहिली जाते. सार्वजनिक उद्योगात पगार, भत्ते खाजगी क्षेत्रापेक्षा कमी असतात. परिणामतः या क्षेत्रात लायक व्यक्ती यायला तयार नसतात. सार्वजनिक उद्योगात नेमणुका दोन वर्षांसाठीच केल्या जातात, डिसेंबर १९८४ मध्ये सेनगुप्ता कमिटीने या नेमणुका चार वर्षांसाठी करण्यात याव्यात असे सुचवले होते. कमी मुदतीमुळे कार्यक्षमता दाखवता येत नाही, मुदत वाढवून मिळावी म्हणून सरकारी दडपणे सहन करावी लागतात. ही पोकळी भरून काढणे आवश्यक आहे.

खाजगी क्षेत्रात जास्त वेतनाबरोबर नेमणुका कायम स्वरूपाच्या असल्यामुळे खाजगीक्षेत्रातील संयोजकांना त्यांच्या उद्योगांबद्दल आपुलकी वाटते. या संयोजकांना निर्णय घेण्याचे बरेच अधिकार दिले जातात व हे संयोजक बिनधास्तपणे निर्णय घेतात त्याचे हे निर्णय

व्यापारी दृष्टिकोनातून घेतले जातात. या विरुद्ध परिस्थिती सार्वजनिक क्षेत्रात असते. निर्णयासाठी मंत्रालये, सरकारी अधिकारी यांच्यावर अवलंबून राहावे लागते. दबावाखाली घेतलेले निर्णय, विशिष्टहेतू ठेऊन घेतलेले निर्णय योग्य नसतात. या दोषपूर्ण निर्णयांमुळे व्यवसाय प्रथम नुकसानीत येतो आणि नंतर आजारी जाहीर होतो. दुर्बल संयोजक हा आपल्या सार्वजनिक व्यवसायातला मोठा दोष आहे आणि तो दूर करणे आवश्यक आहे.

## उत्पादनक्षमतेचा अपुरा वापर

पत्रक चार मध्ये १९८३–८४ मध्ये उत्पादनक्षमतेचा वापर कसा होत होता हे स्पष्ट केले आहे. हा प्रश्न जुना आहे. १९६९–७० साली या प्रश्नाचा विचार करण्यासाठी लोकसभेची एक समिति नेमण्यात आली होती. या समितीच्या अहवालानुसार सगळेच सार्वजनिक उद्योग उत्पादनक्षमतेचा अपुरा वापर करतात. या अपुऱ्या वापराची प्रमुख कारणे उत्पादनाची कमी मागणी, मागणीबद्दलचे चुकीचे अंदाज व त्यामुळे जास्त उत्पादनक्षमता असलेली साधनसामुग्री बसवली गेली उत्पादनासाठी लागणारा दीर्घ कालावधी, यंत्रसामुग्रीची अकार्यक्षम देखभाल, सुट्या भागाची अनुपलब्धता, विक्रीचे अपुरे प्रयत्न इ. होती. विविध मंत्रालयानी आणि खात्यानी वरील दोष दूर करण्यासाठी वेगवेगळे प्रयत्न केले या प्रयत्नात सुसूत्रता नव्हती प्रत्येक प्रयत्न स्वतंत्र होता. वास्तवतः एक समिती नेमून प्रयत्नाचा एकत्रित विचार होणे व प्रयत्नाचा व्यूह निश्चित करणे आवश्यक होते, पण हे झाले नाही. या उपाययोजना अल्पकालीन तशाच दीर्घकालीनही असाव्यात. जी अवाजवी उत्पादनक्षमता आहे तिचा उपयोग अन्य उत्पादनासाठी करून घेता येणे शक्य असल्यास ती वापरून घेतली पाहिजे.

नफ्याच्या निश्चितीसाठी किंमतयंत्रणा महत्वाची असते. सार्वजनिक क्षेत्रात जिथे उत्पादन खर्च कमी करण्याचे प्रयत्न अपुरे असतात तिथे तर किंमतयंत्रणा अधिक महत्वाची असते. आदानांच्या किंमतीपेक्षा प्रदानाच्या किंमती अधिक असणे आवश्यक असते. पण सार्वजनिक उद्योगात लोखंड, पोलाद, कोळसा खते इ. क्षेत्रात जिथे ४३ टक्क्यापेक्षा अधिक गुंतवणुका आहेत अशा उद्योगात किंमत नियंत्रणाचे धोरण प्रामुख्याने स्वीकारून किंमती कमी ठेवल्याने तोटाच वाढला आहे १९७६ साली ठरवलेल्या धोरणानुसार असे धोरण (किंमती कमी ठेवण्याचे) निश्चितच फायदेशीर ठरणार नाही. या उद्योगानी आंतरराष्ट्रीय नियमानुसार अथवा उत्पादकानी एकत्र येऊन स्वखुशीने केलेल्या नियमानुसार किंमती ठरवाव्यात.

१९६७–६८ मध्ये नेमलेल्या कमिटीने असे स्पष्टपणे सुचवले होते की, सार्वजनिक उद्योग आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरतील, सरकारच्या उत्पन्नात भर टाकतील, यादृष्टीनेच किंमतधोरण ठरवले जावे. आज हे धोरण स्वीकारले गेलेले नाही. त्यामुळे नुकसान वाढतच चालले आहे. किंमती नियंत्रित केल्या जात असल्यामुळे खर्चाचा विचार करण्याची गरज नाही अशी एक भावना निर्माण झालेली आहे. किंमतीचा विचार अधिक सखोल होणे आवश्यक आहे. सरकारने या उद्योगांना आर्थिक मदत करावी; पण किंमती मात्र बाजारातील क्रियाप्रकारानी ठराव्यात. या उद्योगाना मदत किती काळ करायची ? मदतीच्या मार्गाने या उद्योगाच्या अक्षमतेवर किती काळ पांघरूण घालायचे ?

## नूतनीकरण

आज उत्पादनात आधुनिकीकरणाद्वारे उत्पादनात वाढ व उत्पादनखर्चात घट केली जात आहे. पण सार्वजनिक उद्योगात आधुनिकीकरणाला मजूर संघटनाकडून मजूर बेकार होतील या कारणासाठी विरोध केला जातो. कामगारांना कामाची–नोकरीची हमी देण्याचे सरकारचे धोरण आहे आणि सुमारे १६ द. लक्ष कामगार असलेल्या क्षेत्रातच आधुनिकीकरणाच्या नावाखाली बेकारी वाढवणे सरकारला राजकीय व सामाजिक स्थैर्याच्या दृष्टीने परवडणारे नाही. आधुनिकीकरण टाळणे म्हणजे नुकसानीला प्रोत्साहन देण्यासारखे आहे. हे दोन्ही धोके टाळण्यासाठी या उद्योगानी कामगार संघटनाशी चर्चा करून आधुनिकीकरणाची योजना तयार करावी, ज्या मजुरांवर बेकारी येणार आहे त्याना व्यावसायिक शिक्षण देऊन नवीन क्षेत्रात त्याना काम उपलब्ध करून द्यावे. त्या व्यवसायाच्या विस्तारयोजनेत या कामगाराना प्राधान्य द्यावे. अशा योजना तातडीने आखल्या जाव्यात.

## उद्योगांचे खाजगीकरण

सार्वजनिक उद्योगाचा अनुभव एकाच प्रकारचा आहे सरकार चांगली राज्यव्यवस्था देऊ शकते, संयोजन नाही हे आता अगदी साम्यवादी राष्ट्रांनीसुद्धा मान्य केले आहे. जगात अनेक देशात सरकारी उद्योग खाजगी क्षेत्राकडे सोपवून या जबाबदारीतून मुक्त व्हायला सुरुवात केली आहे.

१९ व्या शतकाच्या अखेरीअखेरीस जपानमध्ये युरोपातून आधुनिक तंत्रज्ञान आयात करून उद्योगाची सुरुवात केली, पण सुरुवातीसच जपानच्या लक्षात आलं की सरकारी उद्योग नुकसानीत येत आहेत आणि जपानने १८७४ ते ९६ या काळात सरकारी उद्योग खाजगी क्षेत्रात आणले. १९०४ मध्ये जपानने सिगरेट आणि तंबाखू क्षेत्रात उत्पादन सुरू केले. या व्यवसायातून जपानला एकूण उत्पन्नापैकी २० टक्के उत्पन्न मिळत होते. अॅडमिनिस्ट्रेटिव्ह रिफार्म कमिशनने या उद्योगाचे खाजगी क्षेत्रात हस्तांतर करण्याचा सल्ला दिला आहे.

इंग्लंडच्या पंतप्रधान सौ. मार्गारेट थॅचर यानीपण इंग्लंडमधील अनेक उद्योगाचे खाजगीकरण केले आहे. टेलिकॉम या संस्थेतल्या भांडवली गुंतवणुका तर ५,००० कोटी रुपयाच्या होत्या. इंग्लंडमधल्या निवडणुकानी दाखवून दिले आहे की, या बदलास लोकाचा पाठिंबा आहे. या हस्तांतरित संस्थापैकी बऱ्याच फायद्यात चालत होत्या

बंगलादेशाने स्वातंत्र्य मिळाल्यावर उद्योगाचे सरकारीकरण केले. पण १९८२ सालच्या औद्योगिक धोरणानुसार सरकारने जे उद्योग ताब्यात घेतले होते ते खाजगी उत्पादकांना परत केले जाणार आहेत. ज्या उत्पादकाची हे कारखाने परत घ्यायची आर्थिक कुवत नाही अशा उत्पादकाना आर्थिक मदत केली जाणार आहे.

आपला शेजारी पाकिस्तानपण याबाबतीत मागे नाही. पाक अर्थ-

मंत्र्यांनी १९८५–८६ च्या अंदाजपत्रकात घोषणा केली होती की पाक सरकारला निवडक सरकारी उद्योगांच्या भागांच्या हस्तांतराद्वारे १९८५–८६ मध्ये २०० कोटी रुपये मिळतील.

युरोपमधील अनेक देशांनी सरकारी उद्योगांचे खाजगीकरण करायला सुरुवात केली आहे आणि यामध्ये साम्यवादी देश मागे नाहीत. चीनचे उदाहरण यादृष्टीने उत्कृष्ट आहे. चीनमध्ये शेतकऱ्यांना खाजगी शेतीस परवानगी दिली आहे. शेतकऱ्यांना सरकारला दिल्यानंतर उरलेले धान्य विकता येते. खाजगी नोकऱ्या करून उत्पन्न वाढवता येते. चीन सरकारने परकीय उद्योजकांना व्यवसाय सुरू करायला परवानगी दिली आहे. शांघायमधील ३० सरकारी उद्योग खाजगी उद्योजकांना लीजवर दिले आहेत. आणखी २०० उद्योग सामूहिक मालकीचे करण्यात येणार आहेत.

या वेगवेगळ्या देशात सार्वजनिक क्षेत्रांची मालकी खाजगी क्षेत्रात हस्तांतरित करताना वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब केला आहे. उदा. इंग्लंडमध्ये सगळे भागभांडवल खाजगी क्षेत्रात हस्तांतरित केले नाही. बांगला देशाने उद्योगांची मालकी पूर्णपणे खाजगी उद्योजकांना दिली आहे, तर चीनमध्ये सामूहिकीकरणाचा मार्ग स्वीकारला आहे.

भारतामध्ये सार्वजनिक उद्योगांचे खाजगीकरण करावे याबद्दल १९७३ पासून चर्चा चालू आहे; पण आजपर्यंत यासंबंधी काही ठोस कार्यवाही केली गेली नाही. मे १९८५ मध्ये झालेल्या संयोजकांच्या बैठकीत नुकसानीत चालणारे सरकारी उद्योग खाजगी क्षेत्रात हस्तांतरीत करण्याचे सुचवले होते.

भारतात सार्वजनिक उद्योगाचे खाजगीकरण केले तर

(१) सरकारचा या क्षेत्रात अडकून पडलेला पैसा विकास योजनांसाठी उपलब्ध होईल.

(१) भांडवलाचे अंशतः हस्तांतर झाल्यास नफ्याच्या रुपाने उत्पन्न मिळेल.

(३) सरकारचे मनुष्यबळ पूर्ण शक्तीने विकासासाठी प्रयत्न करू शकेल.

भारतात हे सार्वजनिक उद्योग खाजगीक्षेत्रात हस्तांतरित करण्याबद्दल लोकमत हळू हळू तयार होत आहे. भाग विक्री काय दराने करायची? किती भाग विकायचे? कोणत्या उद्योगांचे भाग विक्रीसाठी काढायचे? इ. निर्णय सरकारने घ्यायचे आहेत; पण या संबंधी काही सूचना करता येतील.

जे उद्योग व्यवस्थित चालण्याइतके तंत्रज्ञान खाजगी क्षेत्राने विकसित केले आहे, असे उद्योग सरकारने खाजगी क्षेत्रात हस्तांतरित करावेत व अशा क्षेत्रात सरकार सार्वजनिक उद्योग सुरू करणार नाही असे निश्चित धोरण ठरवावे. सरकारने भाग भांडवल पूर्णपणे न विकता काही भाग स्वतःजवळ ठेऊन या खाजगी उद्योगांचे नियंत्रण करावे अथवा सरकारने कायदे करून या उद्योगांचे नियंत्रण करावे. सरकारने या उद्योगांच्या नियंत्रणात पंचाची भूमिका पार पाडावी, खेळाडूची नाही.

सरकारने चांगले संयोजक–तज्ज्ञ सार्वजनिक उद्योगामध्ये आणण्यासाठी उत्पादनक्षमतेच्या आधारावर आर्थिक प्रलोभने द्यावीत वस्तूंचे उत्पादन वाढवताना मागणी वाढवण्याचे प्रयत्न व्हायला हवेत. अनेक सार्वजनिक उद्योगात कामगारांनी एकत्र येऊन उत्पादन-संस्था सुरू करता येण्यासारखे आहे. ही परवानगी दिल्यास गुणवत्ता आणि कार्यक्षमता टिकवता येईल. अशा प्रकारच्या विविध सूचना करता येतील.

एक गोष्ट मात्र खरी की, हे उद्योग फायद्यात चालवले पाहिजेत. हे पांढरे हत्ती यापुढे पोसणे आपल्या अर्थव्यवस्थेला अशक्य आहे. □


डार्विनचे वेगळेपण हे की त्याने माणसाला 'माणूस' केले. मनुष्यात 'ईश्वरी' अंश आहे, तसेच कोणा एकाच्या पापामुळे मनुष्यजन्म प्राप्त झाला आहे, या दोन्ही धार्मिक असत्यांच्या मगरमिठीतून त्याने माणूस मुक्त केला.

पण भारतीय समाजाला ही मगरमिठी अजून पूर्ण सोडवता आलेली नाही. माणसातील जाती-पोटजाती थेट परमेश्वराने निर्माण केल्या आहेत अशी आपली श्रद्धा आहे.

म्हणूनच डार्विन चरित्राचा अभ्यास आज उपयुक्त ठरेल.

# चार्ल्स डार्विन

**व्यक्ती, क्रांती आणि उत्क्रांती**

**लेखक : भा. रा. बापट**

डेमी आकार, पृष्ठे : १८२
भरपूर आकृत्या व साधार
विवेचनासह प्रकाशित झालेली
पहिली आवृत्ती.

**किंमत : रुपये बत्तीस**

शाळा कॉलेजच्या ग्रंथपालांनी
त्वरित मागणी करावी.

राजहंस प्रकाशन

१०२५ सदाशिव, पुणे ३०.

## पुस्तके

# चौफेर दृष्टी—नेमके विचार

मराठी साहित्याच्या क्षेत्रात बुद्धिमान, रसिक, सखोल चिंतनशीलता असलेले, आपल्या वाणीच्या आणि लेखणीच्या स्पर्शाने वर्ण्य विषयाला नवे तेज प्राप्त करून देणारे जे समीक्षक आहेत त्यात स. शि. भावे यांचे स्थान बरेच वरचे आहे. आपापल्या क्षेत्रात यश मिळविलेल्या प्रत्येक व्यक्तीची काही तपश्चर्या असते. अवघड चढण चढलेली असते, वाटेतल्या काटयाकुटयांनी दिलेलं दुःख झेललेलं असतं. चाकोरीबाहेरचं जीवन जगू पहाणाऱ्या माणसाची— मग तो सामान्य माणूस असो की कीर्तीवंत, यशवंत असो त्याची वाट अधिकच बिकट असते. म्हणूनच प्रा. भावे म्हणतात. 'बिकट वाट पत्करायची तर अनेक प्रकारांनी किंमत मोजावी लागते. बिकट वाट पत्करणारा माणूस हसतमुखाने अशी किंमत मोजतो. प्रस्तुत लेखक अशा माणसांपैकी एक आहे.'

'विवेक' साप्ताहिकामधून जुलै ८३ ते सप्टें ८४ या काळात ही बिकट वाट त्यांनी वाचकांपर्यंत पोचवली आहे. या लेखनाचं स्वरूप काही प्रमाणात नैमित्तिक, त्या त्या वेळच्या घटनांमधून झालेल्या प्रगट चिंतनाचं आहे. तरी या लेखनातून व्यक्त झालेले विचार, व्यक्तिजीवनाच्या, समाजाच्या, राष्ट्राच्या मूळ गाभ्याला स्पर्श करणारे आहेत. यामुळे यात सार्वकालीन ताजेपणा आहे. स्फुट लेखनाच्या यशाचे हे एक गमक आहे. यात एकूण सतरा लेख आहेत. प्रत्येक लेख, लेखकाच्या मूलग्राही दृष्टीचा, स्वतंत्र विचार शक्तीचा द्योतक आहे. यात कुठेही बोजडपणा, क्लिष्टता, पांडित्यपूर्ण उग्रता नाही. जनसामान्यांना डोळयापुढे ठेवून साध्यासोप्या भाषेत पण नेमकेपणाने केलेले हे लेखन आहे म्हणूनच ते मनाला भिडतं. यातून मांडलेले प्रश्न हे आपलेच प्रश्न वाटतात.

'ज्याची त्याची वाट' या पहिल्याच लेखात भावे लिहितात— 'माणूस म्हटला की मूल्यभाव आलाच आणि मूल्यभावाचे समाधान झाल्याखेरीज माणसाचे खरे समाधान होत नाही. याचे पुरावे दोन :— एक म्हणजे प्रत्येकजण आपल्या व्यावहारिक वागणुकीचे तात्विक समर्थन करू पहातो. 'रॅशनलायझेशन' ते हेच. दुसरे म्हणजे, बहुतेकजण आपल्या व्यावहारिक, स्वार्थपर वागणुकीचा मूल्यभावात समतोल साधू पहातो. 'कॉम्पेन्सेटरी' वागणे ते हे.' रोजच्या जीवनात अनुभवाला येणारं हे माणसाचं वागणं त्यांनी, नेहरूंनी शेख अब्दुलांना अटक केली नि स्वतःच्या निधनापर्यंत त्यांच्या सुटकेचा विचारसुद्धा केला नाही या राजकीय घटनेशी नेऊन भिडवलं. 'भारताची एकात्मता' हा नेहरूंचा मूल्यभाव होता. ती वाट बिकट होती तरीही त्यांनी तीच पत्करली असं सांगून मूल्यभावाची चिकित्सा कशी खोल, गहन, गूढ असते ते स्पष्ट केलं आहे.

मूल्यं जपण्याच्या संदर्भात विचार केला तर भारतातली परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. बिकट वाटेने जाऊ पहाणारा जीवनातून उठण्याचीच शक्यता जास्त. स्वतःचं नवीन विश्व निर्माण करण्याची आणि त्यातच रममाण होण्याची ज्याची ताकद असेल त्याने या वाटेने जावं. ही परिस्थिती सामान्य पण सात्विक प्रवृत्तीच्या माणसांना व्यथित करते आहे, हे नक्कीच. म्हणूनच 'दोन नंबरचे नेतृत्व' 'गुंडशाहीपुढे अगतिक... छोटी माणसे ! छोटी राष्ट्रे !' 'आत्मसंरक्षण हेच खरे रक्षण' या विषयांवरचे लेख लक्ष वेधून घेणारे ठरतात. भारतीय जीवनाचा हा अधःपात आजच्या शाळकरी मुलांनाही माहीत आहे. प्रश्न आहे तो असा की ही परिस्थिती बदलण्यासाठी जनसामान्यांनी काय करायचे व कसे करायचे ? प्रा. भावे म्हणतात, 'बहुतेक नेत्यांना जनमताचा धाक उरलेला नाही.' याची कारणे खोलात शिरून तपासायला नको का ? आपले काम मनःपूर्वक, प्रामाणिकपणे, निष्ठेने करण्याची उत्कट इच्छा असलेली माणसं आजही आहेत, पण त्यांना तसे करू न देणारी, त्यांनी सोज्वळ राहू नये म्हणून धडपडणारी, त्यांना त्रास देणाऱ्यांना पाठीशी घालणारी माणसं जास्त आहेत. या लेखांमधून, ही परिस्थिती बदलण्याचे ठोस उपाय किंवा प्रयत्नांची दिशा कळत नाही त्यामुळे हे विवेचन अपुरं वाटतं.

कुटुंब नियोजनामुळे जोडप्यांची जी भावनात्मक उपासमार होते त्यावर एक लेख आहे. एकच मूल असलेले जोडपे मुलाच्या काळजीचा ताण सतत सहन करीत असते. आणि एकच मुलगी असेल तर मुलाचा आनंद नाही, एकच मुलगा असेल तर मुलीचा आनंद नाही ही परिस्थिती सहृदय, भावनाशील दांपत्याच्या बाबत तरी खरीच आहे. कुटुंबनियोजन भारतात आवश्यकच आहे, पण ते सरसकट सर्वांना सारख्या प्रमाणात नसावं, त्याच्या दुष्परिणामाचा दूरदर्शीपणाने विचार केला जावा अन्यथा नवीनच संकटं उभी रहातील. या लेखात देशापुढे असलेल्या महत्त्वाच्या प्रश्नाला वेगळया दिशेने वाचा फोडली आहे. हा लेखही विषयाच्या महत्त्वाच्या संदर्भात संक्षिप्त आहे. अर्थात हे स्तंभलेखन आहे याची वाचकांनी जाणीव ठेवायला हवी. पण या लेखनात दीर्घ निबंधाचो बोज दडलेली आहेत म्हणून प्रा. भावे यांच्याकडून अधिक लिहिले जावे आणि त्यांनी समाजाला विचार धन द्यावे असे वाटते. 'सद्‌गुण वैयक्तिक व सामाजिक' आणि 'खोटया चांगुलपणाची दलदल' यापैकी पहिल्या लेखाचा शेवट मला असमाधानकारक वाटतो. वैयक्तिक सद्‌गुण आणि सामाजिक सद्‌गुण यात सुसंगती आणणं हा उपाय सांगणं सोपं आहे. पण प्रत्यक्षात ही सुसंगती जवळ जवळ अशक्य आहे. आपल्या न्यायबुद्धीला स्मरून वागताना व्यक्तीला किंवा समाजाला विशिष्ट प्रसंगी दुखविण्याची तयारी ठेवणं हाच एक मार्ग शिल्लक रहातो. कोणत्याही बाबतीत वाईटपणा घेण्याची तयारी असणारी माणस अत्यल्प असतात. अशी वाट बिकट असते म्हणूनच या समस्यांची उत्तरही बिकट असतात. ती ज्याची त्यानेच द्यायची असतात. 'असं झालं तर असं होईल' या स्वरूपाची ती नसतातच. प्रा. भावे यांनी केलेला या लेखाचा शेवट मला प्रा. ग. बा. सरदार यांच्या 'साहित्यातील सामाजिकता' या निबंधाच्या शेवटासारखा वाटतो. त्यांच्या मते सामाजिक न्याय व समता यावर आधार-

लेली नवी समाजरचना अस्तित्वात आली तर व्यक्ती आणि समाज याच्यात सुसवाद साधता येईल. पण मला वाटत व्यक्ती व समाज याच्यातील सघर्ष पूर्णपणे नष्ट होण ही घटना कालचक्राला नामजूर आहे. स्वप्न पहाण्याची ताकद माणसाने गमावू नये एवढाच बोध या दोन्ही विचारवताच्या लेखनातून मला तरी घेता आला.

' खोटया चागुलपणाची दलदल ' आपल्या नेहमीच्या परिचयाची. अगदी खास मध्यमवर्गीय एक ठाम निर्णय घेऊन त्यानुसार वागणं हे बहुतेकाना जमत नाही. विचार भावना एकमेकात गुतवणं, नात्यानात्यातला गोंधळ वाढवण ही आपली खास मिरासदारी यावरच विवेचन मला खूप आवडल. सर्वांना आवडेल असच ते आहे. ह्या क्रीडास्पर्धा की उत्सवी तमाशे ' या लेखात आपण क्रीडा प्रेमी असण्यापेक्षा उत्सवप्रिय कसे आहोत आणि खेळ हा हल्ली एक धदा कसा झाला आहे याच रोखठोक विवेचन आहे. ते पटण्यासारखच आहे, ' भारतीय एकात्मतेच्या आधुनिक आधारशीला ' या लेखावर सावरकराच्या विचाराचा प्रभाव स्पष्ट आहे-

१ आजच्या भारताची प्रादेशिक व राजकीय एकता

२. सीमाचे, तसेच अंतर्गत हेरगिरीपासून आपल्या सुरक्षा व्यवस्थेचे सरक्षण.

३. शास्त्रीय प्रगती

४. आतरराष्ट्रीय व्यवहारातील आपले महत्त्व आणि वेगळेपण या चार आधारशिला सागितल्या आहेत. यावर तपशीलवार लिहायला हवं असही म्हटल आहे. यातल्या जवळजवळ प्रत्येक लेखाबाबत वाचकाची मनोमन हीच मागणी असेल. कोणती भाषा ? कोणती सस्कृती ?' ' आधी निर्भेळ अन्न द्या. नतर टॉनिके ' या इतर लेखामधले विचारही आपल्या रोजच्या जीवनाला स्पर्श करणारे आहेत. सगळया लेखाचा सविस्तर परामश इथे शक्य नाही; पण अभिमानास्पद गोष्ट ही की प्रा. भावे याच्यासारख्या चोखदळ, कलावादी साहित्यसमीक्षकाची दृष्टी किती चौफेर आहे, निव्वळ कलेचाच नव्हे तर सामाजिक, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय बाबीचा विचारही ते किती नेमकेपणाने माडतात याची चुणुक या लेखनामधून दिसते. शुद्ध कलानदामध्ये गुग होऊन न रहाता भोवतालच्या विशाल जगाच भान ठेवून अधिकाराने लेखन करणाऱ्या व्यक्ती कमी आहेत म्हणूनच प्रा. भावे यानी सर्वस्पर्शी, विपुल, विस्तृत लेखन करीत रहाव अस वाटत आणि असं वाटायला लावण हीच या लेखनाच्या यशाची पावती असेल का ?

—मेधा सिधये

बिकट वाट
प्रा स. शि. भावे
आराधना पब्लिकेशन्स
पृष्ठे : ९२, किंमत : १६ रु.

## जागर—ग्रामीण कादंबरी

मराठी वाङ्मयात ग्रामीण जीवनावर कथा, कादबऱ्या इतक्या झाल्या आहेत की, नवीन असे काय वाचायला मिळणार असा प्रश्न पडतो. शकर पाटील, द. मा. मिरासदार, व्यकटेश माडगूळकर, उद्धव शेळके इत्यादी लेखकानी त्याच्या कथा कादबऱ्यातून जो पायडा—अर्थात चागला पाडला आहे त्या धर्तीवर कोणीही लिहावे व मी ही ग्रामीण कथा लिहू शकतो असे दृगोचर करावे असे दिसू लागले आहे. काही लेखकाना ती भट्टी जमली पण काहीना ती जमली नाही असे खेदाने म्हणावेसे वाटते दुर्दैवाने प्रस्तुत कादबरी ही वर नमूद केल्याप्रमाणे दुसऱ्या वर्गात मोडते.

इतर ग्रामीण कथाकाराच्या कथाप्रमाणेच या कादबरीचा बाज आहे. सुप्त दुष्ट प्रवृत्तीची व प्रकृतीची माणसे. त्याचे झगडे, एकाचा विजय दुसऱ्याचा पराजय, काही शिक्षित काही अशिक्षित माणसे, त्यामुळे त्याच्या वागण्यात, बोलण्यात, बसण्यात, उठण्यात दिसणारा फरक. बाई—बाटलीच्या मागे लागणारे—पैसा जमीन जुमला आहे म्हणून त्यावर पैसा उधळणारे स्वार्थाकरिता पैसेवाल्याची थुकी झेलणारे, काही बावळट चेहऱ्याची माणसे आणि त्याचे वागणे, सकाळ, दुपार, सायकाळ, रात्र याची ती खेडेगावातील नैसर्गिक वर्णने, रस्ते घरे याची वर्णने वगैरे मसाला याही कादबरीत आहे; पण अत.करणाला जाऊन भिडेल असे एकही व्यक्तिदर्शन दिसत नाही की ती व्यक्ति बऱ्याच काळ मनात घर करून राहील. व्यक्तीच्या बोली भाषेतून वा प्रसगातून विनोदाची पखरण झाली आहे असेही वाटत नाही. एकूण कादबरी गभीर प्रकृतीची भासली, पण लेखकाने जी व्यक्ती दर्शने दाखविली आहेत त्यावरून अशा तऱ्हेची माणसे असू शकतात असे दृगोचर होते.

सातारा जिल्ह्यातील टाकली गाव व त्याचा परिसर व तेथे ग्रामपचायत स्थापन झाली आहे येथपर्यंत प्रगती झालेले खेडेगाव मग तेथे अध्यक्ष, सरपच, उपसरपच आलेच. द्वेष, भाडण यापायी झालेले दोन तट. त्याचा एकमेकावर कुरघोडी करण्याचा प्रयत्न, मग सत्याचा विजय दाखवायचा, असत्याचा पराजय दाखवायचा हे मधे आलेच. नाट्यप्रसग आहेत पण कथेला किंवा पात्राच्या स्वभावाला कलाटणी मिळते आहे असे दिसत नाही पण शब्दचित्राद्वारे लेखक वातावरण उभे करू शकतो. भले मग ते निसर्गाचे असो खेडेगावी वातावरणाचे असो वा पात्राच्या पोशाखाचे व हालचालीचे असो. प्रादेशिक बोलीचा वापर लेखकाने केला आहे. विशेषत: क्रियापदाबाबतीत उदा. पडत्याला, बोलत्याला, येत्याला, काढत्याला, लागत्याला पण तेवढच; पण खास करून बोलीचा वापर दिसला नाही, काही शब्दाची घडण बरोबर वाटत नाही. उदा ' नर्स ' हा शब्द गावढळ पद्धतीने लिहायचा म्हटल तर ' नरस ' असे लिहिणे उचीत वाटत नाही. (पृ. ६४) पुस्तकाची २२/२३ पाने वाचून झाली तरी कादबरीत येणाऱ्या कथासूत्राचा एकसुरीपणा आढळत नाही. कदाचित पार्श्वभूमी तयार करायला लेखकाने तुटक तुटक वर्णने केली आहेत असे भासते पान २७ वर स्कूटर स्टार्ट करण्याचे वर्णन लेखकाने दिले आहे. स्कूटर स्टार्ट करायला स्टार्टरवर किक मारली तर एखादे वेळेस स्टार्टरच झटक्याने उलट येऊन पायाला लागतो पण लेखक लिहितो मडगार्डचा दणका पायाला लागला असे लिहिले आहे. यावरून लेखकाची अवलोकन दृष्टी दिसून येते.

शहरातील सुधारणाचे लोण खेड्यात पोचताना दिसते. पण ते शेवटी शेवटी आढळते हे कथेच्या बाधणीच्या दृष्टीने अपुरे

वाटते. शिक्षित मुल अशिक्षिताना आपल्या वागण्याने चांगले नागरिक बनविण्याचा प्रयत्न करतात व तसे घडतेही; पण जणू काही हे एका रात्रीत घडून आल्यासारखे वाटते. तेथे मग सहकारी खत कारखाना होतो. उद्घाटनाला मंत्री येतात वगैरे.

कादंबरीचा शेवट दुखात केला आहे पण त्यामुळे अरेरे वाईट झाल, अस व्हायला नको होते असे मात्र वाटत नाही. गावातील अध्यक्ष आबा हा त्या कारखान्याचा विध्वंस करणारे (त्याच्या स्वभावाप्रमाणे) पर्यायाने आबासारख्या खलनायकाचा पर्यायाने त्याच्या शिरजोरपणाचा विजय झाला आणि सज्जन माणसाचा चुराडा झाला. एकूण कादंबरीची जडणघडण लक्षात घेता शेवट बरोबर की चूक हे वाचकानीच ठरवावे. पृ. ११७ वर (शेवटी) लेखकाने कादंबरीत निर्माण केलेली समस्या. याबाबतीत तो लिहितो .. 'समस्या सुटणार आहे का? कशी सुटणार आहे; पण हे सागण्याची जबाबदारी लेखक म्हणून फक्त माझ्या एकट्यावरच आहे का? आपणही विचार करावा थोडा!...'

खरं म्हणजे कादंबरीकाराने असे लिहू नये. वाचकावर सोडावे. वाचक काय कादंबरीकाराशी संवाद साधणार आहेत का? अशी अपेक्षा कादंबरीकाराने करू नये असे मला वाटते.

— वसंत फाटक

'जागर'
लेखक : पद्माकर गोवईकर
प्रकाशक : श्री विद्या प्रकाशन, पुणे
पृष्ठे : १२४.
मूल्य : रु. ३०.

सांस्कृतिक डोंबिवली

## पांढऱ्या केसांचे, हिरव्या मनाचे दोन साहित्यिक

डोंबिवलीला ऐतिहासिकदृष्टया महत्त्वाचे स्थान नाही. कल्याण, भिवंडी इत्यादी शहरासारखा शेकडो वर्षांचा इतिहास नाही. असे असले तरी वर्तमानकाळातील ह्या शहराची कामगिरी नजरेत भरणारी आहे. ह्या शहराचे वैभव अनेक व्यक्तीच्या विविध क्षेत्रातील कर्तबगारीने दिसामासाने वाढते आहे. त्यात लेखकाचा वाटा फार मोठा आहे. अनेक नामवतलेखक इथे रहात होते आणि आहेतही. इग्रजीत सागावयाचे झाले तर आज मी दोन 'ग्रॅण्ड ओल्ड मेन ऑफ् लेटर्स' ची दखल घेणार आहे. आज डोबिवलीत वयाची नव्वदी उलटलेल्या श्री. मो. वा. जोशी यांचेपासून ते अगदी ऐन तारुण्यात असलेल्या लेखकापर्यंतच्या पिढ्या डोबिवलीत आहेत. त्यापैकी दुसरे म्हणजे श्री. ल. ना. भावे ह्या दोघाना मी भेटलो. त्याच्या पूर्वकालीन साहित्यिक कर्तुत्वाबद्दल आणि आजच्या निवृत्त जीवनाबद्दल त्याच्याशी बोलला. त्यातून आकाराला आला हा लेख.

आजच्या डोंबिवलीत नव्वदी पार केलेले नागरिक अगदी हाताच्या बोटाइतके असतील. महाराष्ट्रातील लेखकात शभरीच्या उंबरठ्यावरचे किती लेखक आहेत? मला नाही वाटत श्री. मोरेश्वर वासुदेव जोशी (जन्म इ. स. १९–१०–१८९३) ह्याच्याव्यतिरिक्त दुसरा कोणी असेल? सतत ३४ वर्षे शिक्षकी पेशात वावरलेले आणि इ. स. १९४८ साली निवृत्त झालेले श्री. जोशी हे विनोदी लेखक, कादबरीकार आणि लघुकथाकारही आहेत. तीन कादबऱ्या (नवजीवन इ. स. १९२४, 'पावनतीर्थ' : इ. स. १९२५, 'गिरिजा' : इ. स. १९२७), दोन विनोदी कथा/लेख संग्रह ('वगूनानाचे आत्मचरित्र' : इ. स, १९२६ 'पुढारी की पेंढारी' : इ. स, १९३०), एक लघुकथा सग्रह ('अनेक गोष्टी' इ. स. १९३४), आणि एक आत्मचरित्र ('एका पथिकाची जीवनयात्रा'. इ. स. १९६४) असे साहित्य सप्तक त्याच्या हातून निर्माण झाले ज्याअर्थी नियतकालिकातून प्रसिद्ध झालेल्या स्फुट लेखनाला ग्रंथरुप लाभले त्याचा अर्थ असा आहे की त्या लेखकाला वाचकमान्यता लाभली होती, आहे. एवढेच नव्हे तर त्याच्या आत्मचरित्राला महाराष्ट्र सरकारचे रु. १५००/– चे पारितोषिकही मिळाले आहे. त्या सदर्भात श्री. जोशी म्हणाले 'त्या वेळेस दोन हजाराचे पहिले आणि एक हजाराचे दुसरे अशी बक्षिसे होती. पण त्यावर्षी त्या दोन्ही बक्षिसाची रक्कम एकत्र करून आम्हा दोघात विभागून दिली.' आत्मचरित्रकार म्हणून वाचकमान्यता आणि राजमान्यता त्याना मिळाली. त्याहीपेक्षा विनोदी लेखक म्हणून मिळालेली पावती अधिक महत्त्वाची आहे. श्री. राम कोलारकर हे मराठी कथाचे साक्षेपी आणि विचक्षण संपादक म्हणून मान्यता पावलेले आहेत. त्यानी इ स. १८४५ ते १९५४ ह्या कालखडातील निवडलेल्या दोनशे विनोदी कथाचे, 'सर्वोत्कृष्ट मराठी विनोदी कथा'चे दहा खड प्रसिद्ध करावयाचे ठरविले आहे. त्यातील खड १ ला मध्ये श्री. जोशी ह्याची इ. स. १९३० साली प्रसिद्ध झालेली 'काजीसाहेबाची वखार' ही विनोदी कथा समाविष्ट करण्यात आली आहे. त्या सग्रहात कै. ह. ना. आपटे, साहित्यसम्राट कै. न. चिं. केळकर, कै वि. स. खांडेकर इ. लेखकाच्या कथा आहेत.

असा हा ब्याण्णव वर्षांचा लेखक इ. स. १९४० पासून डोबिवलीत रहात आहे. पण त्याची दखल फारशी कोणी घेतली नाही 'आणि पुढे पुढे करण्याचा माझा स्वभाव नाही.' अशी अवस्था आहे. त्याच्याशी बोलू लागल्यावर ते सागू लागले 'आज माझे वय झाले असले तरी मला कोणतीच व्याधी नाही. मी पूर्णपणे निर्व्यसनी आणि मिताहारी आहे मला झोप छान येते. माझे श्रवण, स्मरण आणि पचन चागले आहे. मी नवे फारसे वाचले नाही पण जुने मराठी आणि इग्रजी लेखक भरपूर वाचले आहेत मी म्हातारा'झालो असे मला वाटत नाही. मी दूरदर्शन पाहतो. अगदी छायागीतही पाहतो. हिंदी-ऊर्दू सवाद कळत नाहीत म्हणून

हिंदी सिनेमा पहात नाही. मला तमाशापट, म्हणजेच आजचे मराठी चित्रपट आवडत नाहीत म्हणून पहात नाही. वॉल्ट डिस्नेचे व्यंगचित्र चुकवत नाही. संध्याकाळी थोडे फिरून येतो (पहिल्या मजल्यावरून उतरून हा वृद्धयुवा रोजची फेरी चुकवीत नाही). माझ्यावर गांधीजींच्या विचाराचा परिणाम आहे. मी स्वत:ला गांधीवादी मानतो म्हणूनही डोंबिवलीकरानी मला दूर लोटले असावे. पण माझी कोणाबद्दलच कसलीही तक्रार नाही. मी अगदी तृप्त आहें, संतुष्ट आहें. कधीही बोलावणे आले तर जावयास तयार आहे. मी म्हटले 'तुमची तब्येत, स्वभाव पाहता तुम्ही मराठीतील पहिले शभर गाठलेले लेखक होणार. त्यावर सौ. जोशी (त्याही गप्पात मनापासून सहभागी झाल्या होत्या.) म्हणाल्या 'आमचे एक जावई डॉक्टर आहेत ते असेच म्हणाले'

कोकणातील सर्वच बाबतीत प्रतिकूल परिस्थिती असणाऱ्या कुटुंबातील श्री जोशी त्या सर्वांवर मात करून आपला लेखनाचा अंकुर त्यांनी जोपासला. स्वत:बद्दल, इतराबद्दल, दैव, नशिब इ. बद्दल कुरकुर न करता कुणालाच दोष न देता, कर्मकांड न मानता आपल्या वाट्याला आलेले आयुष्य सुखासमाधानाने जगत आहेत. राहून राहून असे वाटते की डोंबिवलीच्या सांस्कृतिक जीवनाने त्याना जवळ करायला पाहिजे होते. त्यांच्या सक्रिय सहभागात ते कालचे जीवन अधिक समृद्ध झाले असते. 'जीवेत् शरदः शतम्' असे मनापासून म्हणावेसे वाटते.

## मी समाधानी आहे

श्री. जोशी ह्याच्या तुलनेने श्री. लक्ष्मण नारायण भावे (जन्म इ. स. २५ जून १९०८) ह्यानी डोंबिवलीच्या सुरुवातीच्या काळात (इ. स. १९५० नंतरच्या) मोठ्या उत्साहाने भाग घेतला. त्यांचीही ग्रंथसपदा मोजकीच पण भरघोस यशस्वी अशी आहे. 'समरागण' इ. स. १९४४, 'पठ्ठे बापूराव:' इ. स. १९५९ ही दोन नाटके, 'नाटक झाले जन्माचे' इ. स. १९६५ ही एक कादबरी, 'पंडित नेहरू : सांस्कृतिक दर्शन' इ. स. १९६७ हे पंडितजींच्या वाङमयाचे समालोचनपर, 'बायकाची जात' इ. स. १९५० हा एकांकिका संग्रह, 'विसावा' इ. स. १९६३ हा लघुकथा संग्रह आणि 'मायफळाचे झाड' ही किशोरासाठी कादंबरी, अशी ही सप्तग्रंथात्मक रचना श्री. भावे ह्याच्या साहित्यिक खात्यावर आहे. 'वास्तविक सुरुवातीच्या काळात (इ. स. १९३०-३१) कविता लेखन मी करीत असे. पण त्या पसतीस न उतरल्यामुळे जवळजवळ तिनशे कविता मी फाडून फेकून दिल्या.' इती भावे.

'इ. स. १९४३ साली मराठी रगभूमीच्या शताब्दी महोत्सवासाठी नाट्यलेखनस्पर्धा आयोजित केली होती.' श्री. भावे सागते झाले. 'त्यावेळेस लावलेले रु. ५००।– चे बक्षिस तीन नाटकांना विभागून दिले. माझे 'समरागण' हे त्यातले एक नाटक आहे. माझे 'पठ्ठे बापूराव' हे नाटक श्री. मो. ग. रागणेकराच्या 'नाट्यनिकेतन' ने बसविले. त्याचे शंभराचेवर प्रयोग झाले. त्या वेळेस त्या नाटकाची (आणि म्हणून माझी, नाटककार म्हणून) खूप प्रशसा झाली. माझ्या 'पंडित नेहरू 'वरील ग्रथाला 'सोव्हिएत देश 'चे नेहरू पारितोषिक मिळाले ते पारितोषिक होते रु ८००।–, एक सुवर्णपदक आणि रशियाचा चवदा दिवसांचा प्रवास असे लेखकाला समाधान देणारे होते. पं. नेहरूच्या जन्मदिनी म्हणजे १४–११–१९६७ रोजी त्या वेळच्या पतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी ह्याच्या हस्ते सुवर्णपदक व मानपत्र देण्यात आले ह्या प्रवासाचे सचित्र वर्णन करणारे बारा लेख अमृत मासिकातून मी लिहिले त्या लेखाचे पुस्तक काढण्यात किंवा आकाशवाणीसाठी लिहिलेल्या जवळ जवळ पंचाहत्तर श्रुतिकाना ग्रंथरूप देण्यास कोणीच पुढे आले नाही.' ही खत श्री. भावे ह्यानी बोलून दाखविली.

'माझ्या नोकरीतील अस्थिरतेमुळे, न पटल्यामुळे अर्थात माझे आर्थिक नुकसान झाले त्याहीपेक्षा माझे लेखन कमी झाले. त्यात भर पडली माझ्या वाचनाची. माझ्या वाचन व्यसनामुळे माझ्यातला लेखक बाजूला पडला.' 'तुम्ही कोणत्या प्रकारचे वाचन केलेत. नव्या लेखकाशी तुमचे गोत्र कितपत जुळले?' ह्या माझ्या प्रश्नाला उत्तर देताना श्री. भावे म्हणाले, 'मी इग्रजी मराठी भाषेतले अनेक जुने–नवे लेखक वाचले. एका विशिष्ट वाङ्मय प्रकाराचे नव्हे तर साऱ्याच प्रकारचे वाचले. खाडेकराचा माझ्यावर खूप परिणाम झाला. कथाकार अरविंद गोखले माझे आवडते लेखक आहेत. नव्यातले गाडगीळ, मर्ढेकर, खानोलकर, दळवी इ. लेखकही मी मनापासून वाचले. ह्या नव्या लेखकांबद्दल माझे म्हणणे असे आहे की ह्यांच्या साहित्यात विकृतीचे दर्शन अधिक घडते. आज मी हाताला येईल ते सारे वाचतो. डोळे फारसे साथ देत नाहीत तरीही वाचतो. पूर्वी मी पोटाला चिमटा घेऊन पुस्तके विकत घेत असे. आज मात्र ना फंड ना निवृत्तिवेतन मिळणारा मी वाचनालयावर अवलबून आहे.' 'दूरदर्शन बघता का? कोणते कार्यक्रम आवडतात' असे विचारल्यावर ते उत्तरले 'मी हून T. V. सुरू करीत नाही. सुरु केला तर समोर दिसेल तो कार्यक्रम पाहतो. खास आवडनिवड ठेवण्याचे माझे दिवस सपले आहेत घरातील मुलांची (मुलगा, सून, नातवडे इ.) आवड तीच माझी आवड झाली आहे.'

'तुम्ही पूर्वी गावातील कार्यक्रमांत भाग घेत होतात. आता काय?' असा माझा प्रश्न ऐकून ते म्हणाले, 'डोंबिवलीच्या लोकसेवा मंडळाचा मी अध्यक्ष होतो. इ स. १९६३ मध्ये भरलेल्या ठाणे जिल्हा उपनगर साहित्य संमेलनाचा स्वागताध्यक्ष होतो. इ. स. १९६१ मध्ये प्रा. ना सी. फडके व महाराष्ट्र कवी यशवंत ह्याचा सत्कार माझ्याच अध्यक्षतेखाली झाला. आता अनेक व्याधींमुळे, दुखऱ्या पायामुळे बाहेर जाणे जमत नाही. मी समाधानी आहे. मी कोणाबद्दल वाईट चिंतिले नाही, वाईट बोललो नाही. मिळालेल्या आयुष्याबद्दल तृप्त आहे.'

अत्यंत झपाट्याने बदलत जाणाऱ्या डोंबिवलीत कालचे आज मागे पडते आहे. जे नजरेसमोर असतात त्यांचीच आठवण ठेवतो. इग्रजीत 'आऊट ऑफ साईट, आऊट ऑफ माईंड' असे म्हणतात त्याची आठवण येते ह्या शहरात अनेक साहित्यिक चळवळी करणाऱ्या संस्था आहेत त्याना सुचवूनही त्यांनी ह्या साहित्यातील पुराण पुरुषाची दखल घेतली नाही. अर्थात त्याबद्दल त्याना त्याची खंत वाटत नाही हे जरी खरे असले तरी सारेच जुने विसरून कसे चालेल? शरीराने वृद्ध असले तरी मनाने टवटवीत हिरवे असणारे हे दोन वृद्ध साहित्यिक कै. वि. द. घाट्याच्या शब्दात सांगावयाचे झाले तर 'पांढऱ्या केसाचे आणि हिरव्या मनाचे' आहेत. कालचे आपले सास्कृतिक जीवन त्यांच्यासारख्यामुळेच संपन्न झाले. ते आज आपल्यात आहेत ही जाणीवच किती सुखाची आहे, दिलासा देणारी आहे ह्या दोघानाही शभर वर्षांचे आयुष्य लाभो ही इच्छा.

चंद्रशेखर राजे

## राजहंस पुस्तक हंडी

# स्पर्धा.... मुलाखती.... फिल्म्स्....

'राजहंस प्रकाशन'ने मागील वर्षाप्रमाणे यंदाही आपला आगळावेगळा 'राजहंस पुस्तक हंडी' हा उपक्रम साजरा केला. दि. २ मे ते ८ मे या काळात भावे प्राथमिक शाळेच्या वास्तुत झालेल्या या कार्यक्रमाची सुरुवात श्री. दिलीप प्रभावळकर यांनी दीप प्रज्वलीत करून केली. श्री. सुधीर गाडगीळ यांनी 'चिमण'ची भेट चांगलीच रंगवली. प्रभावळकरांचा घरोघरी पोचलेला 'चिमण.' त्यांचा चिमण पर्यंतचा आणि नंतरचा अभिनय प्रवास त्यांनी सांगितला. चिमणचं वैशिष्टय म्हणजे त्याचा तो खास उच्च, तार स्वर. याचं कारण सांगताना प्रभावळकर म्हणाले, चिमणच्या अवतीभवतीची सगळीच माणसे, अगदी काऊ, मैनासुद्धा त्याच्यापेक्षा जास्त हुषार आहेत. त्यामुळे आपलं अज्ञान लपविण्यासाठी आणि इतरांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्यासाठी चिमण या स्वरात बोलतो. चिमण भोळा भाबडा, म्हणजे इतका की बावळट वाटावा असा. प्रभावळकर म्हणाले, 'मी खरा तसा चतुर असल्यानेच असा बावळट चिमट बऱ्यापैकी रंगवू शकलो.'

आठ दिवस चाललेल्या या बाल उत्सवाचा समारोप, बालरंगभूमीशी अनेक वर्षे संबंधित असलेले प्रसिद्ध नाटककार, कथाकार रत्नाकर मतकरी यांनी केला. 'वयात येताना' या सध्या चर्चेत असलेल्या पुस्तकाच्या लेखिका सौ. मंगला गोडबोले यांनी मतकरींची मुलाखत घेतली. गेल्या काही दशकातील बालरंगभूमीची स्थित्यंतरे, तिने केलेले वेगवेगळे प्रयोग, त्याला मिळत गेलेला प्रतिसाद यांचा आढावा त्यांनी घेतला. बाल प्रेक्षक हाही कसा बदलत गेला हे त्यांनी सोदाहरण स्पष्ट करून सांगितले. मतकरी हे कथाकार, नाटककार म्हणून आपल्याला परिचित आहेतच. परंतु ते तितकेच चांगले चित्रकारही आहेत. चित्रकलेला असणाऱ्या आकार, रंग, जागा इ... बंधनांमुळे स्वतःला express करताना मर्यादा पडतात, म्हणून त्यांनी दुसरा पर्याय निवडला इतकेच. ही चांगलीच रंगलेली मुलाखत वेळेअभावी आवरती घ्यावी लागली.

'पुस्तक हंडी' च्या उपक्रमात इतर कार्यक्रम होते. वॉल्ट डिस्ने यांच्या दुर्मिळ आणि अतिशय सुंदर कार्टून फिल्मस्. यामध्ये कार्टुन फिल्म कशी बनविली जाते? तिचं तंत्र कसं विकसित झालं? त्याचे टप्पे काय होते? हे स्वतः डिस्ने एका फिल्ममध्ये समजावून सांगत होते. त्यांच्या जगप्रसिद्ध डोनाल्ड डक, मिकी माऊस यांच्या जन्माची कथा ते त्यात सांगतात. तसेच जोडीला पुण्यातील फिल्म इन्स्टिट्यूट मध्ये स्वतः कार्टुन फिल्म बनविणारे श्री. तावरे यांनी काही चित्रांद्वारे हेच तंत्र जास्त सोप्या शब्दात समजावून दिले. या कार्यक्रमाला बाल प्रेक्षकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

तसाच दुसरा जरा वेगळा कार्यक्रम होता 'चेहरे असे रंगतात' हा रंगभूषेच्या प्रात्यक्षिकांचा. रंगभूषा हे फारच विकसित आणि प्रभावी साधन आहे. अगदी पाच–सात वर्षाचा कोवळा पोरगासुद्धा रंगभूषेमुळे ऐंशी नव्वद वर्षाचा जख्ख म्हातारा दिसू शकतो. श्री. विक्रम गायकवाड यांनी स्टेजवर मुलांना बोलवून त्यांच्यामधूनच माकड, परी, राक्षस म्हातारा, ब्राह्मण इ. पात्रे उभी केली. लहान मुलांना हा कार्यक्रम खूपच रंजक वाटला.

इन्स्पेक्टर अवस्थी यांची मुलाखतही खूपच माहितीपूर्ण झाली. पोलीस आणि त्यांची यंत्रणा याविषयी आपण सगळेच किती अनभिज्ञ आहोत, तसेच आपले हक्क आणि कर्तव्य याचीही आपल्याला फार जाणीव नाही हेच यातून दिसून आलं. 'खून' हा शब्द फक्त फाशीचा दोरच आपल्यापुढे उभा करतो. पण कोणत्या परिस्थितीत 'खून हा खून नसतो', स्वरक्षणार्थ केलेली हत्या–त्याचे अपवाद काय, ही अत्यावश्यक माहितीही त्यांनी आपल्या विनोदी पद्धतीने सांगितली. तसेच बालगुन्हेगारी, तिचे प्रकार, स्वरूप याविषयीची त्यांनी दिलेली माहितीही श्रोत्यांना धक्का देऊन गेली. शेवटी तर श्रोत्यांमधूनही आपल्या रोजच्या जीवनातील अनेक अडचणी, अर्थातच पोलिसांशी संबंधित अशा, त्यांना असणारे पर्याय, उत्तरे काय, ते सोडविण्याची पद्धत कशी, ही विचारणा झाली. ही प्रश्नोत्तरे ही पोलीस आणि नागरिक यांच्यात



रंगभूषेमुळे कोवळी मुलेही म्हातारी दिसू लागतात

विनाकारण, गैरसमजामुळे किती दरी आहे हे सागून गेली

'राजहस'च्या या उपक्रमात लहान मुलासाठी म्हणून एक तीन चाकी सायकल स्पर्धा घेण्यात आली. दि ४ मे रोजी घेण्यात आलेल्या या स्पर्धांना मिळालेला प्रतिसाद लक्षात घेता अशा प्रकारच्या स्पर्धा, कार्यक्रमही किती आवश्यक आहेत हेच दाखवत होती

याच उपक्रमात यदा 'राजहस'ने रोज सकाळी मुलासाठी काही छदवर्ग, पाठातर वर्ग आयोजित केले होते. तसेच 'गणितातील गमतीजमती' हा एक नाविन्यपूर्ण वर्गही घेण्यात आला. यामध्ये गणिती माध्यमातून मुलाना काही वस्तू करायला शिकविल्या गेल्या.

या सर्वांसोबत सर्व थरातील वाचकाना आकर्षित करेल असा पुस्तकांचा प्रचंड खजिना होताच.

पुस्तक प्रदर्शन आणि जोडीला इतर सास्कृतिक कार्यक्रम असा हा आठवडाभर चाललेला बाल उत्सव. उपक्रमाला मिळालेला पाठिंबा या 'राजहस' ला निश्चितच उत्साहवर्धक आहे.

—वंदना भाले

## सांस्कृतिक नागपूर

### □ महाप्रयाण !

एक स्वातत्र्यसेनानी, कुष्ठरोग्याची सपूर्ण जीवनभर निस्वार्थ सेवा करणारे, अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक मडळाचे एक सस्थापक श्री. दाजीसाहेब पटवर्धन याचे दिनाक ७ मे रोजी निधन झाले. एका वादळी जीवनाची समाप्ती झाली. आपले वय झाले आणि आपल्या जीवनाला कृतार्थता लाभली म्हणून दाजीसाहेबानी स्वतःच्या जीवनाचा आपल्या मनाप्रमाणे शेवट घडवून आणला. ह्यादृष्टीने स्वातत्र्य वीर सावरकर, विनोबाजी भावे यानी स्वेच्छेने जसा जीवनाचा शेवट केला तशाच पद्धतीने म्हणजे प्रायोपवेशनाने दाजीसाहेबानी ह्या जीवनातून अखेरचे महाप्रयाण केले. नागपूरात ते चार वर्षापूर्वी एका समारभाच्या निमित्ताने आले होते. त्यावेळी त्याना जवळून पाहण्याची मला सधी लाभली होती कोणत्याही समारभात दाजीसाहेबाचे व्यक्तिमत्त्व उठून दिसत असे. डोक्यावर फेटा असणारी त्याची गौरवर्णी मूर्ती कौतुकाचा विषय होत असे. त्याच्या निधनानतर त्याच्याविषयी ज्या अनेक गोष्टी स्थानिक वृत्तपत्रात येत आहेत त्या वाचून कोणालाही त्याच्याबद्दल आदर वाटावा. स्वातंत्र्याकरिता त्यानी केलेला त्याग, महारोग्याविषयी त्याची कळकळ, त्याच्याकरिता जीवनभर केलेले कार्य ह्या त्याच्या कार्याबद्दल तर जितके लिहावे तितके थोडेच आहे परतु त्याच्या व्यक्तिमत्त्वातले इतरही तपशील अतिशय मनोरजक आहेत. एका साखर सम्राटाने त्याच्या कार्यावर प्रभावित होऊन पाच लाख रुपये देणगी देण्याची इच्छा व्यक्त केली अट एकच टाकली— स्वत. दाजीसाहेबानी साखर कारखान्याच्या परिसरात येऊन देणगी स्वीकारावी. दाजीसाहेबानी सागितले, 'तुम्हाला तपोवनातले कार्य पसत आहे ना? मग तपोवनात या आणि तिथेच देणगी द्या. मी महत्त्वाचा नाही, माझे कार्य महत्त्वाचे आहे' पाच लाखाची देणगी मिळाली नाही. परतु दाजीसाहेबानी त्याची पर्वा केली नाही. दाजीसाहेबाची वृत्तीच स्वाभिमानाची होती. स्वातत्र्य चळवळीत कारावास भोगत असताना त्याची मुलगी गभीर आजारी पडली. जगते की मरते अशी स्थिती होती. सरकारने सागितले माफीपत्रावर सही द्या म्हणजे तुम्हाला ताबडतोब सोडतो. दाजीसाहेबानी उत्तर दिले, 'देश मोठा आहे. मुलगी महत्त्वाची नाही. मी माफीपत्र लिहून देणार नाही.' स्वातत्र्य मिळाल्यानतर दाजीसाहेबानी कुष्ठसेवेला वाहून घेतले. परंतु तिथेही त्यानी स्वाभिमान सोडला नाही सरकार जेव्हढे अनुदान प्रत्येक कुष्ठरोग्यामागे देईल तेवढयाचाच हिशेब मी देईन अनुदानाचा हिशेब देताना मी लबाडी करणार नाही. दुर्दैवाने ह्या सर्व प्रकरणात सरकारने मोठी ताठर भूमिका घेतली. त्यामुळे वाद पेटतच गेला दाजीसाहेबानी तपोवन शासनाच्या स्वाधीन केले आणि ते आपल्या मित्राच्या मुलाकडे चादूर रेल्वेला निघून गेले. ह्या वादात सरकारने इतकी अनुदार आणि ताठर भूमिका घेण्याची आवश्यकता नव्हती, असे अजूनही नागपूर—विदर्भातल्या समजस लोकाना वाटते. त्यावेळेच्या मुख्यमत्र्याना म्हणजे वसतरावदादाना ते पटले नाही. हे दुर्दैव समजले पाहिजे. दाजीसाहेबाची सरकारी अधिकाऱ्याना भीती वाटत असे. सचिवालयातले अनेक भ्रष्ट अधिकारी दाजीसाहेब लिफ्टसमोर रागेत उभे दिसले की दुसऱ्या सेक्शनमध्ये निघून जात असत. दाजीसाहेबाच्या अशा अनेक गोष्टी सागता येतील. कुष्ठाची स्वार्थरहित सेवा करणाऱ्या या विदर्भाच्या सुपुत्राला आमची आदराजली!

### □ नागपूरचा उन्हाळा !

ह्या भागात आता उन्हाळा मोठा रगात आलेला आहे. सकाळी सात वाजताच उन्हाचे चटके बसू लागतात वाळयाच्या ताटया, कूलर्स, पखे रात्रदिवस घराघरातून चालू आहेत. लोक शक्यतोवर अगदी सकाळी आणि रात्री आपआपली कामे उरकून घेतात आणि उरलेला वेळ थड अशा कूलरच्या खोलीत घालवितात. त्यातच नागपूर—विदर्भाकडे ह्या वर्षी पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे त्यात कूलर्सला पाणी कोठून मिळणार ? तरीसुद्धा लोक वाळयाच्या ताटयावर टाकण्याकरिता कुठून तरी पाणी आणतातच. कूलर्सशिवाय नागपुरात रहाणे अशक्य झाले आहे. त्यातच मे महिना म्हणजे लग्नसराईचा महिना. एवढयाही उन्हात जेवण्याच्या पक्ती चालूच आहेत. अगातून घामाच्या धारा गळताहेत. परतु लोकाचा जेवण्याचा उत्साह मात्र कमी झालेला नाही! नागपुरातील पाण्याचा तुटवडा आणि मे महिन्यातील उष्णतामान लक्षात घेऊन विवाहाकरिता मे महिना निवडला नाही तर चालणार नाही का ? परतु तसा विचारसुद्धा कोणाच्या डोक्यात आलेला दिसत नाही. कोणत्या व्याख्यानाला नागपुरात उन्हाळयात जाण्याची सोय नाही. कारण रात्री ८ च्या पूर्वी नागपूर थड होत नाही. 'हाय' 'हाय' करीत कोणाचेही भाषण ऐकावे लागते. येथल्या धनवटे रगमदिरात उन्हाळयात सध्याकाळी कार्यक्रमाला जाणे एक फार मोठे दिव्य असते. थिएटर एअरकडिशन्ड नसल्याने माणूस थिएटरमध्ये बटाटयासारखा उकडून निघतो. साहित्य सघवाले म्हैसाळकर आणि शेवाळकर दर वर्षी सघाच्या वार्षिक सभेत धनवटे रंग-

मंदिर एअर-कंडिशन्ड करणार आहोत अशी वचने देतात. परंतु ती वचने कागदावरच रहातात ह्यावाबतीत कोणत्या अडचणी आहेत हेही कळत नाही अशा ह्या उन्हाळ्यात सुप्रसिद्ध सिनेमा नटी शबाना आझमी आपल्या 'खामोश' ह्या चित्रपटाच्या उद्घाटनाकरिता नागपूरला येऊन गेली व ती दिवसातल्या तीनही खेळांना हजर होती. तिला, तो केवळ उन्हातान्हात नागपुरात वचन दिल्याप्रमाणे आली म्हणून बक्षीस दिले पाहिजे असे आम्हाला वाटून गेले. तरी आता नागपूरला पूर्वीसारखा उन्हाळा नाही. पूर्वी उष्णतामान ११९° फॅरनहीटपर्यंत जात असे झाडाझाडावर आणि रस्त्यारस्त्यावर पक्षी मरून पडल्याची दृश्ये मी स्वतःच पाहिलेली आहेत. आता उष्णतामान १११° फॅरनहीटपर्यंत जाते. पूर्वीच्या मानाने उन्हाळा विशेष राहिलेला नाही असे जुने लोक सांगतात !

### □ एम्प्रेस मिल

नागपूरची एम्प्रेस मिलही नागपूरच्या सांस्कृतिक जीवनाचे एक अविभाज्य अंग आहे. नागपूरला तुम्ही कोणत्याही दिशेने या—एम्प्रेसचे भोंगे तुम्हाला दुरून दिसतील. एम्प्रेसचा सकाळचा भोंगा ऐकल्याशिवाय नागपूरच्या माणसाला नवीन दिवसाला प्रारंभ झालेला आहे असे वाटतच नाही ! स्वातंत्र्याच्या चळवळीत एम्प्रेसचे कामगार नेहमीच आघाडीवर असत ह्या मिलचा टाटा घराण्यालाही मोठा अभिमान वाटत असे. ह्या मिलने कित्येकांना रोजगार दिले, कित्येकांना कामगार पुढारी बनविले, कित्येकांना मंत्री बनविले, कित्येकांना सत्तेच्या खुर्चीवरून खाली उतरविले. कामगारांचे पुढारीपण कोणाकडे असावे यावाबतीत प्रारंभीपासूनच निरनिराळ्या युनियनमध्ये स्पर्धा होती आणि आजही ती तशीच आहे. रामभाऊ रुईकरसारखा तगडा कामगार पुढारी ह्याच मिलने घडविला. रुईकरांचे काय व्यक्तिमत्त्व होते ! काय आवाज होता ! त्यांना लाऊडस्पीकर कधी लागलाच नाही ! कामगारांना उद्देशून त्यांनी पहिलेच वाक्य म्हटले की सारी सभा थरारून जात असे ! वसंतराव साठ्यांच्या सभाही एम्प्रेस मिलच्या गेटसमोरच होत असत ! पुढारीपणाचे शिक्षण त्यांनी तेथेच घेतले ! त्यांचे तेथील भाषण ऐकणे म्हणजे एक फार मोठी मज्जा असे ! प्रसिद्ध कम्युनिस्ट कामगार पुढारी बर्धन यांची एम्प्रेस मिलसमोरची भाषणे म्हणजे एक बौद्धिक मेजवानीच असे. कॉम्रेड डांगे सोडले तर कम्युनिझम इतक्या सोप्या शब्दात कोणी समजाऊन सांगितला असे मला वाटत नाही. त्या काळात ही भाषणे ऐकली म्हणजे क्रांती जवळ आली असे आम्हाला वाटत असे. आता तीच एम्प्रेस मिल शेवटचे आचके देत आहे. मिलमध्ये टाळेबंदी जाहीर झालेली आहे. हजारो कामगारांच्या रोजी रोटीचा प्रश्न निर्माण झालेला आहे. नागपूरकरांना मोठे उदास वाटत आहे सरकारला आणि टाटाला यातून काही मार्ग काढता आला तरच एम्प्रेस मिल वाचणार आहे.

—शरश्चंद्र

रंगभूमी

## आविष्कार—चंद्रशालाचे नवे नृत्यनाट्य

# वृक्षवल्ली आम्हा . . .

मुंबईची आविष्कार ही नाट्यसंस्था सतत काहींना काही वेगळे नाट्यानुभव देण्याचा यत्न करीत असते. गेल्या काही वर्षांत लहान मुलांसाठी त्यांच्याचकडून नृत्यनाट्य बसवून घेण्याचा एक उपक्रम त्यांनी जाणतेपणाने केलेला आहे. विशेषतः 'दुर्गा झाली गौरी', 'आपला हात जगन्नाथ' इत्यादी. या दोन्हीमध्ये रंजकता होती तशीच हेतुपूर्वकताही होती !

तशाच पद्धतीने चंद्रशाला—आविष्कारने अलिकडच्या काळात 'वृक्षवल्ली आम्हा' हे नृत्यनाट्य पेश केले आहे यामध्ये केवळ रंजकतेला स्थान नाही. तर त्यामागे एक निश्चित असा विचार आहे की जो बाल आणि वृद्ध सर्वांपर्यंत पोहोचला पाहिजे. माधव साखरदांडे हे या नृत्य—नाट्याचे लेखक आहेत. त्यांनी गतकाळातील काही घटना समोर ठेवून हे लेखन केलेले आहे. त्यातल्या दोन—तीन घटना पुरेशा बोलक्या आहेत. एक म्हणजे १४५१ साली मारवाडात जन्मलेल्या एका संताने तिथल्या वाळवंटात हिरवळ निर्माण करण्याचे वेड घेतले आणि प्रत्यक्षात ते करून दाखवले. त्याचे नाव होते जबाजी ! त्याने आपल्या लोकांना एकूण २९ आज्ञा दिल्या म्हणून त्या पंथाला 'बिश्नोई' असे म्हटले जाते. त्या आज्ञांमध्ये दोन आज्ञा प्रमुख होत्या, त्या म्हणजे 'हिरवे झाड तोडणार नाही' आणि 'प्राणिहत्या करणार नाही !' लोकांनी त्या आज्ञांचे पालन करून सर्वत्र हिरवळ निर्माण केली. खेजडी या नावाच्या बारमाही हिरव्यागार वृक्षाची लागवड करणारे गाव 'खेजडली' या नावाने ओळखले गेले त्यानंतर तिथे राज्यकर्ते आणि स्वार्थी लोकांनी मारवाड उजाड करून टाकले पण या खेजडली गावात मात्र हिरवी झाडे प्राणपणाने जपली गेली.

दुसरी घटना म्हणजे जोधपूरच्या राजाची. त्याने १७३० साली राजवाडा बांधायचे ठरवले. त्यासाठी दगड भरपूर होते. पण ते सांधायला लागणाऱ्या चुन्यासाठी, भट्टीसाठी लाकडे नव्हती. राजाचा सेनापती हुशार होता. त्याने खेजडली गावात आपले लाकूडतोडे नेले. तिथल्या लोकांनी त्यांना विनंती केली, पण ती व्यर्थ गेली. शेवटी त्यातली अमृता नामक स्त्री पुढे आली आणि म्हणाली 'झाड तुटेल पण आम्ही तुटल्यावरच, आधी नाही !' तिथल्या लोकांनी झाडांना मिठ्या मारून त्यांचे सरक्षण करण्याचा यत्न केला. पण त्यात त्यांची आहुती पडली

१९७० साली हिमालयातल्या वृक्षतोडीची माहिती सर्वांनाच आहे अगदी अलिकडे म्हणजे १९७४ साली हिमालयातल्या रेणी गावातील जंगलावर असेच संकट आले.

अशा अनेक छोटचा-मोठचा प्रत्यक्ष घटनांचा आधार घेऊन हे नृत्यनाटच उभे राहिले आहे यातल्या कथा एवढचाचसाठी विस्ताराने सांगितल्या की, प्रत्यक्ष ज्यांनी हे नृत्यनाटच पाहिले असेल त्यांनाही या कथांचा वापर केला आहे असे सहजपणाने घ्यानी आले नसेल. (वास्तविक प्रयोगापूर्वी त्या संदर्भातली माहितीपत्रके सर्वांना वाटलेली होती. पण सर्वांकडून ती वाचली जातातच असे नाही) आणि ज्यांनी प्रयोग पाहिला नसेल त्यांना या प्रयोगायागील कथासूत्राचा अंदाज यावा !

हा विषय डोळ्यासमोर आल्यावर प्रथमदर्शनी यावर नृत्यनाटच होऊ शकेल असे कोणालाही वाटणार नाही. कारण असे विषय केवळ व्याख्यानांचे किंवा सरकारी स्तरावर प्रचार करण्याचे म्हणून वाटतात. हा विषय कला माध्यमातून व्यक्त करणे ही आव्हानात्मक गोष्ट आहे. लेखन आणि सादरीकरण अशा दोन्हीही अर्थाने अवघड आहे पण ते आव्हान दोन्ही स्तरांवर पेलले गेले ही महत्त्वाची गोष्ट आहे. आव्हान अशा दृष्टीने की, यातले मूळ कथासूत्र किंवा सूत्रतत्त्वे ठसठशीतपणे, ठामपणे व्यक्त तर झालीच पाहिजेत; पण ती रूक्षपणे, कंटाळवाणेपणे व्यक्त न होता त्याला एक कलात्मक दर्जा लाभला पाहिजे. एका अर्थाने ही कसरतच असते. त्यात एरवीसारखी सलग गोष्ट नाही. त्यामुळे मुलांना आणि एकूण मोठचा प्रेक्षकांनादेखील दोन-अडीच तास गुंतवून ठेवणे अवघड असते.

डॉ. कनक रेळे या नृत्यनाटचाच्या दिग्दर्शिका आहेत. त्यांचे नृत्यक्षेत्रातील कार्य आणि एक प्रथमश्रेणीच्या नर्तिका म्हणून असलेले स्थान सर्वपरिचित आहे. त्यांनी या नृत्यनाटचाचा आकृतीबंध किंवा त्याचे प्रयोगचित्र ( कोरिओग्राफी ) वेधक आणि परिणामकारी ठेवलेली होती. सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्यातली दृश्यात्मकता आणि लयबद्ध हालचाली, विरचना यामुळे प्रयोगाचा होणारा परिणाम सतत वाढता राहिला. नृत्यनाटचामध्ये नृत्य, संगीत आणि नाटच असे तीन प्रधान घटक असतात. प्रयोगतंत्रासाठी काही नेपथ्याचा भाग, प्रकाशयोजना यांचाही हातभार असतोच. विशिष्ट परिणाम साधण्यासाठी काही उपांगांवर भरही दिला जातो. परिणामी काही घटकांचा तोल बिघडण्याची शक्यता असते. तसे या प्रयोगात एका घटकाच्या संदर्भात घडले. ते असे की, नृत्य-नाटच अर्थातच मोठचा प्रमाणात होते; पण यातले शब्दसंवाद पुरेशा प्रमाणात व्यक्त झाले नाहीत. त्यांचा वापर तितका झाला नाही. याचे एक कारण संभवते, ते असे, डॉ. कनक रेळे प्राधान्याने नृत्यविशारद असल्याने त्यांनी एकूणच प्रयोगसंकल्पना नृत्याच्या माध्यमातून व्यक्त करण्याचे ठरविले असणे शक्य आहे. त्यात गैरही काही नाही. प्रश्न असा निर्माण होतो की, प्रयोगातले नाटच ताकदीने व्यक्त होण्यासाठी नृत्यातून उभ्या राहणाऱ्या प्रतिमा धूसर, अनाकलनीय राहण्याची शक्यता असते. तशा त्या या प्रयोगात धूसर, अस्पष्ट राहिल्या. त्यासाठी संवादांचा भराव आवश्यक होता. तरीही या नृत्यनाटच प्रयोगाचे मोल कमी होत नाही. पन्नास-साठ बालकलाकारांनी अपूर्व परिश्रमाने उभे केलेले हे नृत्यनाटच मनोरंजनासाठी तर पाहावेच, पण काही जीवनसंदेश, सामाजिक जाणीव याही अर्थाने पाहावे. चंद्रशाला आणि आविष्कार यांच्या सहयोगाने घडलेल्या या प्रयोगात प्रदीप मुळ्ये यांचे नेपथ्य, चंदर होनावरांची प्रकाशयोजना, नारायण मणी यांचे संगीत होते. नेहमीप्रमाणेच सूत्रधार होते अरविंद देशपांडे आणि अरुण काकडे.

हे नृत्यनाटच पाहात असताना असे वाटून गेले की, मुलांपर्यंत एखादा चांगला विषय किंवा संस्कार पोहोचवायचा असेल तर हे माध्यम किती प्रभावी आहे. आविष्काराने तीन नृत्यनाटचे करून हे सिद्ध करून दाखवले आहे. तर मग दिवाळी आणि उन्हाळी सुट्टीत त्याच त्याच विषयांवर नावे आणि संवाद बदलून बालनाटकांच्या नावाखाली येणारी नाटके असा प्रयत्न का करीत नाहीत ? सर्वांना आर्थिकदृष्टचा इतका मोठा व्याप शक्य नसेल, पण आपल्या आवाक्यात जेवढे आहे निदान तेवढे तरी करावे. एखादा-दुसरा अपवाद वगळता तसे करताना फारसे कोणी दिसत नाही. म्हणूनच आविष्कारचे हे मुलांचे नृत्यनाटच नेहमी लक्षवेधी राहते !

□

एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला ?

त्या लढ्याचे चित्रण -
मराठीत प्रथमच.

**लेक वालेसा**
डॉ. श्रीकांत मुंदरगी
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

**काही दिवस श्यामचे काही राधाचे**
फिरोझ रानडे
पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

## अमेरिकेतून

पान ३ वरून

मुलगा पूर्ण स्वावलंबी असण्यात अभिमान मानतो. याउलट तरुण मुलगी स्वत:ला वेगवेगळ्या प्रकारच्या सबंधातला एक दुवा समजते आणि अशा सबंधाची साखळी जर तुटण्याची वेळ आली तर तिला ते धोकादायक वाटते. स्त्रीपुरुषाच्या फरकाचे विवेचन करताना डॉ. गिलिगन म्हणतात की मुलगा जसजसा वाढतो तसतसे त्याने मुलीसारखे (म्हणजे साखळीतल्या दुव्याप्रमाणे ) इतराशी संबंध साधण्याचे प्रयत्न करायला हवेत. आणि मुलीने वाढत्या वयाबरोबर मुलाप्रमाणे स्वावलंबी व्हायला हवे. या दृष्टीने विचार करता तरुण मुलेमुली एकमेकाच्या जास्त सहवासात आली की एकमेकापासून या गोष्टी शिकू शकतात. मुला–मुलीची अशी वाढ जरी आदर्श असली तरी प्रत्यक्षात तसे होतेच असे नाही आणि त्यामुळे पुरुष दुसऱ्यांशी जवळीक साधणे आणि स्त्रिया सपूर्ण स्वावलबी होणे सहजगत्या करू शकतातच असे नाही. पण पती जितक्या सहजगत्या भावनिक जवळीक साधू शकतात तितके त्याचे वैवाहिक आयुष्य सुखाचे होऊ शकते.

दुसरी एक गोष्ट या १३० दापत्याच्या अभ्यासातून उघड झाली आणि ती म्हणजे विवाहानंतर स्त्रियाना आपल्या आईवडिलाबद्दल जास्तच जवळीक वाटू लागते– पण पण पुरुष मात्र आपल्या मातापित्यापासून मानसिकदृष्टया जास्त दूर जाऊ लागण्याची शक्यता असते– कारण पुरुषाच्या अतर्मनात असे असते की विवाहानतर माझी पत्नी आहे तेव्हा आता माझ्या आईवडिलाची इतकी आवश्यकता नाही. स्त्रिया विवाहानतर विशेषत: आपल्या आईशी विवाहापूर्वीच्या आपल्या बंडखोर वागणुकीसबधी रदबदली करतात आणि जास्त जवळीक निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. याचे आणखी एक कारण असे असावे की विवाहानंतर पुरुष आपला व्यवसाय आणि मित्रमडळ यात जास्त प्रमाणात वेळ घालवू लागतो. त्यामुळे स्त्रियांना त्यागित ( abandoned ) झाल्यासारखे वाटते आणि त्यामुळे त्या आईवडिलांच्या जास्त जवळ येतात. शिवाय स्त्रिया सासूसासऱ्याशी पण जवळीक साधण्याचा प्रयत्न करतात. मातापित्यांकडे पहाण्याच्या अशा परस्पर विरोधी दृष्टिकोनातून पतीपत्नीनी सुवर्णमध्य साधण्याचा प्रयत्न करायला हवा.

काही मानसशास्त्रज्ञाच्या सशोधनानुसार असे आढळून आले आहे की, पती–पत्नीने दिलेले लैंगिक सुख आणि दोघांच्या समान आवडी याना वैवाहिक आयुष्यात सर्वात जास्त महत्त्व देतो पत्नी मात्र वैवाहिक निष्ठा ( fidelity ) आणि आप्तइष्टाच्या संबधांना जास्त महत्त्व देते. वैवाहिक निष्ठेच्या बाबतीत पतीची मते दुटप्पीपणाची असतात–म्हणजे पतीच्या मते फक्त पत्नीनेच निष्ठा जपायला हवी ( पत्नीच्या मते ती दोघानीही जपायला हवी.) सर्वसाधारणपणे स्त्रिया आपल्या वैवाहिक समस्यासबधी पुरुषांपेक्षा जास्त तक्रारीचा सूर काढतात. याचे कारण असे की वैवाहिक जीवनात पतीपेक्षा पत्नीवर खूपच जास्त बंधने, अपेक्षा आणि मागण्या असतात. आणि पत्नीला वैवाहिक जीवन सुरू करताना आणि पुढे सुद्धा मानसिक ताण जास्त सहन करावे लागतात. अर्थात पुरुषाना जरी मानसिक ताण जाणवत असले तरी ते दुसऱ्याजवळ तसे सहसा मान्य करीत नाहीत कारण तसे करणे म्हणजे त्याच्या मते अपौरुष (बाईलपणाचे) समजले जाते. यामुळे वैवाहिक जीवनातल्या समस्यांना सामोरे जायला स्त्रिया जास्त राजी असतात. जेव्हा जेव्हा पतीपत्नीमध्ये सघर्ष निर्माण होतात त्यावेळी स्त्रिया त्यासंबंधी बोलून ते सघर्ष सोडवायला बघतात. त्यामुळे पती आपल्या जास्त जवळ येईल आणि त्याचा आपल्यासंबंधीचा आदर वाढेल असे पत्नीला वाटते. या उलट पतीला संघर्षाचे स्फोटात रूपातर होईल अशी भीती वाटते.

आपला जीवनसाथीदार निवडताना पुरुष सौंदर्य आणि स्त्री आर्थिक कमाई याना महत्त्व देते पतीपत्नीच्या अपेक्षा, दृष्टिकोन, वागणूक यातील फरकामुळे वैवाहिक जीवन म्हणजे मानसिक मित्रत्व ( alliance ) बनते. वैवाहिक जीवन समृद्ध करायला पतीपत्नीनी एकमेकांपासून 'शहाणपण' शिकायला हवे. जी विवाहित मडळी पतीपत्नीमधल्या फरकांसंबंधी जागरुक नसतात आणि ते आपल्या जीवनसाथीदाराच्या मतांची कदर किंवा आदर करत नाहीत, त्याचे वैवाहिक जीवन सुखाचे होत नाही. वैवाहिक जीवन म्हणजे एकमेकाची मानसिक वृद्धी करून घेण्याची एक अपूर्व सधी आहे. वैवाहिक जीवन सुखी करण्याकरता नेहमी दोघानीही प्रयत्नशील रहावे लागते–किंबहुना तसे केले नाही तर वैवाहिक जीवन धोक्यात येऊ शकते. पतीपत्नीनी एकमेकाच्या दोषापेक्षा गुणांवर जास्त भर द्यायला हवा आणि वैवाहिक जीवनासबंधी एकप्रकारची खेळीमेळीची वृती धारण करावी. एकमेकाची मते, वागणूक इ. चागली किंवा वाईट असे म्हणण्यापेक्षा ती वेगळी आहेत असे समजावे–आणि आपला जीवनसाथीदार मूलभूत वृत्तीने, पिंडाने जसा आहे तसा स्वीकारावा.

¤

### पक्षांचे रुग्णालय

न्यूयॉर्क टाइम्समधल्या एका लेखानुसार जुन्या दिल्लीत जैनानी चालवलेले आणि जगातील एकमेव असे फक्त पक्षांकरता एक सार्वजनिक रुग्णालय आहे. तिथे दरवर्षी सुमारे १५००० पक्षावर उपचार करण्यात येतात. या रुग्णालयात फक्त शाकाहारी पक्षाना प्रवेश मिळतो. गरुड, घारी वगैरे मासाहारी मडळीवर फक्त बाह्यरुग्ण म्हणून उपचार केले जातात. बरे झाल्यावर त्याच्या मालकाकडे परत न देता रुग्णालयाचे सचालक पक्षांना मुक्त करतात.

वेस्टफिल्ड, मे २, १९८६

– डॉ. विजय वि. आणि
सौ. जयश्री वि. जोशी

# वेगळेपणानं वेधून घेणारी अमृता सिंग

ती आली — पण वाऱ्याच्या थंडगार झुळुकेसारखी नाही, तर एखाद्या तुफानासारखी आली. आली आणि पहाता पहाता तिनं हिंदी चित्रपटसृष्टीत आपलं बस्तान बसवलं. तिच्यात डिंपलचं सौंदर्य नाही, श्रीदेवीचं 'अपील' नाही की रेखाची 'ग्रेस' ही नाही पण तरीही तिला स्वतःचं असं एक वेगळं व्यक्तिमत्व आहे. तिचं नाव आहे — अमृता सिंग.

अमृता सिंग ही मूळची दिल्लीची. आणीबाणीत संजय गांधींचा उजवा हात म्हणून ओळखल्या जाणाऱ्या रुखसाना सुल्तानची ती मुलगी. सिनेमाची आवड वगैरे होती. पण तशी ती बहुतेक शाळा-कॉलेजातल्या मुला-मुलींना असतेच. सिनेमात काम करायची महत्त्वाकांक्षा वगैरे अमृताला नव्हती. अशा वेळेस संधी चालून आली. धर्मेंद्रनं आपल्या मुलासाठी — सनीसाठी — चित्रपट काढायचा ठरवला आणि सनीची पहिली हिरॉईन म्हणून अमृताची निवड झाली. राहुल रवेलच्या दिग्दर्शनाखाली 'बेताब' तयार झाला आणि सुपरहिटही झाला.

कसलाही संघर्ष करावा न लागता अमृता एका रात्रीत स्टार झाली होती. पण तिची पुढची वाटचाल धड व्हायची चिन्हं दिसेनात. सनी—अमृताची जोडी 'बेताब' मध्ये छान शोभली होती. त्यामुळं त्यांना साइन करायला लोक भराभरा पुढे आले. पण दरम्यान अमृताचा धर्मेंद्र आणि सनीशी वाद झाला आणि या जोडीचा तेव्हा अपूर्णावस्थेत असलेला 'सनी' सोडला तर कुठलाच चित्रपट नंतर पडद्यावर आला नाही. सेटवर गेलेल्या 'अर्जुन' मधूनही अमृता बाहेर पडली किंवा तिला बाहेर काढण्यात आलं.

'सनी' कधी आला नि गेला कळलंच नाही. नंतर अमृताची भूमिका असलेल्या 'दुनिया' चंही थंड स्वागत झालं आणि धर्मेंद्रबरोबरचं भांडण अमृताला महागात जाणार अशी चिन्हं दिसायला लागली. एका रात्रीत स्टार झालेल्यांचं जे होतं तेच हिचं होणार की काय असं वाटत असतानाच 'मर्द' च्या रूपात अमृतानं पुन्हा उसळी मारली. वास्तविक 'मर्द' हा चित्रपट डिंपलला घेऊन तयार व्हायचा होता. अमिताभची नायिका म्हणूनही तीच जास्त चांगली शोभली असती. पण 'सागर' आणि 'मर्द' च्या तारखांचा घोटाळा झाला आणि 'मर्द' तिच्या हातून निसटला. अमिताभ नायक आणि मनमोहन देसाईचं दिग्दर्शन या दोन गोष्टींमुळं 'मर्द' ची भूमिका मिळवायला बड्या बड्या नायिका सज्ज होत्या. पण संधी साधली अमृतानं. 'अर्जुन' चा तिचा रोल डिंपलकडे गेला होता त्याची एक प्रकारे तिनं फिट्टंफाट केली.

पण ही भूमिकांची अदलाबदल फायदेशीर ठरली ती अमृतालाच. कारण 'अर्जुन' यशस्वी झाला तरी त्याचं श्रेय गेलं दिग्दर्शक राहुल रवेलकडं आणि फायदा झाला सनीला. डिंपलला त्यात मोठी भूमिकाही नव्हती आणि व्यावसायिकदृष्टया तिला 'अर्जुन' नं काहीच दिलं नाही. याउलट 'मर्द' च्या यशाचा सगळ्यात जास्त फायदा झाला तो अमृताला. अमिताभ निवृत्तीच्या वाटेवरच होता. त्यामुळं 'मर्द' नंतर अमृतानंच आपलं खरं बस्तान बसवलं.

आज 'चमेली की शादी' नंतर अमृता एक आघाडीवरची अभिनेत्री म्हणून ओळखली जाऊ लागलीय. मिथुन, जॅकी श्रॉफ, अनिलकपूर, संजय दत्त अशा सगळ्या प्रमुख नटांबरोबर ती चित्रपट करतेय. तिला पूर्वीही कुणी गॉडफादर नव्हता आणि आताही कुणी नाही. एक मात्र खरं अमृताला योग्य वेळी नेमक्या संधी मिळत गेल्या. त्याचा तिनं फायदा उठवला नसता तरच नवल.



वास्तविक अमृता सिंगसारखी पोरगी इथं यशस्वी कशी झाली हे एक कोडंच आहे. कारण अगदी पूर्वीपासून पाहिलं तरी दिसतं की हिंदी चित्रपट निर्मात्यांना आणि प्रेक्षकांनाही गोड सुंदर चेहऱ्यांचं आकर्षण आहे. अगदी मधुबाला मीनाकुमारीपासून ते आजच्या फराह, मंदाकिनीपर्यंतच्या बहुसंख्य यशस्वी नटचा पाहिल्या तर हे स्पष्ट होतं. (रूप आणि अभिनय दोन्ही नसताना यशस्वी झालेली झीनत अमानही अर्थातच अपवाद.) अमृताचा चेहरा नक्कीच सुंदर नाही. तिचं अस्सल पंजाबिणीसारखं व्यक्तिमत्त्वही आजच्या नाजूक, फुंकर मारली तर उडून जातील असं वाटणाऱ्या नायिकांच्या तुलनेत एकदम विरोधाभास निर्माण करणारं. पण अमृताचा चेहरा तल्लख आहे, त्याच्यावर पुरेपूर आत्मविश्वास असतो. जो पूनम, रती, मीनाक्षी, फराह या राजसबाळचांच्या चेहऱ्यावर नसतो. त्यामुळं अमृता जशी एकदम पडद्यावर चैतन्य निर्माण करते तशा या नुसत्याच गोड दिसणाऱ्या बाहुल्या करू शकत नाहीत. कुठल्याही माणसाला काय, सतत गोड खायला घातलं तर काहीतरी झणझणीत खायची ओढ लागतेच. तसंच सतत गोड, निर्जीव चेहरे पाहून कंटाळलेल्या प्रेक्षकांना काहीतरी वेगळं हवं होतं ते अमृतानं दिलं.

पण अमृताच्या व्यक्तिमत्त्वातला वेगळेपणा एवढंच तिच्या यशाचं कारण नाही. ती गुणी जरूर आहे. तिच्या आतापर्यंत प्रदर्शित झालेल्या ५–६ चित्रपटांकडं पाहिलं तर हे सहज लक्षात येतं. 'बेताब' या पहिल्याच चित्रपटात ती किती सहजतेनं वावरलीये आणि सनी देऊल सोडला तर नंतरच्या सगळ्याच चित्रपटात तिला हिंदी चित्रपटसृष्टीतल्या अतिशय चांगल्या अभिनेत्यांसमोर उभं रहावं लागलं आहे आणि त्यात ती कुठंही कमी पडत नाही. तिचा तिसराच चित्रपट होता 'दुनिया.' हा चित्रपट संपूर्ण दिलीपकुमारचाच होता, आणि त्याच्या खालोखाल वाव होता ऋषी कपूरला. अमृता तशी त्यात औषधापुरतीच होती. 'साहेब' मध्येही अनिल कपूरलाच अधिक संधी होती. पण या दोन्ही चित्रपटात

या तीनही चांगल्या अभिनेत्यासमोर उभं रहाताना छोट्याशाच भूमिकेत अमृतानं आपली छाप पाडली हेच विशेष. 'मर्द' तर तिच्यामुळच सुसह्य झाला. एक तर हा फँटसी स्वरूपाचा चित्रपट. त्यामुळ अनेक अचाट आणि आचरट कल्पना त्यात घुसडलेल्या. शिवाय अमिताभही त्यात अगदी बघवत नव्हता. अशा वेळेस अमृतामुळ तो चित्रपट शेवटपर्यंत तरी बघवला होता. 'चमेली की शादी'त तिला आतापर्यंतची सगळ्यात चांगली संधी बासू चटर्जींनी दिली. त्याचा फायदा घेऊन या विनोदी भूमिकेत अमृतान अनिल कपूरसमवेत जी धमाल उडवून दिलीय ती पहात रहाण्यासारखी.

अमृताच्या भूमिकांतून तिचे गुण दिसतात, तिचा आत्मविश्वास जाणवतो आणि हेही जाणवत की, या मुलीला वेगळ्या स्वरूपाच्या अभिनयाला अधिक संधी देणाऱ्या भूमिका मिळाल्या तर ती त्याचं चीज करेल. आतापर्यंत तिन मुख्यत. रगवल्या त्या हट्टी, लाडावलेल्या, श्रीमंत मुलीच्या भूमिका आपल्याला 'सोबर' रोल शोभणार नाहीत असं अमृताचं मत असलं तरी आपण 'टाइप्ड' होतोय याची जाणीव तिला नक्कीच आहे आणि म्हणूनच 'काला धधा गोरे लोग'मधली दुहेरी भूमिका जेव्हा तिच्याकड आली तेव्हा त्यात आपल्याला असलेला वाव लक्षात घेऊन सुनील दत्त नायक असला तरी तिन ती भूमिका स्वीकारली. तिच्या वयाच्या इतर कुणीही मुलीनं धाडस केल नसतं

पडद्यावर जशी ती बिनधास्त आहे तशीच पडद्यामागही ती खुल्लमखुल्ला आहे. मनात येईल ते तोंडावर बोलून टाकायच हा तिचा खाक्या. 'बेताब' पाहून आल्यावर पूनम तिला म्हणाली, 'या चित्रपटात तू लिपस्टिक नीट लावल नाहीयेस. एकदा माझ्याकड ये. मी शिकवीन तुला.' यावर 'मला लिपस्टिक कसं लावायचं हे शिकवण्याऐवजी तू आधी अभिनय कसा करायचा ते शिक.' अस तिला तोंडावर सुनावून अमृता मोकळी झाली.

अशा स्वभावामुळं साहजिकच अमृताची इथल्या एकाही नटीशी मैत्री नाही. 'या सगळ्या भूमिका मिळवण्यासाठी एकमेकींचे सतत पाय ओढत असतात. असल्या मुलीबरोबर मैत्री ठेवण्यात मला रस नाही.' असं ती स्पष्ट, जाहीरपणे सागते. या ऐवजी अनिल कपूर, जॅकी, सजय दत्त हे अभिनेते तिला मित्र म्हणून अधिक जवळचे वाटतात.

चित्रपटसृष्टीत बहुतेकदा मैत्रीही व्यावहारिक दृष्टिकोनातून केली जाते. स्वत चा फायदा होत असेल तर वर्षानुवर्षीची भाडणं मिटवली जातात. पोटात एक आणि ओठावर एक असा बाणा असणाऱ्या आणि सतत गोड बोलून कार्यभाग साधू पहाणाऱ्या या लोकाच्या दुनियेत सहकारी कलाकार, इतर व्यावसायिक याच्याबद्दल स्पष्टपणे बोलणारी अमृता अव्यवहारी ठरावी. पण अशी वागली नाही तर मग अमृताच वैशिष्टय काय राहिल ?

—सीमा कुलकर्णी

---

## विज्ञान

---

### □ मनाची एकाग्रता वाढविणारे रसायन

मार्च–एप्रिल म्हणजे परीक्षाचा महिना. सर्वत्र अभ्यासाची चर्चा कालच सध्याकाळी आमच्याकडे राजूची आई आली होती. ती तक्रार करीत होती . 'आमच्या राजूचे मन भारी चचल ! पाच मिनिटे एका ठिकाणी स्वस्थ बसून अभ्यास करेल तर शपथ ! कुठे खुट्ट झालं की, याचे लक्ष तिकडे गेलेच म्हणून समजा आणि अभ्यासाचा त्याला भारी कटाळा ! दहा–पधरा मिनिटातच त्याचे अभ्यासावरचे लक्ष उडून जाते व मग तो नुसता पुस्तकाकडे बघतो पण त्यात काही अर्थ नसतो. आणि ती शेजारची पिंकी. किती लवकर अभ्यासात रमून जाते. आजूबाजूला कितीही गडबड गोधळ असला तरी तिचे चित्त मुळीच विचलीत होत नाही. तासभर अभ्यास केला तरी तिला कटाळा असा येतच नाही.' अशी चर्चा मधून मधून तुमच्यादेखील कानावर पडत असेल. राजू आणि पिंकी ही मुल असतील फार तर ८–१० वर्षांची. प्रत्येक आईला वाटते आपल्या मुलाने खूप अभ्यास करावा व परीक्षेत चांगले भरघोस यश मिळवावे. चागला अभ्यास करता येण्यासाठी अर्थात अभ्यासाची आवड हवी व मुख्य म्हणजे मुलाचे मन लवकर एकाग्र व्हावयास हवे व ती एकाग्रता बराच काळ टिकावयास हवी. मुलाचे मन लवकर एकाग्र का होत नाही किंवा त्यांची एकाग्रता का टिकून राहत नाही यासबधी आपल्याला म्हणता येईल की मुलाना मुळातच अभ्यासात आवड निर्माण करण्याचे प्रयत्न केले जात नाहीत. पण अभ्यासाची आवड निर्माण झाल्यावरही चित्त एकाग्र करण्याचे काही उपाय असतील तर त्याचा देखील विचार व्हावयास हवा. उदाहरणार्थ पातजल योगसूत्राचा या दिशेने काही उपयोग होऊ शकेल का याचाही विचार उपयुक्त ठरेल, कारण पातजल योगसूत्रात चित्त एकाग्र करण्याचे व ती एकाग्रता टिकविण्याचे बरेच उपाय सागितले आहेत. मात्र हे प्रयत्न इथे थाबता कामा नयेत. भौतिक विज्ञानदेखील या समस्येचा विचार करीत आहे. अशा रितीने मानसशास्त्र, अध्यात्मशास्त्र व भौतिकविज्ञान याच्या सामजस्यातून कदाचित आपल्याला मनाच्या एकाग्रतेचे रहस्य समजेल व त्यामुळे मानवजातीचे कल्याण साधता येईल.

आता विज्ञानाने या दिशेने काय संशोधन केले आहे ते बघू या. शास्त्रज्ञाना मानवी मेंदूत एक प्रथिन (Protein) आढळून आले आहे हे पियूषिका ग्रथीमधील (Pitutary Gland) दोन सप्रेरकामध्ये (Harmones) असते. यापैकी एका सप्रेरकाचे नाव आहे adrenocorticotropic harmone (ACTH) व दुसऱ्याचे नाव आहे melanocyte stimulating harmone (MSH).

हे प्रथिन चित्त एकाग्र करण्यास व ती एकाग्रता टिकवून ठेवण्यास मदत करते. अर्थात याचे मेंदूतील प्रमाण आवश्यकतेपेक्षा कमी झाल्यास चित्ताची एकाग्रता टिकवून ठेवण्याची क्षमता कमी होईल. म्हणून अशा अवस्थेत या सप्रेरकाचे इजेक्शन घेणे हा उपाय ठरतो.

हा शोध लावण्याचे प्रमुख कारण म्हणजे आजचे शास्त्र मानवी मेंदूत घडणाऱ्या सूक्ष्मातीसूक्ष्म रासायनिक क्रियाची नोंद घेण्यास समर्थ ठरत आहे हे आहे. मानवी मेंदूत अनेक रासायनिक पदार्थ अतिशय

सूक्ष्म प्रमाणात अस्तित्वात असतात आणि त्यांची नोंद घेणे व त्यांचे मापन करणे आज शक्य झाले आहे. एवढेच नव्हे तर त्यांचा मेंदूतील प्रवास कसा होतो हे देखील कळू लागले आहे. यामुळे मानवी मेंदूत घडणाऱ्या स्मरण क्रिया, एकाग्रता, भीती इत्यादिंचा या रासायनिक परिवर्तनाशी संबंध जोडणे शक्य झाले आहे. म्हणजेच या रासायनिक क्रियांद्वारे या घटनांचे नियंत्रण करता येणे निदान सैद्धान्तिक दृष्टया शक्य आहे.

या प्रथिनाचा खरा उपयोग होऊ शकेल तो मनोदुर्बलांना. (Mentaly retarded) यांची मन एकाग्र करण्याची व ती एकाग्रता ठिकवून ठेवण्याची क्षमता अतिशय क्षीण असते. परिणामत: त्यांना विचार करणे, सांगितलेले काम समजावून घेणे जमत नाही. पण ACTH व MSH या संप्रेरकांच्या इंजेक्शन्सद्वारे त्यांची ही क्षमता वाढते असे लक्षात आले आहे.

१९७१ साली उंदरांवर केलेल्या प्रयोगाद्वारे असे आढळून आले आहे की ACTH / MSH हे प्रथिन त्यांची स्मरण शक्ती वाढविते.

तसेच डॉ. ॲबा कास्टिन या टुलान विद्यापीठातील अंतर्स्रावी तज्ञाला (Endocrinologist) असे लक्षात आले की (ACTH/ MSH) हे प्रथिन मानवी मेंदूवर दुहेरी परिणाम करते. एकतर यामुळे मनाची एकाग्र होण्याची क्षमता वाढते व दुसरे म्हणजे डोळयाने बघितलेली गोष्ट बराच वेळ लक्षात राहते. डॉ. ॲबा कास्टीन यांनी या संदर्भात एक प्रयोग केला. तो असा: विद्यार्थ्यांचे त्याने दोन गट पाडले. एका गटाला त्याने या प्रथिनाचे इंजेक्शन दिले व दुसऱ्या गटाला Placebo चे. मग दोन्ही गटांना त्याने सारखेच कंटाळवाणे व पुन्हा पुन्हा करावयाचे काम दिले. (कारण अशा प्रकारच्या कामात चित्त विचलीत होण्याची शक्यता जास्त असते.) मग या कामात कोणता गट जास्त चुका करतो ते शोधून काढले. अर्थात प्रथिनाचे इंजेक्शन न दिलेल्या गटाने जास्त चुका केल्या होत्या. म्हणजे प्रथिनाच्या इंजेक्शनने दुसऱ्या गटाची एकाग्रता वाढविली होती. या गटाची भूमितीय आकृत्या लक्षात ठेवण्याची क्षमतादेखील वाढली होती.

पन्नास वर्षांपूर्वी सिग्मंड फ्राइडने असे भाकित केले होते की मानवी मेंदूत घडणारा प्रत्येक बदल हा सरतेशेवटी तेथे घडणाऱ्या कोणत्यातरी रासायनिक क्रियेचा परिणाम म्हणून सिद्ध करता येईल. त्याचे हे भाकित खरे ठरण्याची आज दाट शक्यता निर्माण झाली आहे. स्मरणशक्ती, मनाची एकाग्रता, भीती, भांडखोर वृत्ती या सर्वांच्या मुळाशी मेंदूत घडणारे सूक्ष्म रासायनिक बदल असावेत या सिद्धांताला भरपूर पुष्टी मिळत आहे. यासंबंधी भौतिक विज्ञान जितके जास्त प्रगती करेल त्या प्रमाणात मनोरुग्णांना फायदा होऊ शकेल. एवढेच नव्हे तर या शोधांची मानवी सृजनशीलतेला देखील बरीच मदत होऊ शकेल असे मानण्यास हरकत नाही.

–अ. ल. देशपांडे




## NEW TITLES

( 1 ) *The Kohinoor Diamond* (Its history of 3000 years and its legend) By Stephen Howarth.

( 2 ) *The Dracula Collection* (A Study of Vampirsism with colour Photos and Text).

( 3 ) *All Colour Book of Science Facts* (Earth, plants, animals, human body, science and technology).

( 4 ) *Migraine Headaches* By Dr. Marcia Wilkinson.

( 5 ) *IBM Colossus in Transition* ( Corporate Management ) By Robert Sobel.

Reader's co-operation leaves the Library free for constructive work.

**The Phoenix Library**

Opp. Sadashiv Peth, Pune 411 030

MANOOS WEEKLY (Licensed to post without prepayment of postage No-11) Regd. No PNCW-28


- **योद्धा शेतकरी** / विजय परुळकर / ३६ रुपये
- **डॉ. आयडा स्कडर** / वीणा गवाणकर / २२
- **एक होता कार्व्हर** / सौ. वीणा गवाणकर / ३०
- **श्रीरामायन** / श्री. ग. माजगावकर / २५
- **बलसागर** / श्री. ग. माजगावकर / ३०
- **निर्माणपर्व** / श्री. ग. माजगावकर / ४०
- **पूर्णत्वाचे प्रवासी** / प्रा. शरद कुलकर्णी / ५०
- **आंबेडकर भारत** / बाबुराव बागुल / २०
- **लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी** / पु. ल. इनामदार / २०
- **निलगिरीची शेती** / विनायक पाटील / १५
- **अब्राहम लिंकन, फाळणी टाळणारा महापुरुष** / वि. ग. कानिटकर / १५०
- **नाझी भस्मासुराचा उदयास्त** / वि. ग. कानिटकर / १४०
- **विज्ञानेश्वरी** / डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / २०
- **तुम्हाला विज्ञानयुगात जगायचंय** / डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर / २०
- **मानसकन्या** / प्रा. मनोहर राईलकर / २०
- **सांगत्ये ऐका** / हंसा वाडकर / १४
- **शतपावली** / रवींद्र पिंगे / १६
- **रूपवती भार्या शत्रु ?** / ॲड. माधव कानिटकर / २५
- **सबला** / माधव शिरवळकर / १२
- **काही दिवस श्यामचे काही दिवस राधाचे** / फिरोझ रानडे / २५
- **फिडेल ' चे आणि क्रांती** / अरुण साधू / २२
- **मला निसटलंच पाहिजे** / श्रीकांत लागू / २२
- **लेक वालेसा** / डॉ. श्रीकांत मुदरगी / २२

राजहंस प्रकाशन

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
दूरध्वनी : ४४ ३४ ५९

C/o. श्री. वा. र. गोडे
४१ भवानीशंकर रोड
जोशी वाडी
चितळे पथ कॉर्नर, दादर (प.)
मुंबई ४०० ०२८
दूरध्वनी : ४२२ ५४ ५५
४२२ ३१ ०१

- **माध्यमिक शाळेतील विद्यार्थी** / श्री. ब. गोगटे, म. न. पलसाने / १०
- **कथा ही गणिताची** / ळ. वा. गुर्जर / ६०
- **महाराष्ट्रातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रश्न** / म. न. पलसाने, श्री. अ. पाटणकर, वि. मा. कुलकर्णी, सुमन करंदीकर / ३५
- **गुजरातेतील मराठी राजवट** / वि. गो. खोबरेकर / १५
- **तीर्थरूप आक्का** / शारदाबाई आपटे / ५
- **सहा साहसे** / दा. सी. देसाई / १६
- **परसूच्या पशुकथा** / वसंत सबनीस / १२
- **चार्लस डार्विन** / भा. रा. बापट / ३२
- **कुंपण आणि आकाश** / मंगला गोडबोले / २०
- **वयात येताना** / मंगला गोडबोले, डॉ. वैजयंती खानविलकर / २५
- **वाट चुकलेली माणसं** / शिरीष सहस्रबुद्धे / ४०
- **नाट्यपंढरी** / गो. रा. जोशी । २०
- **ऊर्जा प्रश्न : आशा उद्याच्या** / प्रि. खं. कुलकर्णी / २५
- **कल्पान्त** / प्रा. मनोहर राईलकर / ३५
- **या कॉम्प्युटरमध्ये दडलंय काय ?** / राजीव साने / ३०
- **लघुउद्योग मार्गदर्शक** / शिरीष सहस्रबुद्धे / ६५
- **राजहंस गीत संग्रह** / सौ. कमल प्रभुणे, सौ. विद्या बापट, डॉ. सौ. ललिता गुप्ते / १०
- **बखर कॉंग्रेसची** / शिरीष सहस्रबुद्धे / २०
- **लांडगा आला रे ऽ आला** / जगदीश गोडबोले / ३०
- **झुळुक** / मंगला गोडबोले / २५
- **तेंडुलकरांची नाटके** / डॉ. चंद्रशेखर बर्वे / ३०
- **भ्रम आणि निरास** / डॉ. नरेंद्र दाभोळकर / ३०
- **सेंट्रल एक्साइज आणि लघुउद्योग** / शिरीष सहस्रबुद्धे / २४